किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित

# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

नॅक प्रमाणन 'ब' दर्जा

## आसूड

# शिक्षणातून स्वावलंबनाकडे

**मुख्यसंपादक**
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

**संपादक**
उपप्राचार्य डॉ. डी. डी. चौधरी

**संपादक मंडळ**
डॉ. सतीश ससाणे
डॉ. अनिल मुंढे
डॉ. मारोती कसाब
प्रा. परमेश्वर इंगळे
श्री. प्रशांत डोंगळीकर

**टीप:** या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**वि द्या र्थी सं पा द क**

**मराठी विभाग**
**संजीवनी मुक्तीराम येडले (बी.ए. द्वि. वर्ष)**

**हिंदी विभाग**
**योगेश हनुमंत हैसे (बी.ए. तृ. वर्ष)**

**इंग्रजी विभाग**
**शेख मिसबा अलिमोद्दीन (बी.ए. तृ. वर्ष)**

**संस्कृत विभाग**
**रेणुका पुंडलिक मलकापुरे (बी.ए. तृ. वर्ष)**

**इतिहास विभाग**
**नेहा बालाजी शिंदे (बी.ए. द्वि. वर्ष)**

**समाजशास्त्र विभाग**
**पूजा गोपीचंद चव्हाण (बी.ए. तृ. वर्ष)**

**राज्यशास्त्र विभाग**
**मंजुषा भास्कर भदाडे (बी.ए. तृ. वर्ष)**

**भूगोल विभाग**
**धनश्री प्रकाश कांबळे (बी.ए. प्र. वर्ष)**

**अर्थशास्त्र विभाग**
**गणेश मोहनराव नरवटे (बी.ए. तृ. वर्ष)**

**अक्षर जुळवणी**
**डॉ. राजेश गं. उंबरकर**

**मुखपृष्ठ**
**तेजस रामपूरकर**

**मुद्रक**
**राजीव रामपूरकर**
अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.
Shrishprakashan२००९@gmail.com

## किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर जि. लातूर

# कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री प्रा.विजयकुमार बाबाराव पाटील शिरोळकर | अध्यक्ष |
| २. | श्री. अशोकराव माधवराव पाटील राजूरकर | उपाध्यक्ष |
| ३. | श्री. ज्ञानदेव रामभाऊ झोडगे | सचिव |
| ४. | श्री. रावसाहेब किशनराव देशमुख | सहसचिव |
| ५. | श्री. श्रीरंगराव ज्ञानोबा पाटील | कोषाध्यक्ष |
| ६ | श्री. बळवंत रंगराव जाधव | सदस्य |
| ७ | श्री. दत्तू मनोहरराव जाधव | सदस्य |
| ८ | श्री. संभाजी कृष्णाजी केंद्रे | सदस्य |
| ९ | श्री माधवराव किशनराव पाटील | सदस्य |
| १० | श्री. व्यंकटराव माणिकराव जाधव | सदस्य |
| ११ | श्री. सय्यद चाँदपाशा नवाजसाहेब | सदस्य |
| १२ | श्री. त्रिंबकराव गोविंदराव धोंडगे | सदस्य |
| १३ | श्री.नामदेवराव रामराव चामले | सदस्य |

# किसान शिक्षण प्रसारक मंडळाचा विस्तार

| अ.क्र. | मंडळांतर्गत शाखा |
|---|---|
| १ | शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय, उदगीर |
| २ | शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, उदगीर |
| ३ | महात्मा फुले वरिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर |
| ४ | महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर |
| ५ | महात्मा फुले प्राथमिक विद्यालय, अहमदपूर |
| ६ | महात्मा फुले माध्यमिक विद्यालय, अहमदपूर |
| ७ | विद्यावर्धिनी प्राथमिक विद्यालय, उदगीर |
| ८ | विद्यावर्धिनी माध्यमिक विद्यालय, उदगीर |
| ९ | विद्यावर्धिनी इंग्रजी (माध्यम) प्राथमिक शाळा, उदगीर |
| १० | विद्यावर्धिनी इंग्रजी (माध्यम) माध्यमिक शाळा, उदगीर |
| ११ | शिवाजी विद्यालय, हंडरगुळी ता.उदगीर |
| १२ | शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, हंडरगुळी ता.उदगीर |
| १३ | निर्मलपुरी विद्यालय, हेर ता.उदगीर |
| १४ | निर्मलपुरी कनिष्ठ महाविद्यालय, हेर ता.उदगीर |
| १५ | जिजामाता विद्यालय, तोंडचीर ता.उदगीर |
| १६ | नागाबुवा विद्यालय, हेळंब ता.देवणी |
| १७ | शाहू विद्यालय, शेळगाव ता.चाकूर |
| | **वसतिगृह** |
| ०१ | सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, अहमदपूर |
| ०२ | नागाबुवा मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, हेळंब ता.देवणी |
| ०३ | जिजामाता मुलींचे वसतिगृह, उदगीर |
| ०४ | किसान मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, हंडरगुळी ता.उदगीर |

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर.

उत्कृष्ट परीक्षा केंद्र

## प्रमाणपत्र

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वतीने मार्च/एप्रिल 2002 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी आपल्या महाविद्यालयाची जिल्ह्यातील उत्कृष्ट परीक्षा केंद्र म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनंदन !

करिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

दिनांक : 21 सप्टेंबर, 2002

डॉ. शेषराव सूर्यवंशी
कुलगुरू

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद
विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the

Mahatma Phule Mahavidyalaya
Ahmedpur, Dist. Latur,
affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University,
Maharashtra as

Accredited
with CGPA of 2.11 on seven point scale
at B grade
valid up to November 04, 2021

Date : November 05, 2016

Director

EC(SC)/18/A&A/106.1

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## Certificate of Academic and Administrative Audit

I am directed to inform that:

The Academic Council of the University, on the recommendation of the duly constituted Committee for Academic and Administrative Audit as per the Maharashtra Public Universities Act, 2016, is pleased to declare that **Mahatma Phule Mahavidyalaya Ahmedpur Tq. Ahmedpur Dist. Latur** has been audited during the academic year 2019-20. The score obtained by the said college/institute is as given below:

| Sr. No. | Criteria | Maximum Score | Obtained Score | Percentage of score |
|---|---|---|---|---|
| 01. | Governance and Policy Making | 40 | 33 | 82.50 |
| 02. | Infrastructure and Student Amenities | 220 | 146 | 66.36 |
| 03. | Management of Finance | 40 | 23 | 57.50 |
| 04. | Administrative Criteria | 60 | 56 | 93.33 |
| 05. | Academic Criteria | 180 | 137 | 76.11 |
| 06. | Socio-Economic Criteria | 20 | 13 | 65.00 |
| | **Total** | 560 | 408 | 72.85 |

The college has received overall **Grade 'A'** with **72.85%**

This Certificate is valid up June 19, 2023

Place: Nanded
Date : June 20, 2020

Deputy Registrar
(Affiliation Section)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक — ४२२ २२२

राष्ट्रीय सेवा योजना

जा. क्र. रासेयो/ 21 /२०२१/२०२२ दिनांक : ०९-०८-२०२१

I. No. 412
12.08.21

प्रति,
मा. प्राचार्य/केंद्र प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र,
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर
ता. अहमदपूर, जि. लातूर
पिन - ४१३ ५१५

| अभ्यासकेंद्र संकेतांक |
| --- |
| 8497A |

**विषय: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट आपल्या महाविद्यालयात सुरु करण्याच्या मान्यतेबाबत..**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राने केलेले भरीव कार्य लक्षात घेऊन आपण केलेल्या मागणी नुसार विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या तज्ज्ञ सल्लागार समितीने आपल्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्षे २०२१-२०२२ पासून राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० विद्यार्थ्यांचे/स्वयंसेवकांचे युनिट सुरु करण्यास मान्यता दिली आहे. आपल्या नेतृत्वाखाली आपल्या महाविद्यालयात नव्याने सुरु होणारे राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट एक आदर्श निर्माण करेल असा आम्हास विश्वास आहे.

आपल्या अभ्यासकेंद्रावर राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश घेणाऱ्या ५० विद्यार्थ्यांची यादी विहित नमुन्यात भरून प्रती विद्यार्थी रु. १० प्रमाणे एकूण रु. ५०० चा डिमांड ड्राफ्ट Finance Officer YCMOU, Nashik यांचे नावे काढून विद्यापीठास खालील पत्त्यावर पाठवावा. त्यासंदर्भात काही अडचणी आल्यास खालील ई-मेल किंवा मोबाईल वर संपर्क साधावा ही विनंती.

पत्ता:
**संचालक,**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,**
**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक – ४२२ २२२**

आपला,

डॉ. प्रकाश देशमुख
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

मेल आयडी :- dprakash_07@rediffmail.com

डॉ. प्रकाश देशमुख Mob- ९४०३७७४५३४
श्री. माणिक गांगोडे Mob- ९७६५३८८०८१

श्री डॉ. अनिल मुंढे
डॉ. संतोष पाटील
नोंद घ्यावी व युनिट मान्यताई करावी.
12/8/21
प्राचार्य

# अ नु क्र म णि का


| अ. क्र. | लेखाचे नांव | लेखक / कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | महाविद्यालयाचे गीत | डॉ. अनिल मुंढे | १२ |
| ०२. | मनोगत | प्राचार्य डॉ. वसंत बिरादार | १३ |
| ०३. | संपादकीय | डॉ. डी. डी. चौधरी | १५ |
| | विद्यार्थ्यांचे साहित्य लेखन | | |
| ०४. | शिक्षणातून स्वावलंबन | विश्वनंदा दयानंद नंदवंशी | १७ |
| ०५. | शिक्षण हाच प्रगतीचा मार्ग खरा | मोहिनी मुरारी मेकाले | २० |
| ०६. | शिक्षण आणि स्वावलंबी जीवन | विखिल सुभाष विभूते | २२ |
| ०७. | शिक्षण : यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली | कु. वैष्णवी भुतके | २४ |
| ०८. | स्वावलंबी शिक्षण हेच खऱ्या विद्यार्थ्याचे ब्रीद ... | शुभम रामचंद्र गुंजरगे | २७ |
| ०९. | स्वावलंबी शिक्षण | नेहा पांडुरंग गुंडरे | ३० |
| १०. | पर्यटन रोजगारासाठी इतिहासाची भूमिका | विश्वनंदा दयानंद नंदवंशी | ३३ |
| ११. | पर्यटक निवास व्यवस्थेतून रोजगार निर्मिती | शंकर कदम | ३५ |
| १२. | स्वावलंबनाचा मूलमंत्र - कमवा आणि शिका | कोमल शिवाजीराव सूर्यवंशी | ३८ |
| १३. | स्वावलंबनासाठी काळानुरूप शिक्षण | पवन कुमार कराड | ४० |
| १४. | स्वावलंबनासाठी आधुनिक शिक्षण | संगीता दुबळे | ४१ |
| १५. | स्वावलंबनासाठी अपारंपरिक शिक्षण | प्रसाद डावरे | ४२ |
| १६. | स्वावलंबी शिक्षणाचे प्रणेते : कर्मवीर भाऊराव पाटील | कोमल पोले | ४३ |
| १७. | कविता | ऐश्वर्या देवकत्ते | ४४ |
| १८. | व्यावसायिक शिक्षण ही काळाची गरज | संजना ससाणे | ४५ |
| १९. | अहम महात्मा -फुले-महाविद्यालयस्यः छात्रा अस्मि । | गितांजली केजकर | ४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २०. | स्वावलम्बनम् | रेणुका पुंडलिक मलकापुरे | ४७ |
| २१. | शिक्षण स्वावलम्बनम्च। | कोमल संभाजी पोले | ४८ |
| २२. | स्वावलम्बन होने के फायदे | कु. समृध्दी बनसोडे | ४९ |
| २३. | स्वावलंबन | कु. मनीषा सुरनर | ५१ |
| २४. | महात्मा फुले महाविद्यालय ने बनाया स्वावलम्भी | कु. रमाताई श्रीराम गायकवाड | ५२ |
| २५. | आत्मनिर्भर भारत : एक अभियान | ऐश्वर्या देवकत्ते | ५३ |
| २६. | आत्मनिर्भर भारत के लिए शिक्षा का महत्त्व | कृष्णा राठोड | ५४ |
| २७. | आत्मनिर्भरता के लिए शिक्षा | कु. आरती गुळवे | ५५ |
| २८. | मानवी जीवनात शिक्षणाचे महत्त्व | कु. पूजा गोपीचंद चव्हाण | ५७ |
| २९. | शिक्षणाच्या स्वावलबंनातून महिलांचा विकास | दिव्या दहिकांबळे | ६१ |
| ३०. | शिक्षणातून नोकरी की व्यवसाय ? | संजीवनी येडले | ६४ |
| ३१. | स्वावलंबनासाठी शिक्षण ही काळाची गरज | सोमेश्वर श्रीमंगले | ६८ |
| ३२. | स्वावलंबनासाठी शिक्षण | किरण दुबळे | ६९ |
| ३३. | आधुनिक शिक्षणाद्वारे आत्मनिर्भर | निखिल भालेराव | ७१ |
| ३४. | उच्च शिक्षण आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास | मेघा ससाणे | ७३ |
| ३५. | स्त्री शिक्षणाचे महत्त्व | कुसुम देमगुंडे | ७५ |
| ३६. | शिक्षणाचे महत्त्व | तेजस्विनी गायकवाड | ७६ |
| ३७. | The Importance of Education in Personal Growth | Kamble Dhanashree | ७८ |
| ३८. | Self - Reliance Through Education | Anjali Shinde | ८० |
| ३९. | English Language Skills Makes Self-reliant Person | Shaikh Misba | ८२ |

## विभागनिहाय अहवाल



| | | |
|---|---|---|
| ०१. | मराठी विभाग | ८५ |
| ०२. | हिंदी विभाग | ८९ |
| ०३. | इंग्रजी विभाग | ९२ |
| ०४. | संस्कृत विभाग | ९६ |
| ०५. | इतिहास विभाग | ९९ |
| ०६. | समाजशास्त्र विभाग | १०३ |
| ०७. | राज्यशास्त्र विभाग | १०६ |
| ०८. | भूगोल विभाग | १०९ |
| ०९. | अर्थशास्त्र विभाग | १११ |
| १०. | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विभाग | ११५ |
| ११. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग | ११७ |
| १२. | क्रीडा विभाग | १२० |
| १३. | सांस्कृतिक विभाग | १२२ |
| १४. | छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र | १२४ |
| १५. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास क्रेंद्र विभाग | १२७ |
| १६. | ग्रंथालय विभाग | १२९ |
| | छायाचित्रे | १३४ |
| | वर्तमानपत्रातील प्रतिबिंब | १४२ |



## •महाविद्यालय गीत•

*क्रांतिसूर्य जोतिबांच्या लेखणीमधली ही शिक्षण वाणी ।*
*ज्ञानमंदिरी भारतभूमी दिसे शोभुनी ।। धृ ।।*
*सर्वांचा निर्मिक एक जानी*
*माणूस इथला आत्मज्ञानी*
*सत्याने वर्तवे सद्गुण मानी*
*ज्ञानचक्षु विद्यार्थी इथे अभिमानी*
*ज्ञानदीप लावुनी तेवत ठेवुया मनोमनी ।।1 ।।*
*घेऊनिया वसा जोतिबांचा*
*ठेविला आदर्श सावित्रीचा*
*फुलविला मळा शिक्षणाचा*
*मिळाला आधार किसान शिक्षण मंडळाचा*
*लाविले रोप दूरदृष्टीने बापुसाहेबांनी ।।2 ।।*
*बालाघाटच्या डोंगर रांगा*
*मन्याड खोऱ्यात फुलती ज्ञानबागा*
*शिक्षण क्रांतीचा गुंफला धागा*
*माणूस इथला सदैव जागा*
*'फुले पॅटर्न' चा झरा वाहे शिक्षण पंढरीतुनी ।।3 ।।*
*शिक्षण ज्ञानविज्ञानाचे*
*मानवतेचे गुणवत्तेचे*
*जिजाऊसावित्री अन् अहिल्याबाईंचे*
*स्वराज्य स्थापण्या शिवरायांचे*
*'बहुजन हिताय,बहुजन सुखाय' चा ध्यास घेऊनी मनोमनी ।।4।।*
*विद्यार्थी सारी मिळून राहती*
*एकतेचे गीत गाती*
*ज्ञानदिव्यांच्या पेटवून वाती*
*शूरवीरांचे गुण गाती*
*शब्दरत्नांच्या अलंकाराने दिसते शोभुनी।।5।।*

**• डॉ.अनिल मुंढे**
**मराठी विभाग**

# म नो ग त

मराठवाड्यातील किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर ही शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित असलेली शैक्षणिक संस्था आहे. **'बहुजन हिताय, बहुजन सुखाय'** या उद्दात ध्येयाने प्रेरित होऊन गेल्या पंच्चावन्न वर्षांपासून अग्रक्रमावर आहे. याच संस्थेचं एक छोटंसं शैक्षणिक रोप जून इ.स. २०००पासून अहमदपूर येथे महात्मा फुले महाविद्यालय या नामाभिधानाने लावण्यात आले. त्याला आज २१वर्ष पूर्ण होत आहेत. तसेच याच विभागात सेमी इंग्लिश, इंग्रजी माध्यम प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिकचे युनिट दर्जेदार शैक्षणिक गुणवत्तेने परिपूर्ण रूपात कार्यरत आहेत.

मुळातच ग्रामीण भागातील, वाडी- तांड्यावरील, तळागाळातील, दीन, दलित, उपेक्षितांना, वंचितांना, कष्टकरी, सालदार, बेलदारासह बारा बलुतेदार, मजुरदार, नाही रे वाले, हातावर पोट असणारे गोरगरीब घटकांना त्यांच्या हक्काचं शिक्षण त्यांना मिळालं पाहिजे ही ठोस भूमिका किसान शिक्षण प्रसारक मंडळाची नेहमीच राहिलेली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या विद्यापीठीय परीक्षेत आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी 2016 पासून ते 2021 पर्यंत सातत्याने विद्यापीठात सर्वप्रथम येऊन सुवर्ण पदक पटकावले आहेत.तसेच विद्यापीठात सर्व द्वितीयही आलेले आहेत. शिवाय विविध हिंदी, इंग्रजी, संस्कृत, राज्यशास्त्र या विषयांमध्ये सुवर्णपदके प्राप्त झाले आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड कडून महाविद्यालयाला २०२१मध्ये शैक्षणिक ऑडिटमध्ये विद्यापीठाचा 'ए' ग्रेड प्राप्त झालेला आहे. सर्व क्षेत्रात अग्रक्रमावर असलेले आमचे महात्मा फुले महाविद्यालय हे महाविद्यालय नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यात स्वतंत्र चेहरा घेऊन नावारूपाला आले आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीचे सर्व श्रेय किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व डोळस पदाधिकारी, महाविद्यालयातील प्राध्यापक यांचे आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या सहकार्याला हे श्रेय जाते.

महाविद्यालयात वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते. वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्या जातात. स्पर्धा परीक्षेचे, व्यवसाय मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मोफत केले जाते. महाविद्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव आयोजित केला जातो. या

पार्श्वभूमीवर शहरात विविध स्पर्धा घेतल्या जातात त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि विद्यार्थी समाजाभिमुख, राष्ट्राभिमुख वृत्तीचा निर्माण व्हावा, ही त्यामागे प्रामाणिक अपेक्षा आहे.

याच हेतूने महात्मा फुले महाविद्यालय हे दरवर्षी 'आसूड' हा वार्षिक अंक प्रकाशित करतोय. या वर्षी **"शिक्षणातून स्वावलंबनाकडे"** हा अंक प्रकाशित करून विद्यार्थ्यांच्या वैचारिकतेला आणि सामाजिक बांधिलकीला चालना दिलेली आहे. ती नक्कीच आपल्याला आवडेल, अशी आशा करतो.

धन्यवाद....!

- प्राचार्य डॉ. वसंत बिरादार
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

**जोडोनिया धन उत्तम व्यवहारे | उदास विचारे वेच करी ||**
**उत्तमचि गती तो एक पावेल | उत्तम भोगील जीव खाणी ||**
**पर उपकारी नेणें परनिंदा | परस्त्रिया सदा बहिणी माया ||**
**भूतदया गाई पशुंचे पालन | तान्हेल्या जीवन वनामानी ||**
**शांतिरूपे नव्हे कोणाचा वाईट | वाढवी महत्त्व वडिलांचे ||**
**तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ | परंपद बळ वैराग्याचे ||**

**- संत तुकाराम**

# संपादकीय

नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर **"शिक्षणातून स्वावलंबनाकडे"** या विषयावर होत असलेल्या वैचारिक मंथनाच्या अमृत कणांचा एक साक्षीदार बनण्याचे भाग्य या विशेष वार्षिक अंकाच्या निमित्ताने संपादक म्हणून मला मिळाले याबद्दल मी मा.प्राचार्य डॉ.वसंत बिरादार व संयोजन समितीचा आभारी आहे.

आयुष्यात प्रत्येकाला यशस्वी होण्यासाठी आणि काहीतरी वेगळे करण्यासाठी यशाची गुरुकिल्ली म्हणून शिक्षण हे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी,

**"विद्येविना मती गेली, मतीविना गती गेली,**
**गतीविना नीती गेली, नीतीविना वित्त गेले,**
**वित्ताविना शुद्र खचले,**
**एवढे सारे अनर्थ एका अविद्येने केले."**


याप्रकारे शिक्षणाचे महत्व आपल्या अखंडाच्या माध्यमातून सांगितलेले आहे.

शिक्षण हा स्वावलंबनाचा पाया आहे आणि शिक्षणामुळेच आत्मनिर्भरता, आत्मभान यांचे मार्ग प्रशस्त होतात. प्रत्येक शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश शिक्षणातून स्वावलंबन हाच असतो. यास नवीन शैक्षणिक धोरण अपवाद नाही. शैक्षणिक धोरणाचा उद्देश शिक्षणातून स्वावलंबन हाच आहे हे औचित्य साधून स्वावलंबनासाठी शिक्षण हा उद्देश समोर ठेवून विद्यार्थ्यांना, त्यांच्या संशोधन कौशल्याला वाव देण्यासाठी व त्यांच्यातील सुप्त लेखकाला एक व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने **"शिक्षणातून स्वावलंबना कडे"** हा विषय घेऊन **"आसुड"** चा हा वार्षिक अंक आपल्यासमोर ठेवत आहोत. या अंकात ३५ विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिले आहेत त्या सर्व विद्यार्थी लेखकांचे अभिनंदन.

आपण सर्वांनी आमच्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या संशोधन वृत्तींना, लेखन कलेला दाद दिली तसेच याविशेष अंकाला भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार!

**धन्यवाद..!**

डॉ. डी. डी. चौधरी
(संपादक)
उपप्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर


विद्यार्थ्यांचे
साहित्य लेखन

# शिक्षणातून स्वावलंबन

स्वावलंबी माणूस म्हणजे अर्थातच इतरांवर अवलंबून न राहता स्वतःची कामे स्वतः जबाबदारीने करणारा मनुष्य आपलं काम आपल्या मनासारखं व्हावं अशी इच्छा धरणाऱ्यांसाठी स्वावलंबन हा एक महामंत्र आहे. प्रत्येक माणसावर आपल्या कुटुंबाची जबाबदारी असते.त्यामुळे तो माणूस स्वतः कष्ट करून आपल्या मुलाबाळांचे पोट भरत असतो. त्याचे फळ म्हणजेच आपल्या पत्नीच्या आणि मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद हे त्याला आपल्या कुटुंबातच सहजपणे, परंपरेने मिळत असते.

आयुष्यात काहीतरी चांगले करायचे असेल तर आपण स्वतःची जबाबदारी स्वतः घेतली पाहिजे. त्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. उच्च शिक्षण घेऊन जर माणूस योग्य दिशेला गेला तर तो कधीच उपाशी राहू शकत नाही किंवा इतरांवर अवलंबून राहत नाही. सतत चांगले विचार, इतरांबद्दल मनात चांगल्या भावना, असे गुण माणसाच्या अंगी शिक्षणातून येतात. माणूस हा इतरांचे सुख बघून जळणारा नसावा. ज्या माणसामध्ये स्वावलंबन आणि आत्मनिर्भरतेचे गुण असतात त्याच्या आयुष्यात सतत चांगलेच घडत जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत सांगायचं झालं तर ...शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा! ही त्यांची शिकवण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आयुष्य हे त्यांच्या स्वतः वर अवलंबून होते. आई वडील गेल्यानंतर सगळी जबाबदारी त्यांनी स्वतः वर घेऊन उच्च शिक्षण घेतले. गावांमध्ये आणि शहरांमध्ये राहणाऱ्या सर्व सामान्य लोकांना त्यांनी योग्य ते ज्ञान सांगून प्रोत्साहन दिले. शिक्षणातून माणसाला स्वावलंबन प्राप्त होते, शिक्षणामुळे माणूस स्वतः कष्ट करून कमावू शकतो. दुसऱ्यावर अवलंबून राहत नाही.

तसेच महात्मा गांधीजींचे विचार घेतले तर त्यांनी सत्य, अहिंसा, आणि स्वावलंबन या विचारांनी लोकांना योग्य दिशा दाखवली. आज आपण त्याच योग्य दिशेला चालून स्वच्छ, स्वस्थ, समृध्द आणि सशक्त नवीन भारताची निर्मिती करत आहोत. महात्मा गांधीजी म्हणतात की 'माणूस स्वच्छ नाही तर तो स्वस्थ नाही आणि स्वस्थ नसल्यामुळे तो त्याला समोरची योग्य दिशा सापडत नाही'. म्हणूनच महात्मा गांधीजी सर्व लोकांना स्वावलंबनाबद्दल आणि स्वच्छतेबद्दल चांगले विचार सांगून प्रोत्साहित केले.

एखादा माणूस जर इतरांवर अवलंबून राहत असेल तर त्याचे आयुष्य कधीच सुखी होऊ शकत नाही. आपले एखादे काम जर तुम्ही दुसऱ्यावर टाकले आणि जर त्याने ते काम केले नाही तर नुकसान हे तुमचेच होणार आहे. जर तेच काम तुम्ही कोणाचीही मदत न घेता वेळेवर पूर्ण केले तर तुमचाच फायदा आहे. आणि ते काम केलेला आनंद हा वेगळाच !

स्वावलंबनाच्या बाबतीत आपल्याला एका शेतकऱ्याचे उदाहरण देता येईल. एक शेतकरी होता. त्याने त्याच्या शेतामध्ये बाजरी पेरली होती. हे बघून एका चिमणीने तिथेच झाडावर घरट केले होते. त्या चिमणीने काही दिवसाने दोन अंडी दिले. काही दिवसाने त्या अंड्यांतून सुंदर पिल्लांनी जन्म घेतला.

त्या शेतातील पीकही आता मोठं जोमदार झालं होतं आणि त्या बाजरीला कणसं आली होती. त्या शेतातील धान्य खाऊन ती पिल्लंही मस्त आनंदात जीवन जगत होती. काही दिवसानंतर ती बाजरी कापून धान्य तयार करण्याची वेळ आली. गावातील सर्व शेतकरी आपापल्या पिकांची कापणी करू लागले. आता चिमणीची आणि तिच्या पिल्लांची घरटं सोडून जाण्याची वेळ आली होती. कारण त्या शेतातील पीकही कधी ना कधी कापलं जाणार होतं. एक दिवस शेतामध्ये शेतकरी त्याच्या बायकोला बोलत असतो की मी उद्या माझ्या मित्राला शेतातील पिक कापायला सांगतो आणि लवकरात लवकर धान्य तयार करून बाजारामध्ये विकून येतो. हे शेतकऱ्याचं बोलण ते छोटे छोटे पिल्लं ऐकत असतात. संध्याकाळी त्या पिल्लांची आई आल्यानंतर ते पिल्लं आईला म्हणतात, "आई आपल्याला आता उद्या हे घरटं सोडून जावं लागणार. कारण या शेताचा मालक उद्या त्याच्या मित्राला हे पिक कापायला सांगणार आहे." पण ती चिमणी म्हणते की नाही आपल्याला उद्याच हे घरटं सोडून जाण्याची गरज नाहीये कारण मला नाही वाटत कि शेतकऱ्याचा मित्र उद्या येईल आणि पिकांची कापणी होईल. हे चिमणीचं बोलणं दुसऱ्या दिवशी खरं ठरलं आणि शेतकरी / त्याचा मित्र पिक कापण्यासाठी आलाच नाही. संध्याकाळी शेतकरी शेतात आला आणि बघतो तर काय शेतातलं पीक जसेच्या तसं होतं. त्याचा मित्र कापणी करायला आलाच नव्हता. हे बघून शेतकरी बडबडू लागला की उद्या मी माझ्या जवळच्या मित्राला कापणी करायला सांगतो. तो तरी हे काम लवकर करेल. शेतकऱ्याचं बोलणं ते चिमणीचे पिल्ले ऐकत असतात. आता त्यांना वाटतं आता खरंच आपल्याला आपल्या अन्नाची सोय करण्यासाठी दुसरीकडे जावं लागणार आहे. ही घडलेली गोष्ट पिल्ले त्यांच्या आईला सांगायला लागली तेव्हा ती चिमणी म्हणाली, "काळजी करू नका त्या शेतकऱ्याचा जवळचा मित्रही उद्या कापणीसाठी येणार नाही" आणि चिमणीच्या बोलल्याप्रमाणे घडलं. शेतकऱ्याचा जवळचा

मित्रही कापणीसाठी आला नाही. त्या चिमणीची पिल्ले आश्चर्यचकित झाले की त्यांच्या आईचे बोलणे खरे कसे काय ठरत आहे? दुसऱ्या दिवशी शेतकरी शेतामध्ये आला. शेता मधलं पीक जसंच्या तसं उभं होतं. शेतकऱ्याचा जवळचा मित्रही आला नाही म्हणून शेतकऱ्याला राग आला. आणि तो परत बडबडू लागला या लोकांना एवढ्या वेळेस सांगूनही हे येत नाहीत. आता उद्या मीच येतो आणि शेतातली पिकांची कापणी करण्यास सुरुवात करतो. हे शेतकऱ्याचं बोलणं चिमणीची पिल्ले ऐकतात आणि आपल्या आईला सांगतात. त्यावेळेला चिमणी म्हणते, "बाळा आता खरंच आपल्याला हे घरटं सोडून जाण्याची वेळ आली आहे. आपल्याला दुसरीकडे जाऊन आपल्या पोटाची व्यवस्था करावी लागणार आहे !" हे ऐकून त्या चिमणीचे पिल्ले आश्चर्यचकित झाले की यावेळेला असं काय घडले की त्यांची आई घरटं सोडायला सांगत आहे. आणि त्या पिल्लांनी त्यांच्या आईला प्रश्न विचारला की आई या वेळेस तू घरटे सोडायला कसं काय तयार झालीस.....?

त्यावेळेला चिमणीने एक छान उत्तर दिलं की बाळा मागच्या दोन्ही वेळी शेतकरी पिकांच्या कापणीसाठी दुसऱ्यांवर अवलंबून होता. मित्रांना काम सांगून तो त्यांच्या भरोशावर राहिला होता.पण या वेळेला असं नाहीये.पिक कापण्याची जबाबदारी त्याने स्वतःवर घेतली आहे. म्हणूनच यावेळेस तो उद्या पिक कापण्यासाठी नक्की येईल आणि त्याच रात्री चिमणी आणि तिची पिल्ले तिथून निघून जातात आणि ती चिमणी बोलल्याप्रमाणे तो शेतकरी दुसऱ्या दिवशी पिक कापायला सुरवात करतो.

मित्रांनो... या गोष्टीतून आपण हे शिकलो की दुसऱ्यांची मदत घेणं हे चुकीचं नाही पण दुसऱ्यांवर अवलंबून राहणं हे चुकीचं आहे.... आपलं काम वेळेवर सुरु होऊन वेळेवर पूर्ण व्हावे असे वाटत असेल तर त्या कामाची जबाबदारी तुम्ही स्वतःवर घेतली पाहिजे. इतरांची मदत घ्या; पण त्यांच्यावर अवलंबून राहू नका.

स्वतःवर पूर्ण विश्वास ठेवा आणि जे कराल ते स्वतःच्या हिंमतीवर करा. यालाच म्हणतात स्वावलंबन...!

**- विश्वनंदा दयानंद नंदवंशी**

बी.ए.प्रथम वर्ष

महात्मा फुले महाविद्यालय,

अहमदपूर जि.लातूर.

****

# शिक्षण हाच प्रगतीचा मार्ग खरा

**'शिक्षणाने येते मनुष्यत्व । पशुत्व हटते पहा ।'** असे माता सावित्रीबाई फुले यांनी म्हटले आहे, खोटे नाही. शिक्षण माणसाला हुशार बनवते आणि माणसातील क्षमतांना बाहेर काढण्यास मदत करते. ज्या क्षमतांच्या बळावर तो संपूर्ण विश्वाला जिंकण्याची धमक ठेवतो. जीवनात शिक्षण नसेल तर त्या जीवनाचा अर्थ कवडीमोल आहे आणि असे कवडीमोल जीवन निरर्थक ठरते. शिक्षण घेण्यासाठी विशिष्ट वय असण्याची गरज नसते की आता तरी शिक्षण घेऊच शकत नाही; आता तर वय झाले, तर मी आपल्याला सांगू इच्छिते की "माणूस हा मरेपर्यंत एक विद्यार्थीच असतो." कोणत्याच व्यक्तीला शिक्षण घेण्यासाठी वयाचे बंधन नाही. फक्त मनात शिकण्याची जिद्द आणि आत्मविश्वास असला पाहिजे. शिक्षण म्हणजे फक्त वह्या खरडणे किंवा पुस्तकांची घोकंपट्टी करणे नाही; तर त्या पुस्तकांचा आधार घेऊन चांगल्या आणि वाईट गोष्टींमधील फरक जाणून घेणे आहे.

शिक्षण म्हणजे जीवन समजणं, शिक्षण म्हणजे स्वत: विचार करणं, शिक्षण म्हणजे समाजासाठी जीव तुटणं, शिक्षण म्हणजे कष्ट करून शकणं, शिक्षण म्हणजे चांगलं माणूस होणं, शिक्षण म्हणजे संकुचितपणा नष्ट होणं... मानवी जीवनात शिक्षणाचे महत्त्व अनमोल आहे.

"हृदयातून दिलेल्या शिक्षणाने समाजात क्रांती घडून येऊ शकते," असे स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी म्हटले होते.स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने शिक्षणाच्या जोरावरच आज प्रत्येक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. आज भारताची संपूर्ण जगात शैक्षणिक क्षेत्रात मुख्य देशांमध्ये गणना होते. पुढील काही दशकांत भारत शिक्षणाच्या बाबतीत जगात अग्रेसर राहील यावर शंका नाही. "जनतेच्या शिक्षणावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते" असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. शिक्षण मनुष्याला आतून आणि बाहेरून तंदुरुस्त ठेवण्यासाठी शिक्षित करण्याचे काम करत असते. सोबतच माणसाला नम्र बनविण्याचे काम शिक्षणच करते आणि विद्या सुध्दा नम्र असलेल्या व्यक्तीवर शोभून दिसते.

माणूस शिक्षणाशिवाय स्वावलंबी बनुच शकत नाही. शिक्षणामुळे स्वतःचाच नव्हे तर सर्व समाजाचा सर्वांगीण विकास होत असतो. म्हणतात ना जर एक पिढी शिकली तर तिच्या समोरील सगळया पिढी शिक्षण घेतात. म्हणजेच पिढ्यानपिढ्या शिक्षणाचे महत्त्व रुजत जाते. याचे माझ्या समोर माझ्या परिवरातीलच मोठे उदाहरण आहे. माझ्या आजोबांना त्यांच्या काळात पुस्तकी

शिक्षण मिळाले नाही. गरीब परिस्थिती व त्या काळातील शैक्षणिक सुविधांच्या अभावामुळे ते शिक्षणापासून वंचित राहिले. पण ते शिक्षणाचे महत्त्व जाणत होते. त्यांनी खूप गरिबीतून, कष्ट करून आपल्या दोन लहान भावांना शिकविले. एक वेळेस ते उपाशीपोटी राहिले पण त्यांच्या भावांना कशाची कमी भासू दिली नाही. एका भावाला डॉक्टर बनविले व एकाला बस कंडक्टर. आजोबांच्या डॉक्टर असलेल्या भावांनी त्यांच्या लेकरांसोबत आजोबांच्या मोठ्या मुलालाही शिकवले. आज ते सुद्धा मुंबईच्या नामांकित टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल मध्ये डॉक्टर आहेत. आजोबांचे छोटा मुलगानरसिंग सांगवीकर आज ते शिक्षक आहेत. तसेच ते नामांकित पत्रकार ही आहेत. त्यांचे सामाजिक क्षेत्रात ही खूप काम आहे. यांची मुलं मुली आज चांगल्या शाळेत उच्च दर्जाचे शिक्षण घेत आहेत. या सर्व प्रगतीचे श्रेय माझ्या आजोबांना जाते. त्यांनी शिक्षणाचे मोल जाणले आणि त्यांच्या पुढील पिढीला शिक्षणाचे महत्त्व सांगितले व स्वावलंबी बनविले.

म्हणून म्हणतेय की, शिक्षण हेच माणसाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारे महत्त्वाचे साधन आहे. आपण जास्तीत जास्त चांगले उच्च आणि दर्जेदारशिक्षण घेतले पाहिजे.

**- मोहिनी मुरारी मेकाले**

बी.ए.द्वितीय वर्ष

महात्मा फुले महाविद्यालय,

अहमदपूर जि.लातूर.

****

**असाध्य ते साध्य | करिता सायास |**

**कारण अभ्यास | तुका म्हणे ||**

# शिक्षण आणि स्वावलंबी जीवन

आजच्या जगामध्ये शिक्षणा शिवाय माणसाला जगणे खूपच अवघड झाले आहे. कारण माणसाला आज समाजातील माहिती जाणून घेण्याचा एक मार्ग हा उपलब्ध आहे तो म्हणजे फक्त शिक्षण आहे. कारण कोणतीही नोकरी करायची असेल तर आपणाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही कोणतीही कंपनी असो; आपले शिक्षण पाहते. कारण अडाणी माणसाला कोणतेही काम करायला लावतात; परंतु आपले शिक्षण पूर्ण झाले असेल तर आपणाला चांगला जॉब लागतो. त्यामुळे शिक्षण घेणे काळाची गरज बनली आहे.शिक्षण नाही घेतले तर गाढवासारखे काम करावे लागते. कारण माणसाला कोणतेही काम करायचे असेल तर आपणाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही. कारण खेडे गावामधे खूप लोक शिक्षण नाही घेत त्यामुळे त्यांचा विकास होत नाही. मात्र शहरातील लोक शिक्षण घेऊन खूप मोठा बिजनेस टाकतात आणि आपण मात्र शेतात काम करतो. दिवसाला २०० रुपये कमावतो. पण शिक्षण घेतलेला माणूस हा एका दिवसात हजारो रुपये कमावतो.त्यामुळे शिक्षण खूप महत्त्वाचे आहे.आपण सर्वांनी शिक्षण घेऊन मोठं झालं पाहिजे. नाहीतर गाय, बैल, शेळ्या मेंढ्या आपणाला राकावे लागतील. त्यामुळे शिक्षण घेणे खूप काळाची गरज बनली आहे.शिक्षणा मुळे समाजात माणसाचा सन्मान करण्यात येतो. कारण त्याला खूप काही नवीन विचार प्राप्त होतात. आपण आज ही पाहतो खेडेगावातील कामगार वर्ग आज ही ऊस तोडणी करणारे मजूर सहा सहा महिने आपले घरदार, गाव, गणगोत सोडून कामाला जातात. मग त्यांची मुले ही शिक्षणा पासून वंचित राहतात. पण त्यांना माहीत नाही की डॉ. बाबासाहेबांनी सुंदर असे वाक्य सांगितले आहे, "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे; जो तो प्राशन करील तो गुर्गुरले शिवाय राहणार नाही" कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिकले, परदेशातून बॅरिस्टर पदवी घेऊन आले तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी हत्ती वरुन त्यांची मिरवणूक काढून वरून साखर वाटली.

आपणाला माहीत आहे, आज ही आपला बहुजन समाज हा शंभर टक्के शिक्षित झाला नाही. कारण गरिबी. पण प्रत्येक तालुक्यावर सरकारी हॉस्टेल आहे आणि सरकारी शाळा पण आहे. त्याठिकाणी काहीही खर्च लागत नाही. अगदी मोफत शिक्षण दिले जाते.आपण आपली मुले तेथे पाठवली पाहिजे.कारण आजच्या जगामध्ये "जो शिकेल तोच टिकेल; नाही तर हुकेल" त्यामुळे आपण सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे. कारण आजच्या काळात आपल्या देशात जर समानता

प्रस्थापित करायची असेल तर आपणाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही. कारण शिक्षणानेच गरीब व श्रीमंत भेदभाव हा नष्ट होईल. माणसाला शिक्षणामुळे स्वतःचा विकास करता येईल. नंतर आपले घर समोर जाईल व आपला समाज देखील समोर जाईल कारण आजच्या २१ व्या शतकामध्ये शिक्षणाशिवाय पर्याय नाही. माझे एकच सांगणे आहे. प्रत्येकाने खूप खूप उच्च शिक्षण घेऊन खूप खूप मोठा माणूस बनला पाहिजे. व समाजाला आदर्श बनविले पाहिजे. धन्यवाद.

**- विखिल सुभाष विभूते**

बी.ए.तृतीय वर्ष

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर.

****

**शिक्षण हे एक प्रभावी अस्त्र आहे, जे वापरुन तुम्ही प्रत्यक्ष जग बदलताना बघू शकता ...**

# शिक्षण: यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली

जीवनात यश, मान-सन्मान आणि ओळख मिळवण्यासाठी, सर्वांसाठी शिक्षण हे आवश्यक साधन आहे. शिक्षण प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कारण ते मानवी जीवनावर सकारात्मकरित्या प्रभाव पाडते. विश्वासार्हतेची आणि परिस्थितिची समज दोन्ही परिमाणांवर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही विचार करण्याची क्षमता प्रदान करते.

शिक्षण ही आपल्या सभोवतालच्या गोष्टींबद्दल शिकण्याची प्रक्रिया आहे. हे आपल्याला कोणतीही वस्तू किंवा परिस्थिती सहजपणे समजून घेण्यास मदत करते, कोणत्याही प्रकारच्या समस्येचे निराकरण करते आणि आयुष्यभर विविध बाबतीत संतुलन राखते. शिक्षण हा सर्व मनुष्यांचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा हक्क आहे. आपण शिक्षणाशिवाय अपूर्ण आहोत आणि आपले जीवन व्यर्थ आहे. शिक्षण आपल्या जीवनात एक ध्येय ठेवण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी प्रेरणा देते.

शिक्षणामुळे आपले ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्व सुधारते. यामुळे आपल्या आयुष्यात इतरांशी बोलण्याची बौद्धिक क्षमता वाढते. शिक्षण परिपक्वता आणते आणि समाजाच्या बदलत्या वातावरणात राहण्याचे शिकवते. हा सामाजिक विकास, आर्थिक विकास आणि तांत्रिक प्रगतीचा एक मार्ग आहे.

ज्ञान, कौशल्य, व्यक्तिमत्त्व निर्माण करुन प्रत्येकाच्या आयुष्यात सुधारणा करुन सभ्य मानवी जीवन तयार करण्यास शिक्षण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. शिक्षण हे एखाद्या व्यक्तीस चांगले आणि वाईट बद्दल विचार करण्याची क्षमता देते.

संपूर्ण जगाच्या समाजामध्ये मानवी संतुलन आणि आयुष्य संतुलन राखण्यासाठी शिक्षण हे एक अतिशय महत्त्वाचे साधन आहे. हे असे साधन आहे, जे प्रत्येकाला पुढे जाण्यासाठी आणि जीवनात यशस्वी होण्याची आणि जीवनात आव्हाने जिंकण्याची क्षमता देते. हा एकमेव आणि एकमेव मार्ग आहे जो कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात आवश्यकतेनुसार ज्ञान संपादन आणि कार्यक्षमता सुधारते. हे आपल्याला आपल्या शरीरात, मेंदू आणि आत्म्यामध्ये चांगले संतुलन निर्माण करण्यास सक्षम करते.

शिक्षण आपल्याला संपूर्ण जीवनात प्रशिक्षण देते आणि आपल्या जीवन मार्गात भविष्यातील विकास आणि सुधारित कारकीर्द मिळविण्यासाठी अनेक संधी उपलब्ध करून देते. आपली जीवन शैली तसेच आपल्या देशाची आर्थिक आणि सामाजिक वृद्धी या साठी

शिक्षणाची आवश्यकता असते. कोणत्याही व्यक्ती आणि देशाचा विकास त्या देशातील शिक्षण पद्धतीवर अवलंबला असतो. शिक्षण प्रसाराचे विविध उपक्रम राबविले नंतरही, देशात असे अनेक खेडे गाव आहेत जिथे आजही अनेक व्यक्ती अशिक्षित आणि शिक्षणा बदल जागरूकता नाही आहे.

तथापि, आतापर्यंत अधिक परिस्थितीत प्रथम सुधारणा आणि सरकारने देशातील शिक्षण सुधारण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. समाजाचे चांगले त्या समाजात राहणाऱ्या लोकांच्या शिक्षणावर अवलंबून असते. योग्य शैक्षणिक पातळी देशाच्या समस्यांसंबंधी समस्या सुधारून आर्थिक आणि सामाजिक समृद्धी आणते.

योग्य शिक्षण आपल्या करिअरच्या ध्येय ओळखण्यास आणि सभ्य पद्धतीने जगण्यास शिकण्यास मदत करते. आपण शिक्षणाशिवाय जीवन कल्पना करू शकत नाही कारण त्याशिवाय आपण निरोगी वातावरण आणि प्रगत समुदाय तयार करू शकत नाही. आयुष्यातील सर्व काही लोक ज्ञान आणि कौशल्य यावर आधारीत आहे, जे स्वत: च्या शिक्षणातून येते. व्यक्ती, समाज, समुदाय आणि देशाचे उज्ज्वल भविष्य शिक्षण व्यवस्थेद्वारे अनुकरण करण्याच्या धोरणावर अवलंबून आहे. जीवनात अधिक तांत्रिक प्रगतीसाठी वाढत्या मागणीमुळे गुणात्मक शिक्षणाचे क्षेत्र वाढले आहे.

शिक्षण ही सर्वात महत्वाची यंत्रणा आहे, जी व्यक्तीच्या जीवनासह देशाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावते. आजकाल, कोणत्याही समाजाच्या नवीन पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा एक महत्त्वाचा घटक बनला आहे.शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता, सरकारने ५ वर्षे ते १५ वर्षे वयाच्या सर्व मुलांना अनिवार्य शिक्षण केली आहे. शिक्षण प्रत्येकाच्या जीवनावर सकारात्मकरित्या प्रभावित करते आणि जीवनाच्या सर्व लहान आणि मोठ्या समस्यांना तोंड देण्यास शिकवते.समाजात समाजासाठी इतका मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेतल्यानंतरदेखील देशातील वेगवेगळया भागात शिक्षण टक्केवारी सारखीच आहे.

शिक्षणाशिवाय जीवन गुंतागुंतीचे आणि कठीण होते. म्हणूनच आपण शिक्षणाचे महत्त्व आणि दैनंदिन जीवनात त्याची गरज समजून घेतली पाहिजे. शिक्षणाचे महत्त्व समजावून, आम्ही प्रोत्साहित करून लोकांना मागासवर्गीय भागात प्रोत्साहित करू. गरीब व्यक्ती देखील श्रीमंत आणि सामान्य जनता, शिक्षण आणि समान अधिकार देखील जागतिक विकास समान आवश्यक आहे. त्यांच्या उत्कृष्ट प्रयत्न आम्हाला सर्व शिक्षण उच्च-स्तरीय प्रवेश सर्व त्या अपंग सर्व गरीब आणि व्यक्ती एक जागतिक आधारावर सहभागी शक्य करावी.

ज्ञान आणि कौशल्याच्या कमतरतेमुळे काही लोक पूर्णपणे निरक्षर झाल्यानंतर अत्यंत

वेदनादायक जीवन जगतात. काही आपल्या दैनंदिन क्रिया निधी जोडण्यासाठी मागास भागात योग्य शिक्षण प्रणाली अभाव आहेत शिक्षित कुशल नाहीत. अशाप्रकारे, आपण सर्वांनी गरीब किंवा श्रीमंत असले तरीही चांगल्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी समान संधी देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वैयक्तिक विकास आणि नागरिकांच्या वाढीशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही.अशा प्रकारे देशाचा व्यापक विकास देशाच्या नागरिकांना उपलब्ध असलेल्या विद्यमान शिक्षण प्रणालीवर अवलंबून असतो. देशातील प्रत्येक प्रदेशात नागरिकांना सर्वोत्तम आणि योग्य शिक्षण प्रणाली प्रदान सामान्य ध्येय गुळगुळीत आणि शैक्षणिक कौशल्य मार्ग राखण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार केला पाहिजे. अशा प्रकारे देश आपल्या सर्वांगीण विकासाकडे वळेल.

**कु. वैष्णवी भुतके**

B.A.T.Y

****

**शिक्षण म्हणजे**
**फक्त वही - पेन नव्हे**
**तर बुध्दीला सत्याकडे,**
**भावनेला माणूसकीकडे,**
**शरीराला क्षमतेकडे नेण्याचा मार्ग**
**म्हणजे शिक्षण ....**

# स्वावलंबी शिक्षण हेच खऱ्या विद्यार्थ्याचे ब्रीद...

'स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय आणि स्वातंत्र्य' हीच खरी शैक्षणिक तत्त्वज्ञानाची चतु:सूत्री आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' गीतेतील या महान संदेशानुसार कोणतेही काम किंवा श्रम हे हलके नसते. काम म्हणजे ईश्वर. त्याच श्रमाला प्रतिष्ठा देण्याचे कार्य, पावित्र्य देण्याचे काम, स्वावलंबनाचा आनंद लुटू देण्याचे महान श्रेय शैक्षणिक तत्त्वज्ञानातून दिसून येते. लहान मुले हीच देशाचे भविष्य घडविणारे असतात. तेव्हा शिक्षणातून देशप्रेम, स्वावलंबन, अन्यायाची चीड, श्रमाची प्रतिष्ठा अशा सद्गुणांचे बाळकडू जर त्यांना पाजले गेले तर निश्चित देशाचा विकास हा घडेल. शिक्षण हेच माणसाच्या पर्यायाने देशाच्या विकासाचे मूळ आहे.

कोणतीही गोष्ट, ध्येय साध्य करायचे असेल तर आपण प्रयत्न केले पाहिजे. यासाठी स्वतःहून मेहनत केली पाहिजे, तेव्हा ती गोष्ट, ध्येय साध्य होते. तेव्हा खूप आनंद होतो. आपल्या मेहनतीने मिळालेले यश आनंददायी असते, म्हणतात ना "प्रयत्नांती परमेश्वर" म्हणून माणसाने नेहमी प्रयत्नशील व स्वावलंबी असले पाहिजे. स्वावलंबी जीवन जगुनच मनुष्याने आपली प्रगती साधली पाहिजे. स्वावलंबनाचा मार्ग जो साकारेल तोच मनुष्य दुसऱ्याचे दुःख समजू शकेल आणि त्याची सर्व कार्य कुशलतेने, सर्वांची हृदय जिंकून आयुष्यात यश संपादन करु शकेल. स्वावलंबनाचा स्वीकार करणे म्हणजे स्वतःवर पूर्ण विश्वास ठेवणे. नशिबावर अवलंबून न राहता आपली क्षमता ओळखून आपली प्रगती साधणे आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे, असे मला वाटते. जगातले सर्वच महान पुरुष स्वावलंबी होते आणि त्यामुळे त्यांनी नेहमी दुसऱ्यांना प्रेरणा देऊन आपले मार्ग प्रशस्त केलेले होते. गुरु वशिष्ठ ने माणसं घडवली होती ती माणसं आपल्या कर्तुत्वाने देव झालीत. एक प्रकारे तेजस्वी स्त्रोत बनली. पण स्वावलंबन, परिश्रम आणि जिद्द ह्या गुणांमुळे ज्यांनी प्रावीण्य मिळवले ते अनेक कार्य करून सिद्धीस गेले म्हणून त्या मानवांना झिडकारले तरी ते उच्च सिंहासनावर आरुढ झाले ते स्वावलंबनाच्या आत्मविश्वासाच्या जोरावर बनले गेले.

जीवनात दुसऱ्याकडून प्रेरणा घेऊ शकता पण जीवनात काय साध्य करायचे ते आपणच ठरवायचे असते ते साध्य करण्यास आपलेच हात आपणास मदत करत असतात. कष्टाशिवाय फळ कधीच मिळत नाही. "देगा देवा पलंगावरी" ही म्हण माणसाला अपयशी करते हे जग इतके वेगाने धावत आहे की एका माणसाने करणे कठीण असते म्हणून महिलांना स्वावलंबी होण्याची गरज वाढलेली आहे.

परावलंबीपणा आपल्याला पराजित करत असतो कमीपणा आणत असतं. जो कुणाची मदत घेत नाही तोच खरा स्वावलंबी असतो, पण आजच्या युगात वेळ प्रसंगी मदत घ्यावीच लागते. वावघ म्हटलं तर कोणाच्या मागे मागे फिरून कोड कौतुक करून पुढे गेलेले ही समाजात दिसतात, पण टिकून राहू शकत नाहीत किती दिवस करणार स्तुति! समोरच्यांना जेव्हा स्वभाव समजतो तेव्हा

खाडकन नजरेतून उतरतो आणि तो विश्वास गमावून बसतो.

**"वह कौन सा उकदा है जो हो नही सकता"**

**"तेरा जी चाहे तो क्या हो नही सकता."**

शिक्षण हे एक प्रभावी अस्त्र आहे, जे वापरून तुम्ही प्रत्यक्ष जग बदलताना बघू शकता. शिक्षक जीवनाचे दार उघडत असतो, तर विद्यार्थ्यालाच त्यातुन प्रवेश करायचा असतो. शरीराला श्रमाकडे, बुध्दीला मनाकडे आणि ह्रदयाला भावनेकडे वळविणे म्हणजे शिक्षण. तन्मयता नसेल तर; विद्वत्ता व्यर्थ आहे. जीवनातील प्रत्येक क्षणी शिकणं म्हणजे शिक्षण.

माणसाने आपल्या आयुष्यात सुख-दुःख मान-अपमान, स्फूर्ती-निंदा, लाभ हानी, प्रिय-अप्रिय ह्या गोष्टी समान समजाव्यात. आयुष्यातला खरा आंनद भावनेच्या ओलाव्यात असतो. स्वातंत्र्य म्हणजे संयम..... स्वैराचार नव्हे. प्रत्येक बाबतीत दुसऱ्याचं अनुकरण करु नका...स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. स्वावलंबी शिक्षण हेच खऱ्या विद्यार्थ्याचे ब्रीद.

स्पर्श न करता विद्यार्थ्याला शिक्षा करता येते तोच खरा शिक्षक! समाजाचा विकास केवळ सत्तेने होत नाहीतो आदर्श शिक्षकांमुळे होतो. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. शब्दांसारखं शस्त्र नाही, त्यांचा वापर जपुनच करावा. विचारवंत होण्यापेक्षा आचारवंत व्हा.

विचार न करता शिकणे हे निरुपयोगी असतेतर न शिकता विचार करणे हे धोकादायक असते. वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन. खरं आणि खोटं यात केवळ चार बोटांचं अंतर आहे. आपण कानांनी ऐकतो ते खोटं आणि डोळ्यांनी पाहतो ते खरं. आयुष्यात खूपदा बुध्दी जिंकते....ह्रदय हरतं पण बुध्दी जिंकूनही हरलेली असतेआणि ह्रदय हरून देखील जिंकलेलं असतं. नेहमी तत्पर रहा....बेसावध आयुष्य जगू नका. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नाही. कले शिवाय जीवन म्हणजे सुगंधा शिवाय फूल आणि प्राणा शिवाय शरीर! बदलण्याची संधी नेहमी असतेपण बदलण्यासाठी तुम्ही वेळ काढला का? आयुष्यात असं काहीतरी मिळव जे तुमच्या पासून कुणीही चोरून घेऊ शकत नाही. हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

अश्रुंनीच ह्रदये कळतात आणि जुळतात. स्वतःची चूक स्वतःला कळली की बरेच अनर्थ टळतात. या ह्रदयीचे त्या ह्रदयी देता येते तोच खरा शिक्षक. माणसाची चौथी मूलभूत गरज म्हणजे पुस्तक. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे. पुस्तके म्हणजे मन निर्मळ करणारा अविश्रांत झरा आहे. पुस्तकांच्या सहवासात शांत आयुष्य वेचण्यासारखा दुसरा आनंद नाही. परीक्षा म्हणजे स्वतःच्या आत डोकावून पाहण्याची संधी! नम्रता ही शिक्षणाची पहिली पायरी आहे. दुसऱ्याचा विचार करायला शिकला तोच खरा सुशिक्षित. ज्ञानाचे अंतिम लक्ष्य सुंदर चात्रित्र्य निर्माण करणे हेच असले पाहिजे. ज्ञान हे पैशापेक्षा श्रेष्ठ आहे, कारण पैशाचे रक्षण तुम्हाला करावे लागते; परंतु ज्ञान तुमचेच रक्षण करते. जो द्रव्य वाढवितो तो काळजी वाढवतो, परंतु जो विद्या वाढवितो, तो मान वाढवतो. चारीत्र्यवान मनुष्यच खरा सुशिक्षित. खऱ्या विद्यार्थ्याला कधीच सुट्टी नसते. सुट्टी ही त्याच्यासाठी नवं काहीतरी शिकण्याची संधी असते. कोणतीही विद्या, ज्ञान कधीच वाया जात नाही. अर्धवट ज्ञानी म्हणजे दुःखाचा धनी. अज्ञानाची फळे नश्वर असतात. ती सकाळी जन्माला येतात आणि सायंकाळी नष्ट होतात. अज्ञानाचा अंधकार जेवढा मोठा आहे, तेवढेच मोठे ज्ञानदीप लावा. सगळे जग हाच तुमचा देश आहे.

त्याचे रुप बदलण्यासाठी मनापासून प्रयत्न करा. आनंदी मन, सुदृढ शरीर आणि अध्यात्मिक श्रध्दा ह्या तिनही गोष्टी लाभणं म्हणजे अमृत मिळणे. श्रध्दा असली की सृष्टीतल्या प्रत्येक गोष्टीत देव दिसतो. सृजनातला आनंद कल्पनेच्या पलीकडचा असतो. जो स्वतःवर प्रेम करू शकत नाही तो जगावर काय प्रेम करणार! ज्यादिवशी आपली थोडीही प्रगती झाली नाही. तो दिवस वाया गेला म्हणून समजा.

- शुभम रामचंद्र गुंजरगे

बी.ए. तृतीय वर्ष

****

**शिक्षण हे एक असं धन आहे;**
**जे तुमच्यापासून कुणीही**
**चोरून घेऊ शकत नाही.**

# स्वावलंबी शिक्षण

स्वावलंबन शब्दाचा सर्वात सोपा अर्थ म्हणजे स्वतःची कामे स्वतः करणे. म्हणजेच दुसऱ्यावर कोणत्याही गोष्टीसाठी अवलंबून न राहणे. स्वावलंबनाचे धडे आपण लहानपणापासून गिरवीत आलो आहोत. "जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग संपला!" या अर्थाच्या अनेक म्हणीही आपण शिकल्या आहेत. तसेच लहानपणापासून शिक्षक, पालक, वडीलमंडळी वेळोवेळी हेच सांगत आली आहेत. परावलंबी होऊ नका. परावलंबी जीवन फार वाईट. हे बाळकडू पिऊनही आपण तसे वागत नाही. अनेकदा आपली फसगत होते. कळतं पण वळत नाही हेच खरं.

आपल्यात हा बदल घडण्याचे मुख्य कारण म्हणजे आपल्याही कामांचे स्वरूप बदलले आहे. आपले दैनंदिन जीवनही एवढे बदलले आहे की, आपल्यासाठी सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळाच आपण बदलल्या आहेत. आपणच आपल्या स्वार्थापायी, हव्यासापायी आपल्या गरजा वाढवत गेलो. कामांचे डोंगर वाढले. व्याप वाढले. ती पूर्ण होण्यासाठी वेळ अपुरा पडू लागला. मग दुसऱ्यांकडून कामे करून घेऊ लागलो आणि जास्त परावलंबी बनू लागलो.

कामांसाठी आपण नोकरचाकर, गाडी-घोडे, वाहन-चालक दिमतीला ठेवले. पण त्यांच्यावाचून किती अडू लागले हे लक्षातच आले नाही. वेळेचे व कामांचे नीट नियोजन करणे व होणे अशक्य झाले.

यावर मात करण्यासाठी विज्ञानाने वरकढी केली. ग्यासस्टोव्ह, कुकर, मिक्सर, फुडप्रोसेसर, वाशिंग मशीन, डिशवाशर या किमयागारांमुळे आपण आनंदाने परावलंबित्व स्वीकारले.पण यंत्रांनी कधी असहकार पुकारला, मदतनिसांनी दगा दिला कि मात्र आपल्या शरीराला, मनाला अतोनात कष्ट होतात. कारण या सर्व अत्यावश्यक गरजा बनल्या आहेत.

या कारणामुळे आपली स्वावलंबनाची सवय कमी झाली. त्यामुळे ताण वाढला. कामे वेळेत पूर्ण नाही झाली की चीडचीड, राग, संताप, अस्वस्थता वाढून आपण हतबल होतो. मग निराशा येते. आत्मविश्वास कमी होतो. शरीर व मन अजूनच कमकुवत बनते. एखाद काम स्वतः दुसऱ्याच्या आधाराशिवाय, हिमतीने, स्वबळाने करण्याच भय वाटू लागते व अपयशाच्या अनेक साध्या साध्या गोष्टीही आपण टाळू लागतो. अनुभवाचे शहाणपण ही नसते आपल्याजवळ. साध्या साध्या गोष्टींचाही बाऊ वाटू लागतो. एकट्याने निर्णय घेणे, पुढाकार घेणे, जोखमीचे काम अंगावर घेणे, एकट्याने प्रवास करणे, बँकेची कामे करणे, पोस्टाची कामे करणे, ऑफिस, खरेदी हे सार आपण टाळू पाहतो. म्हणजेच शारीरिक-मानसिक दुर्बलता, आजार वाढतो. यावर जालीम उपाय म्हणजे आपल्यातले हे दोष, न्यून शोधून त्यावर मात केली पाहिजे. विचारपूर्वक वेळापत्रक बनवून कामांची आखणी केली पाहिजे. मुख्य म्हणजे स्वतः कामे करण्याची सवय लावली

पाहिजे. ती ही आनंदाने. कारण कोणतेही काम कमी दर्जाचे नसते.

स्त्रियांवर तर याची फारच मोठी जबाबदारी आहे.कारण अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या त्याही वेगवेगळया पातळीवर स्त्रीलाच सांभाळाव्या लागतात. तेंव्हा सर्वांनी स्वतः स्वावलंबी बना व कुटुंबाला शिकवा. नाहीतर काय स्त्रीला वाटते नवरा, मुले, सासूसासरे यांना कुठे काम सांगायचे? मग स्वतःच्या कामांचा डोंगर वाढतो. ताण, चीडचीड असे वर सांगितलेले दुर्गुण वाढतात व त्यासाठीही सारा दोष आपलाच असे वाटते. असे करू नका. प्रत्येकाला प्रथम स्वावलंबन शिकवा. स्वतःची पाणी, चहा, खाण्याची भांडी विसळून जाग्यावर ठेवणे, वस्तू जागच्या जागी ठेवणे, निटनेटके ठेवणे, कपडे नीट धुवायला टाकणे, स्वतःचे कपडे घड्या घालून ठेवणे, जेवण स्वतः वाढून घेणे. आवरायला मदत करणे, कचरा पडू न देणे, पडलाच तर दिसेल त्याने उचलणे, लाईट नको असेल तेव्हा बंद करणे व आईला मदत करणे. बाहेरून काही आणून देणे. बँकेची, पोस्टाची, छोटी कामे, फोनचे निरोप, समारंभ असेल तर मदत, मुख्य म्हणजे स्वतःच्या वस्तू स्वतःच नीटनेटक्या ठेवणे. स्वतःचे निर्णय स्वतः घेणे. अश्या जबाबदाऱ्यांमुळे त्यांनाही फायदा व आपलाही फायदा. कारण त्यांचाही आत्मविश्वास वाढतो. माहिती होते. त्यांच्यातील स्वावलंबनामुळे त्यांची हिम्मत वाढेल, अपयशाची भीती कमी होईल. यामुळे काही आपले महत्त्व नाही काही कमी होणार. तर ते आणखीनच वाढेल. एकदा निश्चय केला की जमेल सारे.

जो स्वयेची कष्टत गेला तोची भला...

जीवनात दुसऱ्यांकडून प्रेरणा घेऊ शकता. पण जीवनात काय साध्य करायचे ते आपणच ठरवायचे असते. ते साध्य करण्यास आपलेच हात आपणास मदत करत असतात. कष्टाशिवाय फळ कधिच मिळत नाही. 'देगा देवा पलंगावरी' ही म्हण माणसाला अपयशी करते. आजचे जग इतके वेगात धावत आहे की एका माणसाने करणे कठीण असते म्हणून महिलांना स्वावलंबी होण्याची गरज वाढलेली आहे.

बँकेचे व्यवहार करायचे, भाजी मार्केटला जाणे, किराणा आणणे, ही वृत्ती प्रत्येक महिलेमध्ये असली पाहिजे. स्वसंरक्षण करणे, यासाठी पुरुषांवर अवलंबून न राहता आपले रक्षण करणे, स्वसंरक्षणार्थ तयार व्हायला पाहिजे. शिक्षण घेण्याची वयाला अट नसते, योग्य शिक्षण घेत रहाणे, वाचन केल्याने बुद्धीला चालना मिळत असते. किती ही सुविधा असल्या तरी महिलांनी रिकामे न बसता जे कला-कौशल्य आपल्या जवळ आहे त्याचा पुरेपूर फायदा घेतला पाहिजे. आपल्या मुलामुलींवर चांगले संस्कार करून त्यांना स्वावलंबी जीवन जगण्याची सवय लाविली पाहिजे. जीवनात कधी ही कोणती ही घटना घडू शकते, त्या सर्व गोष्टी लक्षात घेवुन स्वावलंबी जगायला पाहिजे. कुणावर आश्रित होण्यापेक्षा स्वता:समृद्ध व्हावे असं मला मनापासून वाटते. स्वावलंबी व्यक्ती कुठेच असफल होत नाही. जेंव्हा त्याच्या कार्याला तो सर्व काही मानतो. त्याचा फायदा म्हणजेच स्वावलंबनाची पुरचुंडी

सांभाळली तर आपणास हमखास यश मिळवून देत असते.

आज आमच्या पिढीने पैसा म्हणजेच स्वावलंबन हे गणित मांडलं आहे. तुमच्या घरातली कामं करण्यासाठी पैसे देऊन का होईना तुम्ही कोणावर तरी अवलंबून असता म्हणजे खरंच तुम्ही स्वावलंबी आहात का? हल्ली मुलं शिक्षणासाठी, नोकरीसाठी छोटी खोली घेऊन एकटे राहतात. लग्न झाल्यावर बरीच जोडपी वन बीएचके मध्ये राजा राणीचा संसार थाटतात. "छोटं का होईना स्वत:च घर झालं, खऱ्या अर्थाने स्वतंत्र झालो", म्हणतात.. पण घर स्वच्छ ठेवण्यासाठी, स्वयंपाकासाठी दुसऱ्यावर अवलंबून असतात. म्हणजे एका अर्थाने पाहिलं तर घरकामं करणारी बाई स्वावलंबी म्हणावी लागेल कारण, ती जशी घर चालवण्यासाठी कोणावरही अवलंबून नसते, तशीच तिच्या घरातल्या छोट्या मोठ्या कामांसाठी दुसऱ्यांवर अवलंबून नसते .

मदत मागणं वाईट नाही पण अडचण तेवढी गंभीर हवी.आणि आता तर तंत्रज्ञानामुळे सगळ्या गोष्टी अगदी सहज सोप्या झाल्या आहेत.

माझा कामाला बाई ठेवायला विरोध नाही. कधीकधी आवड असूनही सवड मिळत नाही त्यामुळे काही गोष्टींमध्ये मदतीचा हात लागतो. पण मुद्दामच काही कामं राखून ठेऊन स्वत: करण्यात जे समाधान मिळतं त्याला कुठेही तोड नाही.

खऱ्या अर्थाने माणूस स्वावलंबी तेव्हाच होतो जेव्हा स्वत:ची बारीक सारीक कामं करण्यासाठी तो कोणावरही अवलंबून राहत नाही. आणि एक गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी आर्थिक स्वावलंबन हे महत्त्वाचं आहे पण आर्थिक स्वावलंबन आणि खऱ्या अर्थाने स्वावलंबी होणं ह्यात जमीन आस्मानचा फरक आहे.

- नेहा पांडुरंग गुंडरे

बी.ए.तृतीय वर्ष

****

**छोटया प्रयत्नांनी सुरुवात करा**

**मोठं यश नक्की मिळेल ...**

# पर्यटन रोजगारासाठी इतिहासाची भूमिका

एकविसाव्या शतकातील माहिती व तंत्रज्ञानाच्या उद्रेकामुळे पर्यटन क्षेत्राला सोनेरी दिवस आलेले आहेत.पर्यटनात इतिहासाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यटनाच्या अनेक प्रकारांपैकी ऐतिहासिक पर्यटन हा एक प्रकार आहे. या पर्यटन प्रकारात पर्यटक हे भारतातील प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक ऐतिहासीक पर्यटन स्थळांना भेटी देतात. भारताला फार मोठा प्राचीन वारसा लाभला आहे. बौद्ध धर्माची व जैन धर्माची स्थापना भारतात झाली. त्यामुळे बौद्ध धर्मिय पवित्र स्थळांना भेटी देण्यासाठी प्राचीन कालखंडातसुद्धा अनेक परकीय आलेले दिसून येतात. प्राचीन कालखंडात मोठ्या प्रमाणात लेण्याची निर्मिती झाली. यात आज जगप्रसिद्ध लेण्या म्हणून मराठवाड्यातील अजिंठा व वेरूळ लेण्याची ओळख आहे. या ठिकाणांना जगभरातील अनेक पर्यटक भेटी देण्यासाठी येतात. तर मध्ययुगातील कालखंड हा मोठ्या मोठ्या वास्तू व स्मारकांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. या ठिकाणांना भेटी देण्यास पर्यटकांची संख्या मोठी असल्याचे दिसून येते. या ऐतिहासिक पर्यटन स्थळाविषयी थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे पाहता येईल.

१) स्मारके :- जगातील सात आश्चर्यापैकी एक असलेले आग्रा येथील ताजमहाल या ऐतिहासिक स्मारकाला भेटी देण्यासाठी वर्षभर देशी-विदेशी पर्यटकांची गर्दी असते. त्याचबरोबर विजापूर येथील गोलघुमट असेल, हैद्राबाद येथील चारमिनार असेल, दिल्ली येथील कुतुबमिनार असेल, दक्षिणेचा ताजमहाल म्हणून प्रसिद्ध असलेला बीबी का मकबरा असेल या ऐतिहासिक स्मारकांना भेटी देण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात.

२) लेणी :- लेणं म्हणजे दागिना. लेणं या शब्दापासून लेणी या शब्दाची उत्पत्ती झाली असावी. भारतात जवळपास १२०० लेण्यांचा शोध आजपर्यंत लागला आहे. या लेण्याची निर्मिती इतिहासात प्रसिद्ध असलेल्या राजवंशाच्या काळात झालेली आहे. या लेण्यात अजिंठा, वेरूळ, शिऊर, धाराशिव, भाजे बाराबार, खंडगिरी, अंबाजोगाई, कार्ले, जुन्नर, कान्हेरी, कुडा, पाली, पितळखोर, खरोसा, बदामी, औरंगाबाद ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेणी ठिकाणे आहेत. यात बौद्ध, जैन आणि हिंदू धर्मिय लेण्या कोरण्यात आलेल्या दिसून येतात. अजिंठा येथील बौद्ध धर्मिय लेण्या तर जगप्रसिद्ध आहेत. या लेण्यातील शिल्पाबरोबर रंग-संगतीचा वापर अत्यंत कुशलतेने केलेला दिसून येतो. तर वेरूळ येथील लेण्या ह्या बौद्ध, जैन आणि हिंदू धर्मिय आहेत. यातील १६ व्या क्रमांकाची कैलास लेणी महत्त्वपूर्ण आहे. या लेण्यांना भेटी देण्यासाठी देशी-विदेशी पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असलेली दिसून येते.

३) किल्ले :- मध्ययुगीन कालखंडात मोठ्या प्रमाणात किल्ला या ऐतिहासिक वास्तुची निर्मिती झालेली दिसून येते. या ऐतिहासिक वास्तूंना भेटी देण्यासाठी आज मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होत असलेली दिसून येते. सध्या पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र म्हणून किल्ल्याचे ठिकाण असल्याचे दिसून येते. यात दिल्लीचा लाल किल्ला, कंधारचा कुवणदूर्ग किल्ला, दौलताबादचा देवगिरी, नळदुर्गचा नळदुर्ग किल्ला, परंड्याचा किल्ला, औश्याचा किल्ला, किल्लेधारूरचा महादूर्ग, महाडचा रायगड, कोल्हापूरचा पन्हाळा आदी

महत्त्वपूर्ण किल्ले असल्याचे दिसून येते. या किल्ल्यांना भेटी देण्यासाठी देशी-विदेशी पर्यटकांची मोठ्याप्रमाणात गर्दी होत असल्याचे दिसून येते.

४) ऐतिहासिक कलाकृती :- प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात भारतात ऐतिहासिक कलाकृती मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या दिसून येतात. यात धार्मिक, लौकिक कला व मूर्तीशिल्पांचा समावेश होतो. भारतात आज मोठ्या प्रमाणात पुराण वस्तुसंग्राहालये आहेत. या पुराणवस्तुसंग्रहालयात विविध ऐतिहासिक कलाकृतींचा संग्रह केलेला आहे. भारतात ऐतिहासिक स्थळांवर उत्खनन करून त्या ठिकाणी सापडलेल्या वस्तु ठेवण्यात आलेल्या आहेत. या पुराणवस्तुसंग्राहालयाला भेटी देण्यासाठी व प्राचीन भारताची संस्कृती, चालीरिती, परंपरांचा अभ्यास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात इतिहासप्रेमी पर्यटक भेटी देत असल्याचे दिसून येते. या वास्तुसंग्राहालयात तेर येथील रामलिंगप्पा लामतुरे वास्तुसंग्रहालय, कंधार येथील जलतुंग वास्तुसंग्रहालय, औरंगाबाद येथील वस्तुसंग्रहालयाचा समावेश असल्याचे दिसून येते.

थोडक्यात लेणी, स्तूप, किल्ले, मंदिरे आणि ऐतिहासिक कलाकृतींना इतिहासाच्या व पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या ऐतिहासिक वास्तूंवर आणि इतिहासावरच ऐतिहासिक पर्यटन अवलंबून आहे. ऐतिहासिक वास्तू पर्यटनाचा प्रमुख आधार आहे. त्यामुळे पर्यटनात इतिहासाची भूमिका महत्त्वाची ठरते. म्हणूनच रोजगार निर्मिती मध्ये पर्यटनाचे खूप महत्त्वपूर्ण असे स्थान आहे, हे जगातील सर्वांना सर्वमान्य असे तत्त्व आहे. आज जग हे ग्लोबल व्हिलेज झाले आहे, त्यामुळे आर्थिक प्रगतीसाठी पर्यटन हाच एक महत्त्वपूर्ण रोजगार उपलब्ध झालेला आहे. म्हणूनच तर विद्यार्थ्यांनी पर्यटन व्यवसायात येण्याची गरज आहे.

- विश्वनंदा दयानंद नंदवंशी
बी. ए. प्रथम वर्ष

****

**पर्यटन ...**

**आपल्या देशातील सौंदर्य, कला , इतिहास, भाषा आणि संस्कृतीचा सांस्कृतिक वारसा जपते.**

# पर्यटक निवास व्यवस्थेतून रोजगार निर्मिती

पर्यटन उद्योग हा एक विकासात्मक उद्योग आहे. पर्यटनाची मुख्य तीन अंगे आहेत. त्यात पर्यटन केंद्र, वाहतुक आणि निवासस्थान यांचा समावेश होतो. आधुनिक पर्यटनात पर्यटनाशी संबंधीत असणाऱ्या प्राथमिक सहाय्यक व्यापाऱ्यांमध्ये सामंजस्य साधणे गरजेचे आहे. वाहतूक आणि निवास यांचे महत्त्वपूर्ण स्थान पर्यटनात आहे.

"निवासस्थान म्हणजे पर्यटकांचे आपल्या घरापासून दूर असलेले तात्पुरत्या काळाचे घरच असते." निवासस्थानांच्या रचनेत प्रत्येक देशाचे स्वतंत्र प्रतिबिंब उमटलेले असते.पर्यटनाच्या दृष्टीने निवासस्थान एक उद्योग असा विचार केला तर पर्यटन उद्योगात असणाऱ्या असंख्य घटकापैकी निवासस्थान हा एक महत्वपूर्ण घटक आहे. पर्यटन हे आर्थिक स्त्रोतांचे माध्यम आहे. पर्यटनाच्या प्रमुख उद्देश्यामध्ये आर्थिक लाभ, रोजगार उपलब्धी आणि विदेशी चलन प्राप्ती यांचा समावेश होतो. निवासस्थान या प्रमुख अंगाचा विचार केला तर या सहाय्यक उद्योगातून पर्यटनाचे तिन्ही उद्देश साध्य होतात. निवास एक विस्तृत शब्द आहे त्याच्या अंतर्गत पर्यटक अल्प कालावधीसाठी निवासस्थानी राहतो. व्यक्तिसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा निवासस्थानी उपलब्ध असतात.

पर्यटन व्यवसाय हा रोजगार उपलब्ध करून देणारा व्यवसाय आहे. भारतात एका आर्थिक संशोधन संस्थेच्या अंदाजानुसार इ.स.१९७५ मध्ये भारतात ९,३३,००० लोकांना रोजगार मिळाला. हा रोजगार पर्यटनाच्या मार्फत मिळाला यात मोलाचा वाटा निवासस्थानाचा आहे. तसेच १९७५ मध्ये ९१८६ कोटी परकीय चलनाची प्राप्ती झाली. यातही निवासस्थान या उद्योगाचा मोलाचा वाटा आहे. या व्यवसायाच्या माध्यमातून जवळपास २.१ टक्के रोजगार निर्मिती झाली. यात निवासस्थान उद्योगाचा वाटा सर्वाधिक महत्त्वाचा आहे.

निवास स्वरूप आणि प्रकार :

पर्यटनातील निवासव्यवस्थेसंबंधीचा इतिहास अतिप्राचीन आहे. प्राचीन काळात सुद्धा मोठ्या प्रमाणात धार्मिक पर्यटन होत होते. अनेक प्रवासी धार्मिक स्थळांना भेट देत असत. त्यातून मठ संस्कृती उदयास आली. तीर्थयात्रेकरूंची सोय मठात केली जात असे. तसेच चैत्य व विहार हे सुद्धा निवासव्यवस्थेचे प्रकार होत. तर अफगाण बाहशहा सुरी यांच्या काळात सराई नावाचा निवास प्रकार अस्तित्त्वात होता. आधुनिक काळातील निवास व्यवस्थेचे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

१) हॉटेल :- निवासस्थानाच्या प्रकारामध्ये येणाऱ्या हॉटेल्स या संस्थेला पर्यटनाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. हॉटेल या संस्थेची निर्मिती इ.स. १३१२ मध्ये पॅरिस येथे झाली. पुढे इटली, हॉलंड, जर्मनी इत्यादी विविध ठिकाणी या हॉटेलची निर्मिती करण्यात आली.

वेबस्टार यांची व्याख्या :- "जी वस्तू किंवा संस्था निवास आणि खाद्यपदार्थ संदर्भातील सेवा जनतेस उपलब्ध करून देते तिला हॉटेल म्हणतात."

भारतामध्ये ब्रिटीश राजवटीत हॉटेल व्यवसायास सुरुवात झाली. इ.स. १९०३ मध्ये

जमशेदजी टाटा यांनी मुंबईत ताजमहल हॉटेल सुरु केले. इ.स. १९५५ मध्ये भारत सरकारने पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन विविध तारांकित हॉटेल्सची निर्मिती केली. सरकारी क्षेत्रातील पहिले हॉटेल म्हणजे इ.स. १९५६ ला सुरू झालेले दिल्लीतील अशोक हॉटेल होय.

आतंरराष्ट्रीय हॉटेल्सची विभागणी १ ते ५ अशा तारांकित गटात करण्यात आली आहे. या हॉटेल्समध्ये २४ तास सेवा उपलब्ध असून चलन बदलून मिळण्याची सुविधा असते.

२) मोटेल्स :- मोटेल हा निवासाचा खास अमेरिकन प्रकार आहे. या निवास प्रकाराचा उद्देश म्हणजे स्वयंचलित वाहनाने पर्यटन करणाऱ्या पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून देणे ज्यात निःशुल्क पार्किंग, गॅरेज आणि ॲटो सुविधा यांचा समावेश होतो. हॉटेल्सच्या तुलनेने मोटेल्स स्वस्त दरात सुविधा प्रदान करतात. मोटेल्स हे शहराच्या बाहेर मुख्य मार्गावर किंवा चौकात निर्माण केले जातात. मोटेल्सचे पण अनेक प्रकार आहेत. काही केवळ आवश्यक सुविधा प्रदान करतात. तर काही मोटेल्स आरामदायक सुविधाही प्रदान करतात. मोटेल्स ही संकल्पना सर्व प्रथम अमेरीकेत सफल झाली. हा एक महत्वपूर्ण प्रकार आहे.

३) तंबु :- या प्रकारची निवासव्यवस्था हंगामी स्वरूपाची असते. एखाद्या पर्यटन क्षेत्रात काही काळापुरता निवास करण्यासाठी याचा उपयोग होतो. उदा. नाशिक येथे कुंभमेळयाला, पंढरपुरला आषाढी एकादशीला किंवा कार्तिकी एकादशीला या काळात पर्यटकांची सोय या तंबुत केली जाते. तसेच पर्यटनाच्या ठिकाणी शिबीराचे आयोजन केले असल्यास निवासासाठी तंबू हा प्रकार वापरला जातो.

४) युवा वसतिगृह :- शैक्षणिक उद्देश साधण्यासाठी देश-विदेशातील युवक वर्गाला माफक स्वरूपात निवास सुविधा प्रदान करणारी इमारत म्हणजे युवा वसतीगृहे होय. या ठिकाणी समाजातील राष्ट्रीय विचारांचे युवक एकमेकांच्या संपर्कात येतात. अशी महाविद्यालयाच्या बाहेरील ज्ञान प्राप्तीचे हे एक स्थान आहे. युवा वसतिगृहामुळे युवा पर्यटन विकसीत होण्यास मदत होते.

५) पर्यटक बंगले :- मुख्य पर्यटन केंद्राच्या बाहेर महत्त्वपूर्ण स्थानी कमी खर्चातील योग्य अशी निवासव्यवस्था म्हणजे पर्यटक बंगले होय. पर्यटन केंद्रामध्येच स्थित असणारे बंगले मध्यमवर्गीय स्वदेशी आणि विदेशी युवा पर्यटकांना सुविधा प्रदान करतात. मध्यमस्तरीय दरामध्ये निवास व्यवस्थेची निर्मिती या पर्यटक बंगल्यामार्फत होते. अशा बंगल्याची निर्मिती राष्ट्रीय मार्गावरील पर्यटन केंद्राच्या ठिकाणी होणे गरजेचे आहे. देशी आणि विदेशी पर्यटकांची संख्या जेथे जास्त आहे, तेथे या पर्यटक बंगल्याची निर्मिती व्हावी या बंगल्यामध्ये मैदान, बाग, नौकाविहार इत्यादींची सुविधा असणे गरजेचे आहे.

६) सर्कीट हाऊस :- ही निवासाची सुविधा केवळ सरकारी कर्मचाऱ्यांनाच असते. म्हणुनच या निवास प्रकाराचा वापर मर्यादित होतो. जोधपूर

या ठिकाणी सर्कीट हाऊस आहे. पर्यटन केंद्री या सर्कीट हाऊसची निर्मिती झाली पाहिजे.

७) फॉरेस्ट हाऊस :- पर्यटकांच्या निवासाची व्यवस्था वनविहारात अथवा राष्ट्रीय उद्यानात केलेली असते. त्यालाच फॉरेस्ट हाऊस म्हणतात. उदा. काझीरंगा वनविहार, बांदीपूर वनविहार, म्हैसूर, भरतपूर पक्षीविहार अशा प्रकारच्या वनविश्राम गृहात पर्यटकांच्या सर्व सोयी असतात.

८) विश्रामगृह :- या प्रकारचे निवासस्थान एखाद्या आठवडा किंवा महिन्यासाठी निवासाची व्यवस्था प्रदान करते. विश्रामगृहात राहणाऱ्या पर्यटकांकरताच येथील सुविधा मर्यादीत असतात. अशा निवास सुविधांचे आरक्षण करणे गरजेचे असते. महिलांसाठी व विद्यार्थ्यांसाठी अशी विश्रामगृह निर्माण करण्यात आली आहेत.

९) अवकाशकालीन ग्राम :- दुसऱ्या महायुद्धानंतर पाशात्य देशात ही संकल्पना पुढे आली. अशा ठिकाणी विस्तृत स्तरावर खेळ, घोडेस्वारी, जलक्रिडा, मनोविनोद सुविधा इत्यादी सर्व सुविधा निवास आणि भोजनव्यवस्थेसोबतच पर्यटकांना मिळतात. ही निवासव्यवस्था समुद्रकिनारी आणि पर्यटन स्थळी असते. धनसंपन्नता असणारे पर्यटकच अशा ठिकाणी राहतात.

१०) हाऊसबोट :- नदी सरोवराच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था म्हणून पाण्यावर तरंगणारी हाऊस बोट हे पर्यटकांचे आकर्षण आहे. या ठिकाणाच्या सोयी उच्च दर्जाच्या असतात. यांच्या मागील बाजूस याचा मालक निवास करीत असतो.

निवासव्यवस्थेचे महत्त्व :

१) पर्यटकाचे विशिष्ट कालावधीपुरते घर.

२) निवासव्यवस्थेतून संस्कृतीचे दर्शन.

३) निवास व्यवस्थेतून रोजगार निर्मिती

४) आकर्षक निवास व्यवस्थेमुळे पर्यटकांना आकर्षित करता येते.

शंकर कदम
बी. ए. द्वितीय वर्ष

****

**⇨ पर्यटन हे सार्वजनिक आणि खासगी उत्पन्नाचे निरंतर स्त्रोत आहे.**

**⇨ पर्यटनामुळे हॉटेल, उद्योग, आतिथ्य उद्योग, सेवा, करमणूक आणि परिवहन क्षेत्रांत रोजगाराची संधी मिळते.**

# स्वावलंबनाचा मूलमंत्र - कमवा आणि शिका

जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः कमावणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यासाठी विविध विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये कमवा आणि शिका ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबविली जाते. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे असे म्हणतात परंतु प्रत्येकालाच ते मिळते असे नाही कारण ज्या लोकांना दोन वेळचे जेवण नशिबी नसते असे लोक शिक्षणाबद्दल विचारही करू शकत नाही . अशाच लोकांसाठी कमवा आणि शिका योजना आणली गेली होती. कमवा आणि शिका याची सुरुवात महाराष्ट्रात जरी झाली असली तरी, आज कमवा आणि शिका योजनेचा प्रसार आणि प्रचार भारतातच नाही तर संपूर्ण जगात झालेला आहे.

'वाचाल तर वाचाल' हा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना देऊन ठेवला आहे. शिक्षणाचे महत्त्वही आज सर्वमान्य झाले आहे. त्याचबरोबर हेही मान्य आहे की, आजकाल कोणतेही शिक्षण घ्यायचे ठरवले तर त्यासाठी खर्च खूप येतो. प्राथमिक शिक्षण सरकारने मोफत केले आहे. मुलींसाठी माध्यमिक शिक्षणही मोफत आहे. परंतु यशस्वी जीवन जगण्यासाठी केवळ शालेय शिक्षण पुरेसे नाही. त्यासाठी उच्च शिक्षण किंवा काहीतरी व्यवसाय शिक्षण किंवा धंदेशिक्षण घेणे नितांत आवश्यक असते.

सगळ्याच विदयार्थ्यांच्या पालकांना आर्थिकदृष्ट्या हे शक्य नसते. शिक्षण तर घ्यायचे आहे; पण 'दामाजीची कृपा' नाही. मग काय करायचे? या प्रश्नाचे उत्तर आहे, 'कमवा आणि शिका'.

'कमवा आणि शिका' ही कल्पना काही आपल्याला नवीन नाही. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खेडोपाडी हिंडून मुले गोळा केली आणि त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. तेव्हा त्या योजनेचा पाया होता, 'कमवा आणि शिका.' कष्ट करा, शेतात राबा, स्वतःचे पोट भरण्याची व्यवस्था करा आणि शिक्षण मिळवा, अशी त्यामागील कल्पना होती.

प्राचीन काळी विदयार्थी ज्ञानसंपादन करण्यासाठी गुरुच्या घरी जात. या आश्रमांना राजाचा व धनिकांचा आश्रय असे. मात्र शिष्यांना तेथे कष्ट करावे लागत. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णालाही सांदिपनी ऋषींच्या आश्रमात कष्ट करावे लागले होते. या शिष्यांना गुरुगृही घरातील कामांपासून ते शेतीपर्यंतची अंगमेहनतीची सर्व कामे करावी लागत. साहजिकच या कामात ते कुशल बनत असत. जीवनाला आवश्यक असे प्रशिक्षणच तेथे मिळे.

अनेकदा बेकारांच्या बाबतीत विचित्र परिस्थिती उद्भवते. कामाचा अनुभव नसल्यामुळे त्यांना नोकरी मिळत नाही आणि नोकरी नसते म्हणून अनुभव मिळत नाही. परिणामी त्यांना घरीच बसावे लागते. यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून सुद्धा 'कमवा आणि शिका' ही संकल्पना राबवली जाते.

अशी सुविधा असलेल्या संस्थेत अननुभवी तरुणांना 'शिकाऊ उमेदवार' म्हणून नेमतात. त्यांना विशिष्ट प्रकारचे काम शिकवले जाते. त्यात त्यांना कुशल बनवतात. या काळात त्यांना पगार मिळत नाही; पण बऱ्यापैकी रक्कम विदयावेतन म्हणून देतात. त्यामुळे शिकणाऱ्याला हुरूप येतो. शिकण्याचे काम अगदीच फुकट गेले असे वाटत नाही आणि शिकल्यानंतर नोकरी नक्की मिळेल, याची खात्री असते. खरे तर हीच पद्धत सर्वच ठिकाणी वापरली पाहिजे; अगदी बँका, सरकारी

कचेऱ्या येथेसुद्धा. यामुळे बेकारीची समस्या सुटण्यास मदत होईल.

अशाप्रकारे रयत शिक्षण संस्थेमध्ये कमवा आणि शिका या योजनेची सुरुवात करणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे महान शिक्षण महर्षी होते. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कमवा आणि शिका या योजनेमुळे महाराष्ट्रात आणि भारतात हजारो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. आज कमवा आणि शिका या योजनेतील लाभार्थी विद्यार्थी भारतातच नाही तर जगभरातील विविध क्षेत्रात गगन भरारी घेतलेले आहेत. म्हणूनच आपल्या लेकरांना चांगले संस्कार करण्यासाठी लहानपणापासूनच त्यांना स्वावलंबी जीवन बनण्यासाठी कमवा आणि शिका योजनेचे महत्त्व सांगितले पाहिजे. कमवा आणि शिका योजनेत शिकलेले विद्यार्थी आयुष्यभर आपल्या परिवाराची आपल्या देशाची आणि मानवतेची काळजी करतात आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत इमानेइतबारे जीवन जगतात आणि मानवतेची सेवा करतात.

- कोमल शिवाजीराव सूर्यवंशी

बी ए प्रथम वर्ष

****

**जीवनातला तिमिर जावा, प्रबोधनाची पहाट व्हावी**

**इथे लाभले पंख लेवूनी, उंच भरारी नभात घ्यावी ...**

# स्वावलंबनासाठी काळानुरूप शिक्षण

मानवी मूल्य, विचार, राहणीमान आणि गरजा या काळानुसार बदलत असतात आज देखील आपण कालबाह्य झालेल्या शिक्षण पद्धतीचा अवलंब करीत आहोत. आज रेडिओची जागा मोबाईलने घेतली आहे. या काळात जर आपण विद्यार्थ्यांना रेडिओ दुरुस्तीचे तंत्र शिकवीत असेल तर निश्चितच आपल्या मागून अविकसित राष्ट्र आपल्या पुढे निघून जातील. आज संपूर्ण जगावर तंत्रज्ञानाचा पगडा कोणाचा असेल तर तो चीन आणि जपान सारख्या राष्ट्राचा आहे. अमेरिके विरुद्धच्या विश्वयुद्धामध्ये जपान सारखे राष्ट्र त्या काळी बेचिराख झाले होते; पण त्यांनी त्यांच्या शिक्षण व्यवस्थेचा बळावर आज पुन्हा नव्या जोमाने उभे आहेत.

आपल्या देशामध्ये आज देखील कुशल मजुरांची कमतरता आहे. कारण आपण त्यांना काळानुरूप शिक्षण दिलेले नाही. त्यांना कला शाखेचे विषय आपण शिकविणे त्यातून त्यांना त्यांच्या स्वावलंबनासाठी शिक्षण हे मिळालेच नाही स्वावलंबी विद्यार्थी घडवायचा असेल तर त्याला त्याच्या आवडीचे शिक्षण देणे आवश्यक आहे ज्यातून तो स्वावलंबी नागरिक बनेल.

**- पवन कुमार कराड**

B.A.T. Y.

****

**स्वावलंबी शिक्षण हेच प्रगतीचे लक्षण**

# स्वावलंबनासाठी आधुनिक शिक्षण

एकोणिसाव्या शतकामध्ये संगणक क्रांती झाली. याला अनेक लोकांनी त्याकाळी विरोध केला होता. मोठमोठे मोर्चे काढले होते. कारण संगणकामुळे अनेकांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या होत्या मात्र या आधुनिक युगात या संगणकामुळे नेमके उलट झाले. आज आधुनिक शिक्षण पद्धतीतील शिक्षणामुळे विद्यार्थी हा स्वावलंबी बनलेला आहे. त्याला उत्पन्नाच्या अनेकना मी संधी उपलब्ध झाल्या आहेत. ते ही आपल्या स्वतःच्या राहत्या गावांमध्ये आज गावागावात इंटरनेट कॅफे असतील किंवा ऑनलाइन सेंटर असेल. यातून विद्यार्थ्यांना एक रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहे. २०२० - २१ मध्ये थैमान घातलेल्या "कोरोना" सारख्या आजारामुळे बरच काही ठप्प झालं होतं मात्र या आधुनिक शिक्षणामुळे आपण घर बसल्या आपले कार्यालयीन काम असेल किंवा शिक्षण असेल ऑनलाईनच्या माध्यमातून पूर्ण करू शकलो. यासाठी आधुनिक शिक्षणाचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. यातूनच स्वावलंबी विद्यार्थी घडण्यास प्रेरणा मिळाली.

**- संगीता दुबळे**

B.A. S.Y.

****

**"स्वावलंबी शिक्षण घेऊया, शिक्षणक्षेत्राला नवी दिशा देऊ या"**

# स्वावलंबनासाठी अपारंपरिक शिक्षण

लॉर्ड मेकाले इंग्रज अधिकाऱ्यांनी निर्माण केलेल्या शिक्षण पद्धतीचा वापर आज देखील आपल्या देशात केला जातो. यांच्या शिक्षण पद्धतीला अनेक लोकांनी विरोध हा केला होता. कारण ही शिक्षण पद्धती कारकून निर्माण करण्याची शिक्षण पद्धती म्हणून ओळखले जाते. आज जगामध्ये चीन सारखे राष्ट्र आर्थिक दृष्ट्या सक्षम होताना दिसत आहेत. कारण त्यांनी काळानुरूप आपल्या शिक्षण पद्धतीत बदल करून घेतला. त्यामुळे त्यांच्या राष्ट्रात आयाती पेक्षा निर्यात मोठ्या प्रमाणात केली जाते.

आज आपल्या देशामध्ये विद्यार्थ्यांच्या आवडी नुसार शिक्षण दिले जात नाही. त्यांना आवडणारे शिक्षण हे बळजबरीने घ्यावेच लागते. त्याला स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने शिक्षण घेण्याची इच्छा असून देखील घेता येत नाही. विद्यार्थ्यांना वस्तू निर्मिती क्षेत्राचे कौशल्य अभ्यास क्रमातून शिकविणे आवश्यक आहे. त्यासंदर्भातील वेगवेगळ्या कार्यशाळा घेणे आवश्यक आहे. आज या अपारंपरिक शिक्षणाची कास सोडून आधुनिक शिक्षणाची कास धरण्याची गरज राष्ट्राला आहे.

**प्रसाद डावरे**

B.A. F.Y.

****

**ओलें मूळ भेदी खडकाचे अंग |**
**अभ्यासासी सांग कार्य सिद्धी ||**

**- संत तुकाराम**

# स्वावलंबी शिक्षणाचे प्रणेते : कर्मवीर भाऊराव पाटील

"Self help Education is our Moto" या ध्येयाने कर्मवीर भाऊराव पाटलांनी आयुष्यभर कार्य केले. २२ सप्टेंबर १८८७ मध्ये कोल्हापूर जिल्हातील कुंभोज या गावी त्यांचा जन्म झाला. त्यानी विटा या गावातून पाचवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. तर कोल्हापूर येथील राजाराम विद्यालयातून इयत्ता सहावी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. कर्मवीर भाऊराव पाटलांनी आत्मारामपंत यांच्या काच कारखान्यात प्रचारक म्हणून काम केले. पुढे लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्याबरोबर किर्लोस्कर वाडी येथे काम केले. यानंतर धनाजीशहा कुपर यांच्या बरोबर भागीदारीत काम करू लागले. करारानुसार नफ्याचा काही भाग शिक्षणावर खर्च करण्यास कुपर यांनी नकार दिल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला व त्यानंतर त्यांनी स्वतःला शिक्षण कार्यात झोकून दिले. या काळात ते सत्यशोधक समाजाच्या कार्यात सहभागी होत असत.

शिक्षणक्षेत्रातील कार्यात त्यांनी शिक्षक म्हणून प्रारंभ केला सातारा येथे खाजगी शिकवणी घेत असत. १९०९ मध्ये सातारा जिल्ह्यातील दुधगाव येथे त्यांनी "शिक्षण प्रसारक संस्थेची" स्थापना केली व दुधगांव विद्यार्थी आश्रम नावाचे वसतीगृह देखील सुरू केले. समाजातील सर्व मुलांना शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी त्यांचे प्रयत्न चालूच होते त्याचा प्रारंभ ४ ऑक्टोंबर १९१९ रोजी काले येथे  रयत शिक्षण संस्थेची स्थापना आणि वस्तीगृहाने झाली सन १९२१ रोजी नेर्ले या गावी दुसरी प्राथमिक शाळा व रात्र शाळा सुरू केली सन १९२४ मध्ये सातारा येथे वसतिगृह सुरू केले. कर्मवीरांनी पुणे येथे १९३२ मध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था व्हावी यासाठी युनियन बोर्डिंग ची स्थापना केली. विद्यार्थ्यांना सर्वच बाबतीत स्वावलंबी बनवले पाहिजे ही शिकवण व सामाजिक ऐक्याची भावना वसतिगृह द्वारे जोपासली जावी. शिक्षणातून विद्यार्थी स्वावलंबी बनले पाहिजेत. हा दृष्टीकोण विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटलांनी केले.

विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास स्वतःची कामे करण्याबरोबर दररोज एक तास कष्टाची कामे करावी लागत असत. या विद्यालयात स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा या मूल्यांची जोपासना करावी लागत असे. स्वावलंबनाची प्रेरणा कर्मवीरांच्या कार्याच्या विशेष ठेव आहे. यासाठी त्यांनी विद्यार्थीदशेतच स्वावलंबनातून शिक्षण घेण्याची प्रेरणा दिली. कमवा व शिका या योजनेचा लाभ घेऊन अनेकांनी आपले शिक्षण पूर्ण केले. खऱ्या अर्थाने कर्मवीर भाऊराव पाटलांनी शिक्षणातून स्वालंबन कसे साध्य करता येईल. याविषयी मोठे कार्य केले आहे. त्यांच्या कार्याचा हा अल्पसा गुणगौर केले आहे.

- कोमल पोले
बी. ए. व्दितीय वर्ष

# कविता

स्वावलंबी शिक्षणाची
धरूया कास
आपणच होऊया
आपल्या जीवनाचे शिल्पकार
कमवा व शिका योजनेत
होऊया सामील
शिक्षणाबरोबर कमवण्याची मिळेल नामी संधी
जिद्द चिकाटी आणि मेहनत
हेच शिक्षणाचे मूलमंत्र
हाताला घट्टे अन जगतानाचे चटके
हेच आमचे आदर्श
शिक्षणातून स्वावलंबनाची
उजडेल नवी पहाट
उद्या येथे कोणीच
नाही राहणार बेकार
तांत्रिक शिक्षणाने
काम धंदा शेती अन
व्यवसाय होईल समृद्ध
शिक्षणातून साध्यहोतील
नवनवीन कौशल्य

- ऐश्वर्या देवकत्ते
बी. ए. व्दितीय वर्ष

****

# व्यावसायिक शिक्षण ही काळाची गरज

आधुनिक युगात शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाची जोड देणे काळाची गरज आहे. व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून कोठारी आयोगाने १९६४ मध्ये भारत सरकारला माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाला सुरुवात करण्याविषयी सल्ला दिला आहे. उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणात आज व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व आले आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही देशात कृषी व कृषी संबंधित व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतात. तेव्हा या व्यवसायातील ज्ञान प्राप्त करण्यासाठी त्या व्यवसायाशी संबंधित माहिती शिक्षणातून प्राप्त झाली तर कुशल विद्यार्थी बाहेर पडतील. जेणेकरून या व्यवसायातील अडचणी त्याच्या लक्षात येतील. त्या अडचणीवर तू सहज मात करेल व त्या व्यवसायाला भरभराट येईल.

तांत्रिक शिक्षणाने आज जगभर भरभराट आली आहे. अमेरिका, युरोपीय देश, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया या देशांनी कारखानदारी, वाहतूक, व्यापार, शेती यासारख्या व्यवसायात मोठी मजल मारली आहे. या पाठीमागचे कारण केवळ तांत्रिक शिक्षण होय. या देशांनी तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून अगदी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरावर व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाला मुख्य शिक्षण प्रवाहात आणले आहे. जपानने दुसऱ्या महायुद्धानंतर व्यावसायिक शिक्षणाच्या जोरावर राष्ट्राचा विकास साध्य करून दाखवला आहे. १९९० नंतर चीनने जी प्रगती साध्य केली; त्या पाठी मागचे कारण व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण होय व यामुळेच चिनने संपूर्ण जगाची बाजारपेठ काबीज केली आहे. याच पद्धतीने भारतात शिक्षणात व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाला महत्त्व दिले तर देशातील प्रचंड लोकसंख्येला रोजगामिळेल व त्याच बरोबर राष्ट्राचा जलद गतीने विकास होईल. शिक्षणातून केवळ नोकरी साध्य न करता व्यावसायिक कसे होता येईल. याचा विचार करणे काळाची गरज आहे. यातूनच शिक्षण घेऊन स्वावलंबी होता येईल.

- संजना ससाणे

बी. ए. तृतिय वर्ष

****

# अहम् महात्मा-फुले-महाविद्यालयस्य: छात्रा अस्मि |

मम नाम गितांजली अस्ति | अहम् अत्र संस्कृतभाषायाःअध्ययनं करोमि| श्रीमद्भगवद्गीतायाम कथितम् यत् उद्धरेत आत्मना आत्मानम् | तदर्थम् यदि स्व-उद्धारं कर्तुं इच्छति तर्हि शिक्षणस्य आवश्यकतां अस्ति | शिक्षणेन एव ज्ञानं लभति| ज्ञानेन विना नहि पवित्रमिह विद्यते | अज्ञजनस्य जगति महति निंदां भवति | आचार्य मम्मटस्य अपि एकं प्रयोजनं अस्ति चेत् व्यवहारज्ञानाय| शिक्षणस्य सहाय्येन वयं व्यवहारज्ञानं लब्धुं शक्नुम | व्यवहारज्ञानेन जना:स्वावलम्बनं प्राप्तुं शक्नुवन्ति | स्वावलम्बनमेव जीवनं विना स्वावलम्बनं पराधिनमेव |

पराधिनं जीवनं मृत्युरेव चे | तस्मात् एव कथितं यत् माता शत्रु पिता वैरी येन बालों न पाठित: | न शोभते सभांमध्ये हंसमध्ये बको यथा || शिक्षणेन जना: धीमान भवन्ति | तेषां जीवनं सुखेन गच्छति | अथवा मूर्खानां जीवनं तु कलहेन गच्छति | एकस्मिन सुभाषितेकथितम् यत्

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् | व्यसनेन च मूर्खाणां निद्रया कलहेन वा ||

भारतिये आश्रमव्यवस्थानुसारं ब्रह्मचर्ये विद्यार्जनं कुर्यात् | द्वितीये गृहस्थाश्रमे धनं तृतीये वानप्रस्थाश्रमे पूण्यं च | महाकवि कालिदासेनपि रघुवंशे उक्तं यत् शैशवे अभ्यस्तविदयानां गृहस्थे विषयैषिनां | वार्धक्ये मुनिवृत्तिनां योगेन अन्ते तनु त्यजाम् ||

तदर्थ म्ब्रह्मचर्ये एव शिक्षणस्य सहाय्येन योग्यतां प्राप्येत | तस्य सहाय्येन स्व-उद्धारं कर्तुंशक्यते | ब्रह्मचर्ये यदि सम्यकतया शिक्षणं न लब्धमं तर्हि गृहस्थे स्वावलम्बनं धनं च न लभेत् | उक्तं च –

प्रथमे नार्जिता विद्या द्वितीये नार्जितं धनम् | तृतीये नार्जितं पूण्यं चतुर्थे किं करिष्यति ||

तस्मात्स्व-उद्धारार्थंस्वावलम्बनार्थं विद्या शिक्षणं वा प्राप्येत् | आलस्यं या कुर्यात् | स्वामि विवेकानंदेन अपि कथितं यत् उत्तिष्ठ जागृतादि| शनै:शनै:विद्यां च अर्जयेत् | क्षणश:कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत् | क्षणत्यागे कुतो विद्याकणत्यागे कुतो धनम् |

गितांजली केजकर
बी. ए. द्वितीय वर्ष

****

# स्वावलम्बनम्

कृष्णमूर्तिः श्रीकण्ठश्च मित्रेआस्ताम्। श्रीकण्ठस्यपितासमृद्धः आसीत्। अतःतस्य भवने सर्वविधानि सुख-साधनानि आसन्। तस्मिन्विशालेभवने चत्वारिंशत्स्तम्भाःआसन्। तस्यअष्टादश प्रकोष्ठेषु पञ्चाशत गवाक्षाः, चतुश्चत्वारि शत्द्वाराणि, षट्त्रिंशत्विद्युत्व्यजनानिच आसन् तंत्रदशसेवकाः निरन्तरकार्य कुर्वन्ति स्म। परंकृष्णमूर्तेः मातापिताच निर्धनौ कृषकदम्पत्नी तस्थ गृहम्आडम्बरविहीनं साधारणञ्च आसीत| एकदा श्रीकण्ठः तेन सह प्रातः नववादने तस्यग्रहम् अगच्छन्। तंत्रकृष्णमूर्तिः तस्य मातापिताच स्वशक्त्या श्रीकण्ठस्थ आतिथ्यम अकुर्वन्। एतत्दृष्ट्वा श्रीकण्ठः अकथयत्-" मित्र! अहं भवता सत्कारण सन्तुष्टोऽस्मि। केवलम् इदमेवममदुःख यत्तवगृहे एकोऽपिभृत्यः नास्ति। ममसत्काराय भवतां बहुकष्टजातम्। ममगृहे तुबहवः कर्मकराः| तदा कृष्णमूर्तिः अवदत् - "मित्र! ममापि अष्टौ कर्मकराः सन्ति। तेचद्वौपादौ दौहस्तौ द्वेनेत्रे, द्वे श्रोत्रे इति। एते प्रतिक्षणं मम सहायकाः । किन्तु तवभृत्याः सदैव सर्वत्रच उपस्थिताः भवितुंन शक्नुवन्ति।त्वं तु स्वकार्यार्थं भृत्याधीनः । यदा यदा ते अनुपस्थिताः तदा तदा त्वं कष्टम् अनुभवसि | स्वावलम्बने तु सर्वदा सुखमेव, न कदापि कष्ट भवति। श्रीकण्ठः अवदत्- "मित्र। तव वचनानि श्रुत्वा मम मनसि महती प्रसन्नता जाता। अधुना अहमपि स्वकार्याणि स्वयमेव कर्तुम् इच्छामि भवतु सार्थ द्वादशवादनमिदम्। साम्प्रतं गृहं चलामि।

इदं कथां पठित्वा वयं अवगतं यत्स्वावलंबनं महत्त्वपूर्णं अस्ति | शिक्षणस्य माध्यमेन वयं सर्वे स्वहितार्थं यत्नं कुर्याम | नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते | इति गीतापि कथ्यते|

- रेणुका पुंडलिक मलकापुरे
बी.ए. तृतीय वर्ष संस्कृत

****

**शिक्षण ही जीवनासाठीची तयारी नसून, जीवन हेच शिक्षण आहे**

**- जॉन डयू**

# शिक्षण स्वावलम्बनम्च।

संस्कृत भाषा अमृता भाषा अस्ति। संस्कृत भाषायाः अध्ययनेन छात्रा: स्वावलम्बनं प्राप्नोति। स्वजिविनं व्यापनार्थ शिक्षा साहाय्यं करोति। अज्ञजनाः स्वजिवीतं सम्यकतया नव्या प्रुवन्ति। स्वभापसंस्करण मेव शिक्षणम् इति भावः। स्वामि विवेकानन्दादयः स्वभा वसंस्करणमेव शिक्षणम् इति स्पष्टीकुर्वन्ति च अतएव विद्याविहीनः पशुः इति उच्चते कोऽपिजनः शिक्षणस्य सहाय्येन स्वकर्म उत्तमकर्मीवाकर्तु शक्यते। स्वउद्दिष्टार्थी विद्यायाः अभ्यासः कुर्यात्। विद्या ददाति विनयम् इति खलु प्रसिद्धम्। शिक्षणस्य परमम्प्रयोजनंसुषप्राजि विनय शीलं च। सुबस्य प्राप्त्यार्थ जनाः किमपि कुर्वन्ति। तस्यार्थ उत्तममार्ग शिक्षणम् एव अस्ति। शिक्षणेन वयं गुणयुवता: कलासुयुक्तः परिपूर्णच भवेम्। कथितं च गुणैगौरवमायाति नोच्चैरासनस्थि: |
प्रसादशिखरोस्थापि काको न गरूडायते |
अत:शिक्षण अस्माकं प्रधानकर्म आसीत| अस्माकं विद्याभ्यास: कदापि समाप्तं न भवति। आजीवनं विद्याभ्यासः कुर्यात् इति मन्यते। शिक्षणेन व्यक्तः सर्वेपुरुषार्थाः साधिताः भवेयुः। अयलतशिक्षणक्षेत्रे विद्यमान दुरवस्थाम् एव प्रकाशयति। छात्रा: केवलं परिक्षार्थी अध्ययनं कुर्वन्ति। वयंस्व जीविनार्थ विद्याभ्यासः कुर्याम। उद्धरेत आत्मानं आत्मन: इति गीतापि कथयति। शिक्षणस्य विना जीवनस्य मूल्यं नास्ति | माता-पिता-गुरू आदिनां सहाय्येन विद्यां प्राप्येत् | कथितं च यत्

माता पिता गुरूश्चेति त्रयो वन्द्या नृणां सदा |
आयुर्विद्या यशोबलं चेति त्रीन्याप्नोति तदाशिषा ||

- कु. कोमल संभाजी पोले
बी.ए. द्वितीय वर्ष.

****

**शिक्षक जीवनाचे दार उघडत असतो,**

**तर विद्यार्थ्याला त्यातून प्रवेश करायचा असतो.**

# स्वावलम्बन होने के फायदे

शिक्षा मनुष्य को आत्मनिर्भर बनाती है, स्वावलम्बन से हमारे अंदर कई गुना आत्मविश्वास बढ़ता है । दुनिया के सामने खड़े होने की हिम्मत बढ़ती है, किसी भी परेशानी को देख मन घबराता नहीं है, बल्कि गहरे विश्वास के सहारे हम हर मुसीबत का डट कर सामना कर पाते है । सच ही कहा गया है जीवन किसी जंग से कम नहीं है । हर रोज यहाँ हमें मानसिक व शारीरिक तनाव वाले युद्ध का सामना करना पड़ता है. हमारे सामने कई बार ऐसी बातें सामने आ जाती है, कि हमें बड़े से बड़े फैसले खुद लेने पड़ते है, वो भी कम समय पर | अगर हम स्वावलम्बी नहीं होंगें तो हर बार हम जीवन के इन फैसलों को लेने के लिए दूसरों का दरवाजा खटखटाएंगें| जीवन में हमें दोस्त, जीवनसाथी, भाई-बहन, माँ बाप तो मिलते है, जिनसे हम जब चाहें मदद ले सकते है, लेकिन जीवन का कोई भरोसा नहीं होता है, ये कब तक आपके साथ है, आप नहीं जानते है । तो इससे बेहतर है, आपको इस काबिल होना चाहिए कि खुद फैसले ले सकें। हम अपना अच्छा बुरा खुद समझेंगें, साथ ही अपने परिवारों की भलाई को समझ कर काम करेंगें ।

कर्तव्य निष्ठ स्वावलम्बी इन्सान अपने कर्तव्य को भली भांति जानता है, जीवन के किसी भी मोड़ पर वह अपने कर्तव्य से नहीं भागेगा । पने कर्तव्य को वह रिश्तों से भी ज्यादा महत्त्व देता है ।

स्वावलम्बी जीवन में सुख - सुविधाएं हो न हो, लेकिन उसके मन में शांति जरुर रहती है । उसे पता होता है, उसके जीवन में जो कुछ भी है, वह उसी की मेहनत का फल है, अपने जीवन के लिए वह किसी को ज़िम्मेदार नहीं ठहराता है । स्वावलम्बी अपने जीवन के दुखों में भी सुख का एहसास करता है. वह हमेशा समझदारी से काम करता है |

देश व समाज के विकास के लिए, स्वावलम्बी होना मुख्य बात है. स्वावलम्बी न होने पर हम किसी के पराधीन होते है, हम स्वतंत्र होकर कोई भी काम नहीं पाते है । देश की आजादी के पहले ऐसा नहीं था, भारत देश ब्रिटिश सरकार के अधीन था, वे उन्हें स्वावलम्बी बनने ही देना चाहती थी । क्योंकि ब्रिटिश सरकार को पता था, अगर देश की जनता स्वावलम्बी हो जाएगी तो उनकी कोई नहीं सुनेगा । आज भारत देश की जनता स्वावलम्बी है, इसलिए देश तेजी से विकास कर रहा है । हमारा समूचे दुनिया में नाम है । स्वावलम्बी मनुष्य को ही आज के समय में सम्मान दिया जाता है। मनुष्य को सिर्फ अपनी आत्मनिर्भरता के बारे में नहीं सोचना चाहिये । हम

सब इस देश, समाज के अभिन्न अंग है, हमें इसे आगे बढ़ाने के लिए साथ में काम करना होगा । स्वावलम्बन को अपने तक सीमित न रखें, इसे समूचे देश के विकास का हिस्सा बनायें।

आज जो देश विदेश के बड़े-बड़े अमीर, कामयाब इन्सान है, उन्होंने भी स्वावलम्बन का हाथ थामा । जब इन लोगों ने अपने काम की शुरुवात की तब इनके पास अपनी मेहनत, लगन थी, जिसके सहारे ये लोग अपने आप को कामयाब बना पायें है । ये बड़े बड़े आदमी आज हजारों को स्वावलम्बी बना रहें है । इनकी सफलता की पहली सीढी भी परिश्रम है ।

आज के समय में नारियों को सशक्त बनाने की बात कही जाती हैं । अब पहले जैसा नहीं रह गया है कि, घर के लड़कों को ही शिक्षा दी जाये, उन्हें ही घर से बाहर काम करने की इजाज़त है । आज समय बदल चूका है, लड़कियां, महिलाएं बाकि लोगों के साथ कंधे से कन्धा मिलाकर काम कर रही है । ऐसा कोई काम या क्षेत्र नहीं है, जहाँ लड़कियों से अपना लोहा नहीं मनवाया हो । महिलाएँ शादी के बाद अपने घर, बच्चे या ऑफिस का काम बखूबी संभाल लेती है । महिलाओं के स्वावलम्बी होने से उनमें आत्मविश्वास तो आता ही है, इसके साथ ही वे जीवन की हर लड़ाई से लड़ने के लिए तैयार भी होती है । कब कैसी समस्यांएँ आ जाए, हम नहीं जानते । महिलाओं पर पूरे परिवार की ज़िम्मेदारी होती है, धन संबंधी समस्या आने पर स्वावलम्बी औरतें अपने दम पर इसे हल कर लेती है ।

अतः स्वावलम्बन का अर्थ है- आत्मनिर्भरता, आत्मनिर्भर होने का तात्पर्य है कि अपने काम स्वयं करना, किसी भी वस्तु, जरुरत के लिए किसी पर निर्भर न होना। आत्मनिर्भर होने से इन्सान के अंदर आत्मविश्वास पैदा होता है, जिससे दुनिया की किसी भी परेशानी का सामना करने के लिए इन्सान खुद अकेले खड़ा रह सकता है । वैसे भी कहावत है- दुनिया में आप अकेले है, अकेले ही जायेंगें। जब हम अकेले ही आयें हैं, और जाना भी अकेले है, तो क्यों इस दुनिया में किसी पर निर्भर रहें। मेरी इस बात का ये मतलब नहीं कि आप दुनिया में किसी से संबंध न रखें। हमें सबसे साथ मिलकर, प्यार से रहना चाहिए, लेकिन किसी पर भी बोझ न बने ।

**कु. समृध्दी बनसोडे**
बी. ए. द्वितीय वर्ष

****

# स्वावलंबन

स्वावलंबन है जीवन अवलंबन
बिन स्वावलंबन जीवन है बंधन
स्वावलंबन ही है आत्मनिर्भरता
बिन इसके जीवन दीप न जलता।

स्वावलंबन जग में पहचान कराता
शिक्षा का सदुपयोग सिखाता
निराशा में भी आशा भरता
ऊसर में भी प्रसून खिलाता।

अपना दीपक स्वयं बनो
स्वावलंबन ही है सिखलाता
जीने का दृष्टिकोण बदलना
स्वावलंबी है कर दिखलाता।

स्वावलंबन है आत्म अवलंबन
आत्म अवलंबन जब आता है
तो आत्म सम्मान जाग जाता है
आत्मावलंबी स्वयं ही सारे अभाव मिटाता है
नहीं ताकता मुँह किसी का
सम्मान की रोटी खाता है।

स्वावलंबन की भूख ही जीवन सफल बनाती है
परालंबन का यह कलंक मिटाती है
स्वावलंबन से सुख न मिले तो क्या
स्वात्मा खुशी से तो इठलाती है।

परावलंबी की आत्मा स्वप्न में भी न सुख पाती है|
स्वावलंबन भले बुरे का भेद मिटाती है|
आत्मसम्मान जगता है जब
आत्मा हर्षित हो जाती है।

स्वावलंबन का पथ ही सत्य संकल्प है|
आत्मसम्मान से जीने का न कोई विकल्प है|
स्वावलंबन पर न्योछावर कुबेर का खजाना है|
स्वावलंबन को सबने जीवन रेखा माना है।

स्वावलंबन के आनंद का न कोई अंत है|
स्वावलंबन का सुख दिग दिगंत है|
अपना हाथ जगन्नाथ हो कुसुम तो
पतझड़ भी लगता वसंत है।

**कु.मनीषा सूरनर**

बी. ए. प्रथम वर्ष

# महात्मा फुले महाविद्यालय ने बनाया स्वावलम्भी

वास्तव में शिक्षा केवल किताबी ज्ञान तक ही सीमित नही है| किताबी शिक्षा तो अधूरी शिक्षा ही है। वास्तविक शिक्षा में ज्ञान के साथ-साथ अनुभव होना भी अति आवश्यक है | मेरा सौभाग्य है कि, मैंने महात्मा फुले महाविद्यालय अहमदपुर में उच्च शिक्षा ली। यहाँ के सभी अध्यापक ज्ञान के साथ उनके जीवन के अनुभवों से हमें शिक्षित करते थे।

विद्यार्थी को जीवन का वास्तविक रूप देखने को मिलना चाहिए। जब ऐसी परिस्थिति में पड़ेगा, जहां अनुभव की आवश्यकता हो, तभी वह अपनी अर्जित शिक्षा को कार्यरूप में परिणत कर सकेगा। छात्रावास के जीवन से जो शिक्षा विद्यार्थी सबसे अधिक ग्रहण करता है, वह है स्वावलम्बन। वह अपने पैरों पर खड़ा होना सीखाता है | शहर के समस्त कोलाहल से दूर, घर-बार की समस्त चिन्ताओं से मुझ, विद्यार्थी को पढ़ाई का वास्तविक आनन्द आता है। स्वस्थ जलवायु में उसका स्वास्थ्य अच्छा बनता है। उसका मस्तिष्क विकसित होता है। वहां पर अपनी ही आयु के विद्यार्थी मिलते है जिनका मानसिक स्तर लगभग एक-सा भोजन करने से संगठन और सहयोग की भावना जागृत होती है। भिन्न प्रकार की विपत्तियों को झेलने की क्षमता आती है. यही नहीं, उसको अपने सुप्त गुणों-दुर्गुणों का आभास मिलता है। वह अकेला रहने के कारण जान जाता है कि वह कितने पानी में है। सभी प्रकार के छात्रों के साथ रहने से अच्छे-बुरे का ज्ञान होता है। छात्रावास में विद्यार्थी अपने गुरूजनों के हर समय सम्पर्क में रहता है। इससे उसको बात करने का तरीका आता है, ज्ञान की वृद्धि होती है।चरित्र-निर्माण के लिए छात्रावास अति आवश्यक है। यहां पर कड़े अनुशासन में नियमित जीवन व्यतीत करने से आज्ञापालन व नियमितता के गुण आते हैं। विद्यार्थी का एक बना हुआ व सधा हुआ जीवन बन जाता है। बंधी हुई दिनचर्या से चरित्र उत्कृष्ट कोटि का होता है | छात्रावास में सब विद्यार्थी एक बड़े परिवार के समान रहते है। प्रेम, भाईचारा व सहयोग की भावनाएं स्फुटित होती हैं। एक-दूसरे के दुःखों में सहानुभूति पैदा होती है|

एक-दूसरे की आलोचना से गुणों व दोषों की विवेचना की जाती है। सबसे बड़ी बात यह होती है कि विद्यार्थी दूसरों की सहायता के बिना कठिनाइयों का सामना करना सीखते हैं।

मनुष्य स्वभावतः सुख की चाह तो रखता हैं लेकिन इसके लिए परिश्रम करने से यथासम्भव बचने की कोशिश भी करता हैं | लेकिन शिक्षा के बिना सुख असम्भव हैं क्योंकि शिक्षा मनुष्य को स्वावलम्भी अर्थात आत्मर्निभर बनाती हैं | इसी कारण वह अपने कार्यो एवं वस्तुओं के लिए निर्भर होने लगता हैं। स्वावलम्बन व्यक्ति के लिए ही नहीं राष्ट्र के लिए आवश्यक हैं।

**कु. रमाताई श्रीराम गायकवाड**

(बी. ए. तृतीय वर्ष)

# “आत्मनिर्भर भारत : एक अभियान”

पूरी दुनिया में भारतीय संस्कृति काफी प्राचीन है। अगर हम भारतीय संस्कृति पर नजर डाले तो वह हमें यह बताती है कि किसी भी परिस्थिति में भारतीय प्रजा आत्मनिर्भर रही है। आत्मनिर्भर का शाब्दिक अर्थ होता है- अपने खुद के पैरों पर खड़ा रहना, अपने आप पर निर्भर रहना, छोटी-छोटी चीज़ों के लिए किसी दूसरे पर अवलंबित नहीं रहना। आत्मनिर्भरता अर्थात खुद के हुन्नर से खुद का विकास करना। फिर चाहे हुन्नर छोटा हो या बड़ा। यही बात हमारे राष्ट्र निर्माण में भी काफी मददगार साबित होगी।

कोरोना महामारी के दौरान भारतीय प्रजा को आत्मनिर्भर बनाने के उद्देश्य से हमारे माननीय प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी जी ने ‘आत्मनिर्भर भारत अभियान’ की घोषणा की। क्योंकि अगर हम देश का सर्वांगीण विकास चाहते हैं तो सबसे पहले हमें खुद के पैरों पर खड़ा रहना होगा। प्रधानमंत्री चाहते है कि छोटी से छोटी चीज़ों का निर्माण देश के भीतर ही हो ताकि हमें विदेशी चीज़ों पर निर्भर नहीं रहना पड़े और देश की प्रजा को आमदनी की भी उपलब्धि प्राप्त हो सके। आत्मनिर्भर भारत का सपना भारत की आज़ादी के पहले गांधीजी ने भी देखा था। अगर देश की प्रजा आत्मनिर्भर बनेगी तो उनमें आत्मविश्वास भी बढ़ेगा, साथ साथ देशी उद्योगों और रोजगार में भी बढ़ोतरी होगी। देश से धीरे-धीरे गरीबी की समस्या दूर होगी। देश में आयात की जगह निर्यात का बढ़ावा मिलेगा। जिसके चलते देश में विदेशी मुद्रा जमा होगी, जो देश को किसी भी महामारी के दौरान आर्थिक संकट से बचा सकती है।

आत्मनिर्भर भारत अभियान से भारत की अर्थव्यस्था काफी मजबूत बनेगी और दुनिया में भारत विकास की ओर आगे बढ़ पायेगा। लेकिन इस अभियान की शुरुआत सही मायने में तब हो पायेगी, जब भारत का हर एक व्यक्ति आत्मनिर्भर बनेगा।

- *कु. ऐश्वर्या देवकत्ते*
*(बी. ए. प्रथम वर्ष)*

****

# "आत्मनिर्भर भारत के लिए शिक्षा का महत्त्व"

आत्मनिर्भर का सही मतबल तो यह होता है कि कोई भी व्यक्ति, गाँव या देश किसी दूसरे के सहारे या किसी दूसरे पर निर्भर नहीं होकर खुद पर निर्भर रहे। आत्मनिर्भर होना खुद के लिए, अपने गाँव, शहर, जिले और देश के लिए बहुत जरूरी है। यदि हमारा शहर या देश आत्मनिर्भर रहेगा तो हमें किसी दूसरे देश पर निर्भर नहीं रहना होगा।

कोई भी व्यक्ति यदि किसी दूसरे पर निर्भर है, हर काम या अपनी आवश्यकता के लिए दूसरे की मदद की गुहार करता है तो उसके लिए यह बहुत बड़ी कमी है। उसे खुद पर निर्भर होना चाहिए न कि किसी दूसरे पर। यदि व्यक्ति आत्मनिर्भर होगा तो किसी भी समय उस पर कोई भी मुश्किल या मुसीबत आये तो वह खुद ही उसे सुलझा सकता है। बल्कि उसे किसी दूसरे की कोई जरूरत नहीं पड़ती। ये सभी बातें व्यक्ति को छोड़कर राज्य और देश पर भी लागू होती है। यदि देश के पास संसाधन उपलब्ध नहीं है तो उसे किसी दूसरे देश से उस संसाधन की कमी को पूरी करनी पड़ेगी। यदि उस संसाधन को बनाने की सारी सामग्री उसके पास उपलब्ध है तो वह उसका प्रयोग कर उसका निर्माण स्वयं कर सकता है। इससे वह आत्मनिर्भर भी बनेगा और किसी दूसरे देश पर निर्भर रहने की जरूरत नहीं होगी।

हमारे देश में हर संसाधन प्रचुर मात्रा में उपलब्ध है। लेकिन हम कई सारी ऐसी चीज़े उपयोग में लेते हैं जो किसी दूसरे देशों में बनी होती है। इससे हमारे हमें तो नुकसान होता ही है। साथ में देश को भी इसका बहुत बड़ा नुकसान भुगतना पड़ता है।

हमारे देश में हर संसाधन उपलब्ध है। यदि उस संसाधन का सही उपयोग करके देश में ही वस्तुएँ बननी शुरू हुई तो इससे देश को काफी फायदा होगा। इससे देश में उद्योगों की बढ़ोतरी होगी और देश के हर युवा को रोजगार मिलेगा और देश के नागरिको को प्राप्त मात्रा में आवश्यक सामान।

देश में अधिक उद्योग होंगे तो बेरोजगारी देश में कम होगी और साथ देश में फैली गरीबी भी समाप्त होने के साथ साथ देश की आर्थिक स्थिति में काफी सुधार होगा और अर्थव्यवस्था बहुत मजबूत होगी। फिर हमारे देश को किसी दूसरे देश पर निर्भर नहीं होना पड़ेगा।अधिक सामग्री बनने से हम अपने देश की सामग्री को और भी देशो को निर्यात कर सकते हैं। इससे हमारे देश में आयात में कमी होगी और साथ में निर्यात में बहुत अधिक बढ़ोतरी होगी।

आत्मनिर्भर भारत को लेकर अब सरकार भी बहुत अच्छे-अच्छे कदम उठा रही है तो हमें भी सरकार का सहयोग करना चाहिए और देश को आत्मनिर्भर बनाने में सरकार की मदद करनी चाहिए। इसके लिए हम अच्छी शिक्षा प्राप्त कर देश के विकास में योगदान देकर अपना कर्तव्य निभा सकते है.

- ***कृष्णा राठोड***
*(बी. ए. तृतीय वर्ष)*

# "आत्मनिर्भरता के लिए शिक्षा"

हर व्यक्ति के लिए आत्मनिर्भर ही सबसे बड़ा और अच्छा गुण होता है। इसके साथ ही यह गुण उसके लिए बड़ा सहारा भी बनता है। यदि व्यक्ति आत्मनिर्भर रहेगा तो उसको किसी दूसरे की बहुत ही कम जरूरत पड़ेगी और वह खुद बड़ी से बड़ी मुश्किल का आसानी से मुकाबला कर सकता है। आत्मनिर्भर होना व्यक्ति के लिए जितना जरूरी है उतना ही जरूरी एक देश के विकास के लिए भी है।

हमारा भारत देश बड़ा और हर संसाधन से परिपूर्ण देश है। भारत में हर संसाधन पर्याप्त मात्रा में उपलब्ध हैं और हर प्रकार की वस्तु या सामग्री का निर्माण खुद कर सकता है। इसके लिए किसी दूसरे देश पर आश्रित रहने की जरूर नहीं पड़ेगी। ऐसा करने के लिए देश के हर युवा के लिए इच्छाशक्ति और कार्य में कुशलता होनी बहुत जरूरी है। ऐसा नहीं है कि हमारे देश में ऐसे लोगों की कमी है। ऐसे कई लोग हमारे देश में जो देश के लिए कुछ भी कर सकते हैं।

आत्मनिर्भरता से तात्पर्य है कि हमारा देश हर क्षेत्र में खुद पर निर्भर हो, उसको किसी भी दूसरे की मदद नहीं लेनी पड़े। वह वस्तु का निर्माण करें जिसका उपयोग हम करते हैं। चाहे वो छोटी स छोटी सुई और बड़ी बड़ी से बड़ी वस्तु ही क्यों न हो। ऐसी वस्तुओं के लिए किसी दूसरे देश के सामने हाथ नहीं फैलाना पड़े।

●आत्मनिर्भर भारत अभियान क्या है?

इस योजना में भारत को हर उस क्षेत्र में सक्षम होना है, जिसमें वह दूसरे देशों की मदद लेता है। आत्मनिर्भर भारत अभियान का उद्देश्य भारत के संसाधन को भारत में ही अधिक उपयोग में लाना है। भारत में अधिक उद्योगों को सुचारू करना और यहाँ के हर युवा को रोजगार के लिए आग्रेसित करना और आत्मनिर्भर बनाना है।

आत्मनिर्भर भारत में हर उस क्षेत्र पर ध्यान दिया जाएगा, जिसमें भारत किसी दूसरे देश की मदद लेता है। फिर उस क्षेत्र में सक्षम बनना है। इससे देश के विकास में बहुत लाभ मिलेगा और भारत एक आत्मनिर्भर राष्ट्र बनेगा।

●आत्मनिर्भरता के फायदे कौनसे हैं?

यदि देश आत्मनिर्भर होगा तो इसके कई सारे फायदे है जो निम्न है-

●किसी दूसरे देश के आगे हमें हाथ नहीं फैलाना पड़ेगा।

●देश में उद्योगों में बढ़ोतरी होगी।

●देश का हर युवा सफल, सक्षम होगा और साथ ही उसके पास रोजगार होगा।

● हमारा भारत देश बेरोजगारी के साथ साथ गरीबी से भी मुक्त होगा।

●देश के पास अधिक पैसा होगा और उसकी आर्थिक व्यवस्था मजबूत होगी।

●आयात की जगह पर निर्यात बढ़ेगा, जिससे विदेशी मुद्रा का प्राप्त भंडार होगा।

●किसी भी प्राकृतिक आपदा के समय देश में खाद्यान की मांग बढ़ जाती है, यदि देश आत्मनिर्भर होगा तो उसको किसी दूसरे देश पर निर्भर रहने की जरूरत नहीं होगी।

●आत्मनिर्भरता का अवसर :-

जैसा की हम सभी जानते ही है, अभी हमारा देश कोरोना वायरस जैसी भयानक महामारी से गुजर रहा है। इस संकट ने हमारे देश को आत्मनिर्भर

बनने का अवसर दे दिया है। इस भयानक महामारी में हमने सिद्ध कर दिया है कि चाहे हमारे देश में कैसी भी बिकट परिस्थिति आ जाये, हम देश के साथ है। देश को किसी दूसरे देश पर आश्रित नहीं होने देंगे।

हम अभी तक कोरोना जैसी महामारी से लड़ने के लिए देश में पीपीई किट, वेंटिलेटर और सैनिटाइज़र आदि जैसे चीजों का उत्पादन कर चुके है। हमारे देश भारत में किसी भी संसाधन की कोई कमी नहीं है। पहले हमारे देश में पीपीई किट, वेंटिलेटर और सैनिटाइज़र आदि का बहुत ही कम मात्रा में उत्पादन होता था। लेकिन ऐसी भयानक स्थिति में खुद पर निर्भर होने बहुत ही बड़ा उदारहण हमने अन्य देशों को दिया है। हमारे देश की शिक्षा भी कारगर साबित हुई.

- ***कु. आरती गुळवे***

*(बी. ए. द्वितीय वर्ष)*

****

आत्मनिर्भर होना

अपनी पहचान

इसी से बढेगी देश की

शान ...

# मानवी जीवनात शिक्षणाचे महत्त्व

**"विद्ये विना मति गेली।**
**मती विना नीति गेली।**
**नीति विना गती गेली।**
**गति विना वित्त गेले।**
**वित्ता विना शूद्र खचले।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले"।।**

- महात्मा फुले

असे शिक्षणाचे महत्त्व थोर विचारवंत महात्मा फुले यांनी किती तरी वर्षांपूर्वी सांगून ठेवलेले आहे, ते अगदी खरे आहे. शिक्षण नसल्यामुळे शेकडो पिढ्या अज्ञानात खितपत पडलेल्या त्यांच्यात शिक्षणाच्या ज्ञानाचा प्रकाश नसल्यामुळे त्यांच्या आयुष्यात सुधारणा कधी आली नाही. त्यांना पशू पेक्षाही हीन दीन जीवन जगावे लागले. हा इतिहास आपल्याला माहीतच आहे. ज्यावेळेस पासून समाजात सर्वदूर शिक्षणाचा प्रवाह सुरू झाला, तेव्हा पासून माणसाच्या जीवनात, स्वभावात, वागण्यात, बोलण्यात चांगले बदल होत गेलेले आहेत हे आपल्याला दिसून येते. शिक्षण नसल्यामुळे माणूसच माणसाकडे वेगळया नजरेने पाहत होता; परंतु शिक्षण घेतल्याने माणूस माणसाला आपले पणाने वागवताना दिसत आहे. शिक्षण नसलेला माणूस आणि शिक्षण घेतलेला माणूस या दोघांमध्ये जमीन आसमान फरक आहे. तो आपल्याला लगेच जाणवतो.

प्रत्येक माणसाकडे बुद्धी आहे, पण त्याला आपल्या बुद्धीचा योग्य विकास शिक्षण नसल्यामुळे करून घेता येत नाही. ज्यांनी शिक्षण घेतले आहे तो आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावर जीवनातल्या अनेक गोष्टीवर यश मिळवताना दिसतो आहे. मानवाने शिक्षणाच्या बळावर अनेक सामर्थ्यवान कामे केल्याची अनेक उदाहरणे आपल्या नजरे समोर आहेत. एकीकडे रानटी अवस्थेत जगणारा माणूस झाडांच्या पाने, फुले, फळे तसेच पशु पक्षांच्या शिकार करून रानटी अवस्थेत जगणारा माणूस आज शिक्षणामुळे चंद्रावर पोहोचलेला आहे. ही ताकद शिक्षणात असल्याची जाणीव आपल्याला नक्कीच होते आहे. त्यामुळे आपले जीवन स्वावलंबी बनवण्यासाठी प्रत्येकाने शिक्षणाचा मार्ग पत्करून आपल्या आयुष्याचे सोने करून घेतले पाहिजे.

'मोळी विका पण; शिक्षण शिका' ही महामानवांनी सांगितलेली जुनी म्हण आज ही आपल्या शिक्षणाचे महत्त्व सांगताना दिसते.

लहानपणी आपण शाळा शिकत असताना रडतपडत शाळा शिकत आलो. सुरुवातीला शिक्षणाची, शिक्षकांची भीती वाटत गेली, पण त्या भीतीतून आपण शिकत गेलो आणि वरचेवर घडत गेलो. खरे तर शिक्षणाचे मूळ कडू असू शकते; पण त्यावर येणारी फळे ही गोड असतात, हे आज आपल्याला चांगले लक्षात येते. 'छडी लागे छमछम विद्या येई घम घम' ही जुनी म्हण खरोखरच विद्येचा घमघमाट सुगंध सगळीकडे दरवळताना दिसते. बालकाचे शालेय जीवनातले मन अगदी निरागस असते. मातीच्या गोळया प्रमाणे असते. त्याच्या डोक्यात जसे संस्कार केले जातात, तसा त्याचा मेंदू विकसित होऊन पुढे वेगवेगळया रूपाने तो नाव लौकिकाला आलेला दिसून येतो. ही संस्काराची ताकत शिक्षणात आहे. म्हणून शिक्षण घेणे ही काळाची गरज बनली आहे. आज अडाणी अज्ञानी माणूस या स्पर्धेच्या काळात टिकणे अवघड झाले आहे. शिक्षणामुळे माणूस शिक्षित होऊन त्याला आपला जीवन व्यवहार चांगल्या पद्धतीने कळायला लागतो त्यामुळे त्याचा, त्याच्या कुटुंबाचा, पर्यायाने समाजाचा विकास शिक्षणामुळे होताना दिसतो. शिक्षण माणसाला हुशार बनवते आणि माणसांतील क्षमतांना बाहेर काढण्यास मदत करते. ज्या क्षमतांच्या बळावर तो संपूर्ण विश्वाला जिंकण्याची धमक ठेवतो. शिक्षणामुळे माणसाला आत्मजाणीव निर्माण होऊन त्याच्यात आत्मसन्मान निर्माण होतो, त्याच्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास, धैर्य, साहस, प्रसन्नता निर्माण होते. शिक्षण घेतलेला माणूस कुणापुढेही विनाकारण झुकत नाही. त्याला आपल्या परिस्थितीची जाणीव असल्यामुळे तो कुणाचाही अन्याय सहन करत नाही. ही ताकद शिक्षणात आहे म्हणून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, तो जो कोणी प्राशन करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही' ही ताकद शिक्षणाने माणसात निर्माण करून माणूस विनाकारण कुणापुढे ही झुकणार नाही आपला स्वाभिमान कुठेही तो घाण ठेवणार नाही ही जाणीव शिक्षणाने त्याच्यात निर्माण होते. जीवनात शिक्षण नसेल तर त्या जीवनाचा अर्थ कवडी मोल आहे. आणि असे कवडीमोल जीवन निरर्थक ठरते.

शिक्षण घेण्यासाठी विशिष्ट वय असण्याची गरज नसते. की "आता तर शिक्षण घेवूच शकत नाही आता, वय झाले असे म्हणण्याची गरज नाही. कारण शिक्षणाला वय नसते शिक्षण ही निरंतर चालणारी एक संस्कार व संस्काराची प्रक्रिया आहे ही प्रक्रिया कधीही कुठेही थांबत नाही. तो ज्ञानाच्या नव्यानव्या गोष्टी आत्मसात करून माणसाला ताजे तवाने करते. वयाने माणूस थकत चालला तरी शिक्षणाने मात्र तो ताजा तवाना, ज्ञानी बनताना दिसतो. त्यामुळे शिक्षण घेण्यासाठी

कुठलेही कारण देण्याची गरज नाही. शिक्षण हे केवळ शाळा, महाविद्यालय यातूनच दिले जाते असे नाही, तर शिक्षण घेण्यासाठी हे संपूर्ण जग एक प्रकारची शाळा आहे. या शाळेत माणूस दररोज वेगवेगळ्या अनुभवातून शिक्षणाचे धडे घेत असतो या धड्याच्या जोरावर तो आपलं जीवन सुखी संपन्नतेने जगत असतो. माणसांकडे इतर काही नसले तरी जो प्रचंड ज्ञानी विद्वान आहे तो आपल्या विद्वत्तेच्या बळावर यशाची अनेक शिखरे सर करत असतो याची आज पर्यंतच्या इतिहासात अनेक उदाहरणे आपल्या नजरे समोर असलेली दिसून येतात. म्हणून तर मी आपल्याला सांगू इच्छिते की, माणूस हा मरे पर्यंत एक विद्यार्थीच असतो' म्हणजेच कोणत्याच व्यक्तीला शिक्षण घेण्यासाठी वयाचे बंधन नाही.

फक्त मनात शिकण्याची जिद्द आणि स्वतःवर आत्मविश्वास असणे गरजेचे आहे. शिक्षण म्हणजे फक्त वह्या पुस्तकांची घोकंपट्टी करणे नाही तर त्या पुस्तकांचा आधार घेऊन चांगल्या आणि वाईट गोष्टीं मधील फरक जाणून घेणे आहे.

शिक्षणामुळे माणसांमध्ये समाजमन तयार होते तो आपल्या प्रमाणेच इतरांचा विचार करू लागतो. माणसाला दुसऱ्याच्या सुख-दुःखात सामील होण्याची जाणीव जागृती शिक्षण करून देते. भगवान गौतम बुद्ध यांनी सुद्धा सांगितले आहे की,

"दुसऱ्यांच्या दु.खात सहभागी व्हावयास जे शिकवते तेच खरे शिक्षण होय." शिक्षण मनुष्याला आतून आणि बाहेरून शिक्षित करण्याचे काम करत असते. सोबतच माणसाला नम्र बनविण्याचे काम शिक्षणच करते आणि विद्या सुद्धा नम्र व्यक्तीवर शोभून दिसते म्हणून म्हणतात ना..

"विद्या विनयेन शोभते"

माणसाच्या ठिकाणी एक नैतिक शिकवण शिक्षणाने निर्माण होते. माणूस शिक्षणाने विचारी, विवेकी, संयमी बनतो. माणसाच्या जीवनात नम्रता हा फार मोठा दागिना आहे आणि तो केवळ शिक्षणानेच आत्मसात करता येतो त्याच्याकडे नम्रता आहे तो आयुष्यात भल्या भल्यांना सहज जिंकतो हे जिंकण्याचे देणे त्याला शिक्षणानेच लाभलेले असते. आपले जीवन जगण्यासाठी त्याच्याकडे नुसते श्रम असून चालत नाही तर त्याला कौशल्याची जोड असली पाहिजे. हे कौशल्य माणसात निर्माण करण्याचे काम शिक्षणाच्या प्रक्रियेमुळे होताना दिसते. त्यामुळेच तर पूर्वीचा माणूस आणि आजचा माणूस यामध्ये जमीन आसमान फरक झालेला आपल्याला दिसून येतो.

म्हणून शिक्षणाचे महत्त्व आपल्या जीवनात अमूल्य असते... कारण शिक्षणाचे मोल असूच शकत नाही ते तर अनमोल असते. सत्ता, संपत्ती ह्या गोष्टी माणसाच्या जीवनात येतात जातात; पण त्यामुळे त्या माणसाचा सर्वांगीण विकास होईलच असे नाही पण त्याला जर शिक्षणाची जोड आली तर

मात्र त्या माणसाला आपल्या सत्तेचा संपत्तीचा चांगला उपयोग करून घेता येतो. म्हणून शिक्षण हे काळाची गरज आहे हे आपण सर्वांनी ओळखले पाहिजे माणसाला आपले जीवन जगण्यासाठी काही तरी धडपड करणे आवश्यक आहे. जर ही धडपड सुयोग्य पणे कारणी लागली तर त्याचे जीवन सुखी समाधानी बनते. यासाठी त्याला आपल्या जीवनात अनेक अनुभवाच्या गोष्टी शिक्षणातून प्राप्त झाल्या तर त्याचे जीवन सुंदर बनते. शिक्षणाचे असे ही महत्त्व वेगवेगळ्या पद्धतीने आज पर्यंत जुन्या काळा पासून अनेक संत महंत विचारवंत महामानव यांनी समाजाला सदोदित सांगितलेले आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून सर्वांनी शिक्षणाचा आणि सुसंस्काराचा वापर केल्यास आपले जीवन नक्कीच धन्य होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आणि आपल्या बरोबरच आपल्या अवती भोवतीच्या समाजाला शिक्षणाचा मार्ग दाखवून त्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश निर्माण करता आला पाहिजे.

**- कु. पूजा गोपीचंद चव्हाण**
बी.ए. तृतीय वर्ष

****

**शिक्षणावर केलेली गुंतवणूक उत्तम व्याज मिळवून देते ...**

# शिक्षणाच्या स्वावलंबनातून महिलांचा विकास

शिक्षण म्हणजे काय असते? शिक्षण म्हणजे आपल्याला चांगल्या व वेगवेगळया गोष्टी शिकायला आणि अनुभवायला मिळतात हे आहे, असे मला वाटते. पण शिक्षणाची व्याख्या प्रत्येकाच्या मते वेगवेगळी असू शकते. शिक्षण घेतल्याने आपली प्रगती होते, त्याच प्रमाणे आपल्या देशाची सुद्धा प्रगती होते. शिक्षण लहानांपासून ते मोठ्यां पर्यंत सर्वांनी घेतले पाहिजे. शिक्षण घेतल्यामुळे वेगवेगळ्या गोष्टीचे ज्ञान प्राप्त होते. शिक्षण घेतल्याने आपल्या मधील असलेल्या सुप्त कला, गुणांना वाव मिळवून देऊन आपल्यातील सद्गुणांचा विकास करता येतो. आपले चांगले कशात आहे, आपण काय केले म्हणजे चांगले होऊ शकते हे आपल्याला शिक्षणामुळे समजते.

शिक्षणामुळे आपल्याला स्वाभिमान प्राप्त होतो. आपल्या मध्ये आत्मतेज निर्माण होते. आपल्याला आत्मभान येते. आपण जर शिक्षण नाही शिकू शकलो तर लोक आपल्यावर अन्याय करतात, आपले जीवन जगणे मुश्किल करून टाकतात. त्यामुळे आपल्याला शिक्षण घेतले पाहिजे. जर आपण शिकलेले असलोतर आपल्यावर कोणी अन्याय करणार नाही व जर कोणी अन्याय केला तर शिक्षणामुळे त्या विरोधात आपल्याला कुठे व कसा न्याय मागायचा याची माहिती होते. आपण स्वतंत्रपणे आपले जीवन जगू शकतो. आज आपण समाजात पाहतो की सगळीकडे निरक्षर असलेल्या अडाणी माणसाला फसवले जाते. त्याच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्याला लुबाडले जाते, तो सहज कुणाच्याही मोहात, भूल थापाला बळी पडतो त्यामुळे त्याचे प्रचंड नुकसान होते. म्हणून प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे. जर आपण चांगले शिक्षण घेतले तर आपल्याला जीवनाचा व्यवहार कळतो. आपली उपजीविका भागवण्यासाठी आपल्याला चांगला व्यवसाय करता येतो. त्यामध्ये नफा कसा कमवायचा याचे ज्ञान शिक्षणामुळे अवगत होत असते. त्यामुळे प्रत्येकाने कुठल्याही परिस्थितीत शिक्षण घेतले पाहिजे.

जुन्याकाळी 'मोळी विका पण शिक्षण शिका' असा मंत्र सांगितला जायचा. अनेक महामानवानी, महापुरुषांनी वारंवार आपल्या वाणीतून व लेखणीतून शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून दिले आहे. राष्ट्रसंत गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून नेहमी सांगत की, 'विद्या मोठे धन आहे' ते प्रत्येकाने घेतलेच पाहिजे. त्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे. प्रसंगी आपण जेवण करायचे ताट, तांब्या विकले तरी चालेल; पण शिक्षण घेतले पाहिजे. हा शिक्षणाचा मूलमंत्र गाडगेबाबांनी

साऱ्या समाजाला आयुष्यभर आपल्या किर्तनाच्या माध्यमातून पटवून दिला. या संदर्भात लोकांच्या समोर ते अनेक उदाहरणे देत असत. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी स्वतः शिक्षण तर घेतलेच परंतु, तळागाळातील माणसांना विद्येचे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस श्रम घेतले. गोरगरीब, दीनदलित यांच्या मुलांसाठी त्यांनी शाळा काढल्या. मुलीनी सुद्धा शिक्षण घेतले पाहिजे हा आग्रह पूर्वी पासून महामानवांनी घेतलेला दिसून येतो. कारण स्त्री व पुरुष हे संसार रुपी रथाची दोन चाके आहेत. ही दोन चाके व्यवस्थित चालली तरच संसाराचा गाडा पुढे व्यवस्थित चालणार आहे. महिलांना तर दोन दोन घरांना पुढे घेऊन जाण्याचे काम करतात. तसेच समाजात स्त्री म्हणून त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळया प्रकारचा असल्याने त्यांनी शिक्षण घेऊन पुढारले पाहिजे. आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण घेऊन त्यांनी स्वावलंबी बनले पाहिजे. त्यांना स्वावलंबी बनवण्याचे काम शिक्षणच करू शकते, याचा आत्मविश्वास मला नक्कीच आहे.

शिक्षणाचे महत्त्व महिलांसाठी खूप आवश्यक आहे. जगातील प्रत्येक महिलांना शिक्षण घेतले पाहिजे. कारण समाजामध्ये सर्वात जास्त अन्याय, अत्याचार महिलांवर होताना दिसतात, अनेक महिलांना शिक्षण कमी असते त्यांना शिक्षण नसल्याने धाडस कमी बनते, त्यांना शिक्षण नसल्याने कायद्याचे ज्ञान असत नाही. त्यामुळे त्या गुपचूप अन्याय सहन करतात. 'चूल आणि मूल' हेच महिलांसाठी कार्यक्षेत्र सांगितले गेल्याने त्यांचे अस्तित्व तितक्या पुरतेच मर्यादित राहिलेले आहे. परंतु शिक्षणाने महिलांच्या विकासाला प्रचंड बळकटी दिल्याने प्रत्येक महिलांनी शिक्षण घेतले पाहिजे आणि इतरांवर अवलंबून न राहता स्वावलंबी बनले पाहिजे. आज सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा वावर दिसत आहे, याचे कारण शिक्षण हेच आहे. शिक्षणामुळे महिलांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो.

एकेकाळी मुलींना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता; परंतु महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने मुलींच्या शिक्षणाची सुरुवात झाली. आज मुलांपेक्षा मुली शिक्षणामध्ये पुढारलेल्या दिसून येतात. शिक्षण घेतल्यामुळे वेगवेगळया क्षेत्रात जाऊन त्यांनी आपला नाव लौकिक मिळवलेला आहे. महिला आपले घरदार सांभाळून आपला विकास करू शकतात इतकी प्रचंड ताकद शिक्षणाने त्यांच्यात निर्माण केलेली आहे. आज महिला शिक्षणामुळे सज्ञानी बनल्या. आज त्या दासी म्हणून कुणा पुढेही झुकताना दिसत नाहीत. आधी 'चूल आणि मूल' वाटत आलेल्या स्त्रियां आता वेगवेगळया पदावर विराजमान झालेले आहेत हे केवळ त्यांनी शिक्षण घेतल्यामुळे शक्य झाले आहे. शिक्षणामुळे

समाजामध्ये असणारी पिढ्यान पिढ्या चालत आलेली स्त्री-पुरुष भेद भावाची दरी संपुष्टात आलेली आहे. आज समाजामध्ये स्त्री- पुरुष समानता अनेक क्षेत्रात असलेली दिसून येते. त्यापाठीमागे शिक्षण हेच कारण आहे. शिक्षण घेतल्यामुळेच इंदिरा गांधी यांना पंतप्रधान होता आले. शिक्षण घेतल्यामुळेच श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना देशाचे राष्ट्रपती होता आले. ही ताकद केवळ शिक्षणात आहे. अशी असंख्य उदाहरणे आदर्श म्हणून आपल्या समोर उभी आहेत. त्यांचा आदर्श घेऊन आपण ही शिक्षण घेऊन स्वावलंबी बनले पाहिजे व एकूणच विकासात आपला हिरीरीने सहभाग घेतला पाहिजे. शिक्षण घेतल्याने आपल्याला वेगवेगळया क्षेत्रांतील वेगवेगळया विषयाचे ज्ञान प्राप्त होते. शिक्षण घेतल्याने आपली, कुटुंबाची, समाजाची, राष्ट्राची प्रगती होते. आपला देश पूर्णतः साक्षर झाल्यास देशाला विकासाच्या टप्प्यात यायला काहीच वेळ लागणार नाही. आपल्या मधील असणाऱ्या सद्गुणांचा विकास करून आपण आपल्या पायावर खंबीरपणे उभे राहण्याचे बळ शिक्षण निर्माण करते. शिक्षण घेतल्याने महिला विविध क्षेत्रात जशा नोकरी व्यवसाय करतात तशा अनेक महिला घर बसल्या देखील आपला व्यवसाय करताना दिसत आहेत. शिक्षणामुळे आपल्याला वेगवेगळया व्यवसाय क्षेत्रात नाव लौकिक करण्याची संधी प्राप्त झाली आहे. एकेकाळी खानदानीपणा व रीतीरिवाजाच्या नावाखाली घराबाहेर न पडणारी स्त्री आज आपला स्वतःचा व्यवसाय खंबीर पणे सांभाळताना दिसत आहे. स्वतःच्या हिंमतीवर नवनवे उद्योगधंदे व्यवसाय स्त्रिया निर्माण करू शकतात. त्यामुळे सर्व महिलांनी शिक्षण घेतले की आपल्या अंतर्मनात जागृती निर्माण होऊन आपल्या व कुटुंबाच्या विकासा बरोबरच आपल्या राष्ट्राच्या विकासाला हात भार लावता येतो. आज जो आपला देश विकसनशील टप्प्यावर आहे तो विकासाच्या टप्प्यावर यायला काही वेळ लागणार नाही. त्यामुळे स्त्री-पुरुष व विशेषतः आजची तरुण पिढी यांनी शिक्षण घेऊन संशोधनाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लावले, तंत्रज्ञान विकसित केली तर आपल्या देशाची प्रगती व्हायला काही वेळ लागणार नाही. शिक्षण नसल्यामुळे माणसाचे जीवन अधुरेच राहते. आज शिक्षणा शिवाय उपाय उरलेला नाही. म्हणून प्रत्येकाने शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे.

**- दिव्या दहिकांबळे**

बी. ए. व्दितीय वर्ष

****

# शिक्षणातून नोकरी की व्यवसाय?

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्या भारतातला बहुसंख्य व्यवसाय हा शेतीशी निगडित आहे. तरी पण शेतीशी निगडीत असलेल्या अनेक समस्यांमुळे शेतीत कितीही काबाड कष्ट केले तरी मनावे तितकेसे यश येताना दिसत नाही. कारण शेती व शेतकरी दरवर्षी दुष्काळाच्या खाई मध्ये सापडतो. त्यामुळे शेतकरी सदोदित आर्थिक विवंचनेत असतो. आपल्या भारतात शेतीशी निगडित अनेक उद्योगधंदे, व्यवसाय आहेत. आज शिक्षणाचा प्रचार प्रसार सगळीकडे झाला असल्याने प्रत्येकाच्या घरातील मुलगा मुलगी शाळा, महाविद्यालयातून शिक्षण घेताना दिसतो आहे. बहुसंख्य जण शिक्षण घेऊन नोकरीच्या मागे अहोरात्र लागलेले दिसतात. परंतु या स्पर्धेच्या युगात सहजा सहजी नोकरी मिळणे अवघड होऊन बसले आहे त्यामुळे सुशिक्षित तरुणांनी शिक्षण घेऊन केवळ एखादी नोकरी शोधावी का आपल्या प्रयत्नातून शिक्षणाच्या संस्कारातून एखादा सुंदर व्यवसाय निवडावा? हा महत्त्वाचा प्रश्न आपण चर्चेत आणला पाहिजे. आज शिक्षण शिकून पदव्या घेणाऱ्यांची संख्या अफाट आहे. आजच्या युवकांसमोर बेकारीचा भस्मासूर हा आ वासून उभा आहे. काही सुशिक्षित तरुणांना एवढे शिकून व्यवसाय करण्याची लाज वाटते. अनेक जणांना व्यवसाय करावयाचा असतो; पण त्यांच्याकडे भांडवल नसते. त्यामुळे बेकारीचा भस्मासूर वरचेवर वाढत जाताना दिसून येतो आहे. पण प्रत्येकाला नोकरी लागणे आजच्या युगात तरी शक्य होणार नाही. कारण माणसानेच आपल्या संशोधनातून नवनवीन तंत्रज्ञान विकसित केलेले आहे. शेकडो माणसांची कामे एखादे यंत्र करताना दिसत आहे. त्यामुळे बेकारी प्रचंड वाढलेली आहे प्रत्येकाला नोकरी देणे सरकारला देखील अशक्य झाले आहे, परंतु मला वाटते की आपल्या एवढ्या मोठ्या देशात अनेक नैसर्गिक साधन संपत्ती मुबलक प्रमाणात असताना, प्रचंड मनुष्यबळ असताना त्याचा सदुपयोग जर चांगल्या व्यवसायाशी जोडला व नोकरीच्या मागे न लागता नियोजन करून योग्य व्यवसाय केला तर आपण जीवनात नक्कीच यशस्वी होऊ. यापूर्वीच्या ज्या ज्या तरुणांनी व्यवसाय निवडून त्यात प्रयत्नांची पराकाष्ठा केली ते व त्यांचे व्यवसाय आज नावारूपाला आलेले आहेत. उलट त्यांच्या व्यवसायात त्यांनी शेकडो, हजारो तरुणांना नोकरी लावलेली आहे ही ताकद आहे शिक्षणामध्ये. आपण केवळ नोकरीसाठी शिक्षण घेतले तर मात्र दुबळेबनू; पण चांगले शिक्षण घेऊन त्याचा उपयोग चांगले व्यवसायासाठी जर केला तर मात्र आयुष्यात नक्की यशस्वी होऊ, असा विश्वास

मला वाटतो. म्हणून तरुणांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग नोकरी पेक्षा चांगल्या व्यवसायासाठी करावा जेणे करून आपल्या बरोबरच आपल्या राष्ट्राची उन्नती आपल्याला साधता येईल.

शिक्षणाला प्रशिक्षणाची जोड दिली तर नोकरी पेक्षा व्यवसाय हा केव्हाही श्रेष्ठ दर्जाचा ठरतो अगदी अशिक्षित व्यक्ती सुद्धा थोडा अनुभव व प्रशिक्षण मिळाल्यानंतर अनेक नव नवीन वस्तू बनवून आपली व कुटुंबाची उपजीविका भागवताना दिसतात असे अनेक व्यवसाय आहेत की, ज्यात आपण आपला वेळ दिला, श्रम ओतले तर त्याचे फलित किती तरी पटीने आपल्याला मिळणार असते. म्हणून नोकरीच्या मागे न लागता आपल्या शिक्षणाचा उपयोग उत्तम व्यवसायासाठी केला पाहिजे.

बरेच जण भांडवल नसल्याचा कांगावा करतात व ऐतखाऊपणे फिरतात. पण आपण जर आपल्या शिक्षणाचा उपयोग करून आपले कौशल्य पणाला लावले तर वेगवेगळ्या शोभेच्या वस्तू बनवून विकणे, खाद्य पदार्थ तयार करणे, शिवणकाम, रंगकाम, कुक्कुटपालन यांसारखे छोटे छोटे व्यवसाय व उद्योग निवडून त्यामध्ये वेळ दिला, श्रम केले तर त्यात कितीतरी पटीने आपला फायदा होतो. इतकेच नव्हे तर आपण शिक्षण घेऊन कला-क्रीडा संगीत, अभिनय अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपली आवड म्हणून कौशल्ये जोपासून व्यवसाय क्षेत्र म्हणून याकडे पाहिले तर आपल्या प्रतिभा व कल्पकतेच्या जोरावर श्रमाची जोड देऊन मेहनत केली तर आपण नावारुपाला तर येतोच; पण त्याच बरोबर समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा व सोबत पैसाही प्राप्त करता येतो.

आजच्या स्पर्धेच्या युगात नोकऱ्यांचे प्रमाण नगण्य झाले आहे त्यात आपल्या कौशल्याला पूर्णवाव मिळेल याची ही शास्वती नाही. उलट आपण स्वतंत्रपणे आपला स्वतःचा व्यवसाय सुरु केलातर व्यवसायाचे अफाट दालन उघडे असल्याचे दिसून येते. कारण आज उद्योग धंद्याच्या व व्यवसायाच्या क्षेत्रांत भरपूरवाव आहे. फक्त त्यासाठी आपण आपली इच्छाशक्ती प्रबळ करून त्यासाठी प्रयत्नांची व धैर्याची हिम्मत दाखवली पाहिजे. कारण प्रयत्न व हिम्मत सोबत ठेवून आपल्या शिक्षणाचा उपयोग एखाद्या व्यवसायात केला तर संपत्ती, पैसा आपोआप आपल्या पदरी येऊन पडतो. अर्थात कोणताही व्यवसाय करताना सुरूवातीला कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी लागते. बाजार पेठेच्या कार्यक्षेत्रानुसार होणाऱ्या परिणामांची सहनशीलता ठेवायला पाहिजे. जसजसा उद्योग-धंद्यात अनुभव येत जाईल तसातसा तो व्यवसाय नेहमी फायद्यात राहताना दिसतो.

आजचा तरुण शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक पदव्या घेऊन नोकरीच्या शोधात भटकंती करताना दिसतो. नोकरीसाठी तो आपली जमीनजुमला गहाण ठेवायला अथवा विकायला मागेपुढे पाहत

नाही, खरेतर नोकरीतून खूप काही समाधान मिळेल असे नाही उलट एखादा व्यवसाय निवडला तर उद्योगधंद्यासाठी सरकार तर्फे बँकांच्या माध्यमातून सवलतीत भांडवल पुरविले जाते. करत असलेल्या व्यवसायात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी अल्पदरात कर्ज उपलब्ध होते. या शिवाय व्यवसाय कसा करावा? त्याच्यात बाजारपेठा कुठे व कशा उपलब्ध आहेत? या विषयी मार्गदर्शन करणाऱ्या अनेक संस्था उपलब्ध आहेत त्यांच्या मार्गदर्शनातून आपण आपला व्यवसाय चालवला तर त्यात प्रचंड नफा कमावता येतो. याची अनेक उदाहरणे आपल्या अवती भोवती दैनंदिन व्यवहारात आपणास नित्य नेमाने दिसून येतात. मिळालेल्या नफ्यातून आपल्या व्यवसायासाठी भांडवलात वाढ करता येते. त्या वस्तूच्या नफ्यातून कर्ज फेडून भांडवलात वाढ झाली की व्यवसायात प्रचंड प्रगती होताना दिसून येते. अगदी चहाच्या टपरी पासून किंवा गोळया बिस्किट हातात घेऊन फिरणाऱ्या व्यवसायापासून थोडाथोडा त्यातून भांडवलाची उभारणी करू शकू. आज व्यवहार दैनंदिन व्यवहारात सुरू ठेवले आहेत ही व्यवसाय करण्यातून सहज शक्य करता येते. कारण व्यवसाय करण्यापुरते शिक्षण व व्यवसायाची आवड आपल्या मनात निर्माण केली की आपोआप आपण प्रगतीकडे वाटचाल करत असतो.

कोणताही व्यवसाय करताना जोखीम ही आलीच; पण पूर्वीच्या तुलनेत ही जोखीम आता खूप कमी झाली आहे. कारण कुठलेही आपत्तीने व्यवसायात अडचण आली तर त्यासाठी अनेक विमा कंपन्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे व्यवसायातून अधोगती होईल असे चित्र दिसून येत नाही. खरेतर व्यवसायाचे असे अनेक फायदे असताना देखील आजच्या युवकाला इतके शिक्षण घेऊन ही नोकरीचाच ध्यास लागलेला असतो. व्यवसाय करायचा म्हटलं तर त्याला तनमनधन लावावे लागते. आपल्या कुटुंबा पासून काही काळ दूर देखील जावे लागते. पण असे दूर जाणे अनेकांच्या जिवावर येते. कमी श्रमात आहे त्या जागेवर जास्तीत जास्त मोबदला मिळणारे काम त्याला हवे असते. त्याच्या वृत्तीमुळे त्याच्या आयुष्यातून अनेक संधी चुकलेल्या असतात. खरेतर शिक्षण व्यवसाय करण्याचे शहाणपण शिक्षणामुळे माणसाला प्राप्त होते. व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली आहे असे असताना देखील आपण सरकारी नोकऱ्यासाठी उगीचच याची त्याची उंब्रे झिजवतो. परंतु असे न करता आपण स्वतःच्या हिमतीने व्यवसायात उतरलो तर आपली भरभराट नक्की ठरलेली असते. पण आज-काल प्रत्येकाला सर्व काही जागेवर हवे असते. प्रत्येकाला शहरातच गाडी, माडी, बंगल्यात राहावे वाटते. पण भारत हा खेड्यांचा देश असल्याने आपण खेड्यात गेले पाहिजे खेड्यातील लोकांच्या गरजांनुसार तिथे

उद्योगधंदे निर्माण केली पाहिजेत. शेतीच्या कच्च्या मालावर आधारित व्यवसाय त्याचा फायदा शेतकऱ्यांना व आपला ही करून घेता येतो. व्यवसाय करत असताना कुणाची लुबाडणूक फसवणूक करू नये व व्यवसाय केल्यास त्यात भरभराट शंभर टक्के ठरलेली असते. सचोटीने वागून व्यवसाय केल्यास त्या व्यवसायाचे संपूर्ण समाधान आपल्याला मिळत असते म्हणून आपण शिक्षण शिकून नोकरी मिळविण्याच्या नादात आयुष्य खर्ची घालण्यापेक्षा आपल्या शिक्षणाचा उपयोग व्यवसायासाठी केल्यास आपले आयुष्य नक्कीच सुखी संपन्न व समाधानी बनेल यात तिळमात्र शंका नाही.

**- संजीवनी येडले**

बी. ए. व्दितीय वर्ष

****

**मन करा रे प्रसन्न |**
**सर्व सिद्धींचे कारण |**
**मोक्ष अथवा बंधन**
**सुख समाधान इच्छा ते ||**

**- संत तुकाराम**

# स्वावलंबनासाठी शिक्षण ही काळाची गरज

सध्याचे युग हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे आहे. म्हणजेच सध्या आधुनिक काळामध्ये संगणकीय वापर मोठ्या प्रमाणात झालेला आपणास दिसून येतो. त्यामुळे आपणास पारंपरिक शिक्षणावर अवलंबून न राहता सध्याच्या युगात टिकून राहण्यासाठी जे आवश्यक शिक्षण आहे, म्हणजे संगणक ज्ञान असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर आपणास स्वतःच्या पायावर उभे राहायचे असल्यास पारंपारिक शिक्षणाबरोबर वेगवेगळया व्यवसायिक कौशल्यावर आधारित असे शिक्षण घ्यावे लागेल.

स्वावलंबन म्हणजे काय तर स्वतःच्या मेहनतीने, चिकाटीने, कष्टाने स्वत:चे अस्तित्व निर्माण करणे होय. भारतीय क्रिकेट विश्वामध्ये आपण सचिन तेंडुलकर यांचे नाव ऐकले आहे, आपणास माहीत आहे. सचिन तेंडुलकर यांचे शिक्षण जरी बारावीपर्यंत झाले असले तरी त्यांनी शिक्षण ही आपली कमजोरी न समजता त्यांनी क्रिकेटवर आपले लक्ष केंद्रित करून क्रिकेटचे नव नवीन धडे गिरवण्याची सुरुवात केली. त्यांचे गुरू रमाकांत आचरेकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांना घडवले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे त्यांनी स्वत:चे नाव क्रिकेट विश्वात निर्माण केले आहे.

अब्दुल कलाम यांचे उदाहरण देण्याचे झाल्यास शिक्षणाची ओढ, उत्कंठा व पुस्तकावरील प्रेमामुळे अब्दुल कलामांनी शिक्षणास जिंकले. ते नेहमी म्हणत असत‘ **वाचाल तर वाचाल’** काळाची गरज बघता आता आधुनिकतेकडे वळूया. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीत कर्ता पुरुष कमवायचा व दहा तोंडे त्या पुरुषावर अवलंबून होती. एकट्या कर्त्या पुरुषावर कुटुंबाचा भार असायचा. त्याच कुटुंबातील दुसरा पुरुष कर्ता नसला तर, तो परावलंबी असायचा. परंतु त्यांच्या मधली स्वाभिमान वृत्ती त्याला गहाण ठेवण्यास भाग पाडत होती. आता तसे नाही. माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात.

**“एक म्हणजे वाचलेली पुस्तके आणि**
**दुसरी भेटलेली माणसं”**

तुम्हाला जर यशस्वी व्हायचे असेल, तर योग्य अशा व्यक्तीकडून, गुरूकडून योग्य शिक्षण, मार्गदर्शन घ्यावे लागेल, त्यांच्या मार्गदर्शनामुळे तुम्ही ठरवलेले तुमचे लक्ष लवकरात लवकर आत्मसात करून एका उंच शिखरावर पोहोचू शकता. त्यामुळे स्वावलंबी होण्यासाठी काळानुरूप आणि अद्ययावत शिक्षण घेणे ही सध्या काळाची गरज आहे. त्यामुळे तुमचे यश इतरांसाठी एक आदर्श ठरू शकते.

- सोमेश्वर श्रीमंगले
बी. ए. प्रथम वर्ष

# स्वावलंबनासाठी शिक्षण

प्रथमतः शिक्षण म्हणजे काय? तर संस्कारित, स्वावलंबी, सकारात्मक, स्वाभिमानी, दूरदर्शी, विचारक इत्यादी गुणांनी परिपूर्ण म्हणजे शिक्षण होय. शिक्षण तर आवश्यक आहेच मात्र; स्वावलंबनासाठी शिक्षण आवश्यक आहे का? हे आज कित्येक जणांना पडलेला प्रश्न असणार. तर याचे उत्तर आहे 'हो'. शिक्षणाच्या व्याख्येतच आपण स्वावलंबन हा उल्लेख केला. शिक्षण घेतले तर स्वावलंबी होता येते व स्वावलंबी असलो की शिक्षण पूर्ण करता येते.

आत्ता स्वावलंबन म्हणजे काय? तर दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतःचे काम स्वतः करणे हे आहे. स्वावलंबन म्हणजे काय? तर जसे दुधातून पाणी वेगळे होत नाही त्याच प्रमाणे शिक्षणातून स्वावलंबन व स्वावलंबनातून शिक्षण वेगळे करता येत नाही. मुद्दा हा आहे, स्वावलंबनासाठी शिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे पूर्वीच्याकाळी अनेक महान व्यक्तीने तळागाळात शिक्षण पोहोचण्यासाठी अनेक कष्ट केले, असंख्य क्रूर गोष्टीचा सामना करावा लागला, त्याचे एक उत्तम उदाहरण असे देता येईल सावित्रीबाई फुले हे असे व्यक्तिमत्त्व आहे की तळागाळातील वंचित मुलींना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शिक्षणास प्रेरित केले. सावित्रीबाईनी केवळ मुलींना मार्गदर्शनच नाही केले, तर स्वतः आधी शिकल्या मग मुलींना शिकविले. आता बघा इथे 'स्व' निर्माण झालं स्वावलंबन स्वतः शिकणे व इतरांना शिकणे हे सावित्रीबाई जाणून होत्या. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्याचा मुख्य शिक्षणाचा पायारोवयासाठी खूप मोठा वाटा आहे.

शिक्षणाचे महत्त्व जसेजसे समाजात पसरत गेले तसतसे स्वावलंबनाची भावना ही स्त्रियांना व पुरुषांना दोघांनाही कळू लागली. मुख्यत्वे या स्वावलंबनाची खरी गरज स्त्रियांना अधिक रुसली. "चूल व मूल" या व्यतिरिक्त जग न पाहणारी स्त्री स्वतःच्या कष्टाने कुटुंबाला घराला गावालाच नाही तर संपूर्ण देश चालवू लागली. कशामुळे शिक्षण घेतल्यामुळे स्वतः मध्ये रुजलेला स्वामी यामुळे ती इतरांवर अवलंबून न राहता शिक्षण घेतल्यामुळे वेगवेगळया क्षेत्रात प्रगती करू लागली.

**"अवलंबण्याचे जहर असे करते कहर**
**नकळता मनाला करते जेरबंद**
**लोकावर ती राहते पदोपदी विसंबून**
**भावनेच्या भरात होई मेंढरू जसे अंध "**

वरील उक्ती प्रमाणे आपण जर इतरांवर अवलंबून राहू लागलो तर लोक आपला पदोपदी फायदा घेणार. हेच जर प्रशिक्षणात मनुष्य निपूण असला तर इतरांपुढे हात बसण्याची आवश्यकता वाटत नाही.

"शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे." हा सुविचार आपण शाळेत असताना नुसता तोंड पाठ करण्यासाठी म्हणायचो, मात्र त्याचा खरा अर्थ आपल्याला मोठे झाल्यावर, जगाशी संपर्क आल्यावर कळतो. 'थांबला तो संपला' ह्या उक्ती प्रमाणे शिक्षणापासून वंचित असलेल्या अनेक पुरुष व स्त्रिया इतरांवर अवलंबून राहत असत. शिक्षणामुळे लोकांना स्वतःचा निर्णय पूर्णपणे घेण्याची क्षमता विकसित झालेली असल्यामुळे इतरांच्या मतावर अवलंबून न राहता ठामपणे कुठल्याही निर्णयावर न डगमगता वाटचाल करू शकतो हे स्वावलंबन.

शिक्षणामुळे स्त्री ची ही प्रगती झाली. घरातील पुरुषच नव्हे; तर स्त्री देखील पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागली. स्वबळावर कुटुंबाची प्रगती करू लागली. शिक्षणामुळे स्वावलंबनाची जागृती झाली. जसा जसा काळ बदलत गेला तसा तश्या गरजा, अपेक्षा मोठ्या होऊ लागल्या. त्यामुळे एकविसाव्या शतकात तरी स्वावलंबनासाठी शिक्षण व शिक्षणासाठी स्वावलंबन खूप महत्त्वाचे आहे.

**"ध्येय साध्य करणे**
**किती कठीण असो**
**जर स्वावलंबन असेल**
**तर अशक्य असे काहीच नाही."**

**- किरण दुबळे**
बी. ए. व्दितीय वर्ष

****

**काटयावरुन चालणारा व्यक्ती**
**ध्येया पर्यंत लवकर पोहोचतो.**
**कारण**
**रुतणारे काटे पायाचा वेग वाढवतात.**

# आधुनिक शिक्षणाद्वारे आत्मनिर्भर व्हा !

जागतिक स्तरावर, आधुनिकीकरणानंतर शिक्षण आणि परीक्षा प्रक्रिया आणि स्वरूप यामध्ये लक्षणीय बदल झालेला आहे. म्हणूनच, लोकशाही, पर्यावरण, जागतिकीकरण आणि शिक्षणाची नवनवीन पद्धती कशी वापरली जाऊ शकतात हे शोधण्यावर लक्ष केंद्रित केले गेले पाहिजे. उच्च शिक्षणाद्वारे घडून येणारे बदल आणि त्याद्वारे जनतेमध्ये निर्माण होणारा आत्मविश्वास यानुसार संशोधन आणि अध्यापन सुधारण्यासाठी जगभरातील शिक्षण क्षेत्रात नवीनतम संशोधन प्रसारित करण्याची गरज आहे.

याशिवाय, आपल्याला भ्रष्टाचार आणि घराणेशाही दूर करावी लागेल; यासाठी केवळ चांगल्या प्रतिभेचे लोक निवडले जातील हे सुनिश्चित करावे लागेल.

इक्विटी आणि सरवासाठी प्रवेश हा उच्च शिक्षण प्रणालीचा अलीकडील प्रयत्न, विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना सक्षम आणि प्रेरित करण्याचा प्रयत्न आहे. या शिवाय, राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) लवकरात लवकर शाळा, प्रौढ, उच्चशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण यामध्ये प्रसार करण्याची आवश्यकता आहे. नवीन शैक्षणिक बदलांमुळे, विशेषत: तरुणांमध्ये समन्वय राखून, उच्चशिक्षणामध्ये नवीन दृष्टीकोन आणि शिक्षणामध्ये स्वच्छ प्रशासन आणि जबाबदारी आणली गेली आहे. सकारात्मक दृष्टीकोनातून बरेच सकारात्मक बदल सुनिश्चित केले जाऊ शकतात.

प्रामुख्याने संशोधन, शैक्षणिक उत्कृष्टता त्याचे संबंध आणि रोजगार क्षमतेच्या आधारावर संस्थांचे निरीक्षण करणे. संस्था उघडण्याच्या आणि बंद करताना देखरेख आणि आर्थिक अधिकारांचे विलगीकरण करण्याची प्रक्रिया, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता कशी सुनिश्चित करेल हे स्पष्ट असल्याचे दिसते. उच्चशिक्षणातील निवडी बद्दल कदाचित मुख्य आव्हान हे वाढत्या आंतरराष्ट्रीय, आंतर-अवलंबन आणि जागतिक बदलाच्या समकालीन संदर्भात निवड पद्धतीचे आहे.

विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे परीक्षण करण्यासाठी केवळ शैक्षणिक दर्जाच नव्हे तर त्यांच्या क्षमतेचे आणि ज्ञानाचे परीक्षण करून आणि त्यांच्या सामाजिक जबाबदारीचे आकलन करून बदल घडवून आणले पाहिजेत. सर्वसमावेशक वाढ सुनिश्चित करून अंतर्गत गतिमानता निर्माण करण्यात उच्च शिक्षण व्यवस्थेची ताकद आहे. एक उत्कृष्ट प्रणाली देखील फरक पाडणाऱ्या लोकांद्वारे

प्रभावित होते. मानवी आणि आर्थिक संबंध आणि व्यवहार तितके सोपे नाहीत जितके ते दिसतात..

आय. आय. टी. आय. आय. एम. नॅशनल रिसर्च फाउंडेशन, नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशन अँड इंटर प्रिटेशन यांच्या बरोबरीने बहु –विषयक शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे (एम ई आर यू) च्या तरतुदी शैक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमते पर्यंत पोहचण्यासाठी वातावरण तयार करू शकतात. जागतिक स्तरावर, एकीकडे नवीन माहिती स्वीकारणे आणि दुसरीकडे नोकरीभिमुख अभ्यासक्रमांचे नवीन क्षेत्र उघडणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

- **निखिल भालेराव**

बी. ए. तृतीय वर्ष

****

माणूस म्हणतो,
“पैसा आला की मी काहीतरी करीन”
पैसा म्हणतो,
“तू काही तरी कर
मगच मी येईन !!”

# उच्च शिक्षण आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास

**प्रस्तावना**

शिक्षण ही संकल्पना मानवी जीवनात अत्यंत महत्त्वपूणण स्वरूपाची मानली जाते सध्याचे युग हे जागशतकीकरणाचे आहे त्यामुळे प्राथशमक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणाला मोठ्या प्रमाणात महत्त्व प्राप्त झालेले आहे उच्चशिक्षणाची उत्पादकता आज मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे सामाशजक राजकीय आशथणक औद्योशगक नैशतक शवकास करण्यासाठी एक प्रभावी िस्त्र म्हणून उच्च शिक्षणाकडे आज सबंध जगातून पाशहले जात आहे औद्योशगक आशथणक शवकासाचे सिक्त माध्यम म्हणून उच्च शिक्षणाकडे पाशहले जात आहे एकशवसाव्या तकातील ज्ञान शनशमणतीचे, ज्ञान शवस्ताराचे संप्रेषण माध्यमाचे कौशिल्य शवकास क्षेत्राचे एक प्रभावी स्त्री म्हणून उच्च शिक्षणाकडे पाशहले जात आहे. पुस्तकी शिक्षणाला व्यावसाशयक अभ्यासक्रमाची जोड शदले जाण्याची गरज आहे. अनेक शिक्षण तज्ञांनी उच्च शिक्षणाचे महत्त्व सांशगतलेले आहे उदाहरणाथण महात्मा फुले यांनी प्राथशमक शिक्षणाचा पाया घातला तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महाशवद्यालयाची शनशमणती करून उच्च शिक्षणाला चालना शदली आहे शिक्षणाने माणसाचे मन, मनगट आशण मशस्तष्क सिक्त बनते शिकलेल्या मशस्तष्क कुणासही हस्तगत होत नाही उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तीचा मेंदूचा शवकास झालेला असल्यामुळे त्या व्यक्तीला सामाशजक धाशमणक शैक्षणिक आशथणक राजकीय आणि ज्ञानाबरोबरच त्याला व्यवहाररक ज्ञान प्राप्त होते शिक्षणाबाबत महात्मा गांधीजींनी असे म्हटलेले आहे शिक्षण म्हणजे माणसाचा सर्वांगीण शवकास होय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात शिक्षण हे वाशघणीचे दूध आहे जो कोणी प्राचिन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. यावरून मानवी जीवन आशण उच्च शिक्षण यांचे कसे घट्ट नाते आहे गशणत संबंध आहे ते आपल्या लक्षात येते शिक्षण घेतलेला व्यक्ती हा माणूस म्हणून जीवन जगू लागतो तो इतरांना माणसाप्रमाणे वागणूक देतो त्यामुळे आपोआपच तो चाररत्र्यसंपन्न ज्ञानसंपन्न, जिवंत आशण गुणवंत बनवून समाजात जीवन जगू लागतो त्यामुळे आपोआपच व्यक्तीच्या व्यशक्तमत्त्वाचा शवकास साधला जातो व्यक्तीच्या अंगी असलेल्या अज्ञान अंधश्रद्दा रूढी परंपरा नाही आणि होतात आशण व्यक्तीच्या अंगी वैज्ञाशनक दृशिकोन शनमाणण होतो असा व्यक्ती प्रत्येक गोष्टींचे शचंतन मनन करून शहानिशा करून खऱ्या खोट्या संकल्पनांचा आढावा घेऊन शचशकत्सक बुद्दीने सारासार

विचार करून प्रत्येक गोष्टीकडे तो पाहू लागतो आशण हे सवण शिक्षणामुळे शक्य होते व्यक्तीला जर शिक्षण शमळाले नाही तर तो माणूस असून पशु समान जीवन जगत असतो गुलाम लाचार बनून जीवन जगत असतो शिकलेला माणूस मात्र स्वाभिमानाने आत्मविश्वासाने आत्मनिर्भर बनवून जीवन जगू लागतो याचा अर्थ व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जातो व्यक्तीला कळुलागते की आपण मानव आहोत आपल्याला मानवाप्रमाणे जीवन जगायचे आहे त्यासाठी तो सदैव तत्पर असतो शिक्षणामुळे व्यक्तीला कळु लागते की आपण कसे बोलले पाहिजे इतरांशी कसे वागले पाहिजे कसे वर्तन केले पाहिजे या गोष्टी शिक्षणातून मानवाला कळू लागतात. उच्च शिक्षणामुळे व्यक्तीलाउच्चकोटीचेज्ञान प्राप्त होते. जगातील सर्व घडामोडींचा अभ्यास त्यांना सहजपणे करता येतो म्हणून मानवी जीवनाच्या विकासाच्या वाटचालीत अर्थात त्याच्या व्यक्तिमत्वाचे विकासात उच्च शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण स्वरूपाची आहे मानवी जीवनातून जर शिक्षणाला वजा केले तर येणारे उत्तर पशुहीनस्वरुपाचे असलेलेदिसूनयेईल आणि माणसातला पशू जर नष्ट करायचा असेल तर माणसाला उचशिक्षण घेणे काळाची गरज आहे.

उच्चशिक्षणाची उद्दीष्टे:

1) व्यक्तीमधील सुप्त कलागुणांच विकास घडवून आणने
2) व्यक्तीला स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविणे
3) नैतीक मूल्यांचा विकास घडवून आणने
4) संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन व संक्रमण करणे
5) व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडवुन आणणे

वरील उधिष्टे हे उच्च शिक्षणाचे उधिष्टे आपणास सांगता येतात त्यातून आपपोच व्यक्तीच्या वक्तीमहत्वाचा विकास साधला जातो. यावरून व्यक्तीचा सर्वांगीण विकास म्हणजे व्यक्तीच्या व्यक्ती महत्वाचा विकास होय. उच्च शिक्षण हे विध्यार्थ्यांना महाविद्यालय व विद्यापीठा मार्फत प्राप्त होत असते. ज्यातून त्यांना केवळ पुस्तकाचेच ज्ञान प्राप्त होत नाही तर त्या बरोबरच राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, विध्यार्थी संसद, विविध विषयाचे अभ्यास, संपादक, ग्रंथालय, युवक महोत्सव, निबंध स्पर्धा वादविवाद स्पर्धा, भाषण स्पर्धा, गटचर्चा, स्पर्धापरीक्षा विविध नेत्यांचे जन्म, पुण्यतिथी साजरी करणे अशा प्रकारे महाविद्यालय स्थरावरून,विद्यार्थ्यांना बौद्धिक मेजवानी दिली जाते त्यातून विद्यार्थ्यांनमध्ये राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक एकात्मता, भाईचार, बंधुभाव, सहकार्य, सद्भावना, धर्मनिरपेक्षता, लोकशाही मूल्य, मुलभूत हक्क आणि कर्तव्य या सारखी मूल्य रुजवली जातात त्यामुळे आपआपोच व्यक्तीच्या व्यक्तिमहत्वचा विकास साधला जातो

सारांश:

सारांश रूपाने असे म्हणता येते की उचशिक्षणांनाचे व्यक्तीच्या व्यक्तिमहत्वचा विकास साधला जातो.

**मेघा ससाणे**
**BASY**

# स्त्री शिक्षणाचे महत्त्व

भारतात आज विशेष करून शहरी भागात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया कार्यरत आहेत. परंतु आजही जर आपण भारताची तुलना इतर विकसित देशांशी केली तर आपल्या लक्षात येईल की महिलांना शिक्षित करण्यात आपण किती मागे आहोत. शिक्षण आयुष्यात खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणाने बुद्धीचा विकास होतो आणि सोबतच ज्ञान देखील वाढते. खरे पाहता शिक्षण हेच मुर्खाला विद्वान बनवते.

मागील काही दशकात देशात जी काही महिलांची स्थती सुधारली आहे ती फक्त आणि फक्त स्त्री शिक्षणामुळे शक्य झाली आहे. भारताला विकसनशील देश बनवण्यासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. मागील काही वर्षाआधी महिलांच्या तुलनेत पुरुषांच्या साक्षरतेची संख्या अधिक होती. भारताच्या स्वातंत्र्या नंतर जेव्हा देश प्रजासत्ताक राष्ट्र बनले तेव्हा पासून शासनाने महिला शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यायला सुरुवात केली.

जरी आज प्रत्येक गावागावात शिक्षण पोहचले आहे, तरीही देशातील काही ठिकाण असे ही आहेत जेथे स्त्रियांना शिकवणे व्यर्थ मानले जाते. त्यांना फक्त चूल आणि मुल सांभाळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. अशिक्षित महिलेपेक्षा एक शिक्षित महिला जास्त सक्रिय पद्धतीने कुटुंबाला सांभाळते. शिक्षित महिला तिच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला जवाबदार बनवते. ती तिच्या मुलांमध्ये चांगल्या गुणांचा संचार करते. अशा पद्धतीने एक शिक्षित महिला संपूर्ण कुटुंब आणि समाजाला शिक्षित करते. म्हणून स्त्री शिक्षणाकडे अधिकाधिक लक्ष द्यायला हवे.

स्त्री शिक्षणाचे अनेक फायदे आहेत. शिक्षण प्राप्त करून स्त्री मध्ये आत्मविश्वास आणि आत्मसन्मान निर्माण होतो. याशिवाय महिलांना शिक्षित केल्यावर कुटुंबाला त्याचे फायदे होतात. शिक्षित महिला नोकरी करून आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करू शकते. शिकलेले स्त्री आपल्या मुलांना कधीही अशिक्षित राहू देणार नाही. लहानपणा पासूनच ती आपल्या बाळामध्ये सद्‌गुणांचा संचार करील.

आज भारत हा स्त्री शिक्षणात नित्य प्रगती करीत आहे. भारताचा इतिहास अनेक शूरवीर महिलांनी भरलेला आहे. घरातील चुली पासून बाहेर निघून व्यवसाय, साहित्य, प्रशासन, पोलिस, सैन्य, खेळ इत्यादी क्षेत्रांमध्ये महिला पुढे आल्या आहेत

**कुसुम देमगुंडे**
बी.ए. तृतिय वर्ष

****

# शिक्षणाचे महत्त्व

शिक्षण म्हणजे एक प्रकारचे शस्त्र आहे. जर हे शस्त्र तमच्याकडे आले तर तुम्ही त्याचा वापर करून जग जिंकु शकता आणि जर तुमच्याकडे शिक्षण नसेल तर देशाचे अख्खे सैन्य तुमच्या बाजुने दिले तरी तुम्ही जिंकाल याची शक्यता कमीच आहे.

जर शिक्षण नसेल तर त्याचे कायकय नुकसान होते आणि शिक्षण नसलेल्या माणसाची आवस्था म्हणजे हात असुन सुद्धा हात नसलेल्या माणसासारखी आसते.

आपल्या देशात देश स्वातंत्र्य झाल्या पासुन गरिबी, फसवणुक, लोकसंख्यावाढ, भ्रष्टाचार, चोर्या, गुंडगिरी या गोष्टी अजुनपण चालु आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळुण ५० वर्ष पूर्ण झाली तरी पण आजही आपला देश या समस्या पासुन सुटू शकला नाही कारण याला मुख्य कारण आहे आपल्या देशातील निरक्षरता.

कारण जे देश आपल्या मागुन स्वातंत्र्य झाले आणि आज त्यांच्या देशात आपल्या पेक्षा जास्त प्रगती झाली आहे. कारण त्यांनी आगोदर जास्तीत जास्त लोंकाना चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले आहे अशा देशात साक्षरतेचे प्रमाण जवळजवळ ९९ % इतके आहे. त्यामुळे हे देश वेगाने प्रगती करू शकले आणि शिक्षणामुळे तिथल्या लोंकानी सरकारला ही प्रगती करण्यात साथ दिली.

आपल्याकडे असणार्या अनेक समस्या या देशात नाहीतच आणि जरी असल्यातरी त्या अत्यल्प आहेत. आज आपल्या देशात निरक्षरतेमुळे निरक्षर लोंकाना लिहता वाचता येत नाही. तसेच लिहता वाचता नाही आल्यामुळे जगामध्ये असलेली महत्वाची माहिती त्यांना मिळत नाही.

तसेच या लोंकाचा शाररिक, मानसिक, तसेच आर्थिक दृष्या विकास होत नाही कारण जर तुम्हाला या जगात काय चाललय हेच माहिती नसेल तर जे आहे तेच अंतिम सत्य म्हणुन स्विकारता आणि शिक्षण नसलेल्या माणसाची आवस्था ही त्या तळयातल्या बेडका सारखी होते त्याला ते तळे म्हणजेच जग वाटते.

तसेच निरक्षर किंवा आडाणी माणसाला व्यसनाची सवय लागते. कधी कधी तर तो त्या व्या सणाच्या आहरी जाऊन आपले जीवन सुद्धा संपवतो म्हणुन आपल्या देशातील लोकसंख्या, भ्रष्टाचार, व्यासनाधीनता, गरिबी, अशा समस्या सोडवायच्या असतील तर आपल्याला शिक्षणा शिवाय पर्याय नाही.

तसेच जर एखाद्या घरात जर शिकलेला माणुस नसेल तर त्या घराला अनेक प्रकारच्या समस्याला तोंड द्यावे लागते आणि त्याच एवजी एखाद्या निरक्षर घरातील एक जरी माणुस शिकला तरी तो एक माणुस संपुर्ण घराचे कल्याण करतो तसेच येणार्या पिढ्यांचे सुद्धा तो कल्याण करतो.

याचे उदाहरण सांगायचे झाले तर जिल्हाधिकारी असलेले रमेश घोलपसर रमेश घोलप यांची आई बांगड्या विकण्याचा पण त्यांना माहित होते शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणुन

त्यांनी आपल्या मुलांना म्हणजेच रमेश घोलप यांना शिक्षण दिले आणि आज रमेश घोलप हे जिल्हाधिकारी झाले आहेत त्यांच्या आईला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागले त्या सगळया समस्या रमेश घोलप यांनी संपवुन टाकल्या तसेच त्यांनी स्वताः बरोबरच संपुर्ण घराचे आणि त्यांच्या पुढील काही पिढ्यांचे सुद्धा कल्याण केले हे सगळे शक्य झाले ते शिक्षणामुळेच.

शिक्षण घेतल्यामुळे काय होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे रमेश घोलपसर आहेत त्यामुळे तुम्हाला भविष्यात काही होयचे असेल पण त्यासाठी शिक्षण घेणे खूप महत्वाचे आहे शिक्षण हे जगाच्या ग्रंथालयाची चावी आहे या चावीने तुम्ही जगाच्या ग्रंथालयाची सगळया प्रकारचे ज्ञान घेऊ शकता आणि तुमचे जीवन अतिशय सुखकर बनवू शकता.

तसेच जर तुम्ही शिक्षण घेतले तर तुमच्यासाठी जगातील अनेक मार्ग उघडतील आणि जर तुम्ही शिक्षण नाही घेतले तर तुम्हला अत्यंत कमी मार्ग मिळतील किंवा एक दोनच मार्ग मिळतील त्यामुळे तुम्हाला तुमच्या आवडीच्या क्षेत्रात काम करता येणार नाही आवडीचे काम करायचे असेलतर शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

ग्रामीण भागात खूप विद्यार्थी असे आहेत ज्यांना शिक्षणन घेता आल्यामुळे लहान वयातच काम करावे लागते आणि ते बालमजूर बनतात.

कायद्याने बालमजुरी हा गुन्हा आहे असे जर तुमच्या आजूबाजूला होत असेलतर ते थांबवा किंवा प्रशासनाला कळवा ग्रामीण भागात अनेक मुलांना शिक्षणाची आवड असते पण त्यांचे पालक त्यांना शिकूदेत नाहीत किंवा म्हणतात कि शिक्षणासाठी खर्च करण्याची आपली ऐपत नाही तर आशा विध्यार्थ्यांनी घाबयायचे काही कारण नाही कारण मोफत शिक्षण देण्याची ही जबादारी हि आता सरकारची आहे.

सरकारने अल्पदारात सर्वांना शिक्षण घेता येईल अशा योजना आणल्या आहेत त्यामुळे तुम्हाला शिक्षण घेण्या पासून कोणीही रोखू शकत नाही जर तुम्हाला खरंच शाळेत जायचे असेल तर तुमच्या जवळ वाडी वस्ती जिथे शाळा असेल तिथे जाते थील शिक्षकांना भेटा आणि त्यांना सांगा कि मला शाळेत जायचे आहे पण घरचे नको म्हणतात.

त्यानंतर ते शिक्षक स्वतः येऊन तुमचा घरच्यांना सांगतील तसेच तुम्ही शाळेत गेल्यावर तुमचा जेवणाची, पुस्तकांची सोयही शाळाच करेल असे तुमचा घरच्याना सांगा मग मात्र नक्कीच तुमच्या घरचे तुम्हाला शाळेत पाठवतील तर तुम्हला तुमच्या मना प्रमाणे जीवन जगण्यासाठी तसेच आयुष्यात मोठे होण्यासाठी व समाजात आपल्याला आदर मिळावा तसेच तुमची स्वप्ने काही पण असो ते पूर्ण होतील ती पुर्ण करण्याचा मार्ग शाळेतून जातो तेव्हा आता तुम्हाला सर्वांना शिक्षणाचे महत्व समजले असेल.

**तेजस्विनी गायकवाड**
बी. ए. तृतिय वर्ष

# The Importance of Education in Personal Growth

*Education is a powerful weapon which you can use to change the world.*

This remark, uttered by Nelson Mandela, wonderfully encapsulates the value of education. An individual's education begins with the first question and ends with the last, implying that it can (and should) last a lifetime. It has a significant impact on your personal development, which, in turn, influences your relationships and career performance. You may improve your brain's ability to think, analyse, and process by supplementing it with fresh and relevant information. The truth is that a youngster begins learning the moment they open their eyes. Playing, touching, smelling, observing, and subsequently asking questions are all ways that a youngster explores and discovers the world.

The first contact children have with formal education is usually the kindergarten, but there are various options for pre-kindergarten education. In fact, children can benefit immensely from attending an early learning centre, because it creates the perfect foundation for lifelong learning. Children who start their education early create a healthy learning habit and consider things such as reading, as a normal part of life, instead an annoying chore.

Both for the kids and the adults, education starts by asking a question and continues on to gathering objective information and placing them into appropriate context, where it is assimilated and processed to become a knowledge which widens the learner’s horizons. Widening the horizons is necessary for personal development, and it goes way beyond formal education.

In the words of Indian author, Chanakya: “Education is the best friend. An educated person is respected everywhere. Education beats the beauty and the youth”. This implies that your self-image will be clearer and more

positive the more you learn. Knowledge is a lifelong asset which can never be taken away from you and can always be updated. There are several ways learning can improve your confidence. It improves your standing in society, it makes you feel good about yourself, it allows you to put forth your ideas more eloquently, it provides a firm foundation for a career, it allows you to always enhance your repertoire, it provides many opportunities and, in the end, it plays an important role in your financial success.

"Schooling" is not the only acceptable form of learning. Further knowledge and skills should be acquired throughout your entire life. Lifelong learning is a path for the ones with positive attitude toward learning, both for professional and personal progress. It is different than formal education, because it is a voluntary act. People can decide to learn many things because of their development, including some skill (sewing, car mechanic), their origin, history of the place they live in (or some place they are traveling to), work-related topics or basically anything that will challenge their minds and lead to that previously mentioned widening of the horizons.

Learning is a skill also, and you need to master it, especially if, during your formal education, you were by-heart learner. Remember that prerequisite for learning is your willingness. If you struggle to feel positive about learning, you will probably not do well. Effective learning means that you should find information which you will later translate into knowledge or skill. Always take notes, examine, question and reflect on everything you have learned. Lifelong learning carries a number of benefits to continual personal and professional growth.

**- Kamble Dhanashree**

B.A.F.Y.

# Self - Reliance Through Education

Self-reliance is acquiring the necessary skills and talents to carry out one's daily activities without the assistance of others. Its essential is to not wait for opportunity to knock on one's door, but to create possibilities for oneself by hard effort and the acquisition of the attributes required to advance in life. It can also refer to waiting for the appropriate chance while making diligent preparations so that one is not left behind when it arrives. For students, this includes continuing to study regularly and making other preparations in order to perform well in the examination, interview, or group discussion.

People who are self-sufficient are the creators and rulers of their own fate. They come up with unique ideas, take new approaches, and serve as role models for others.Because they are resolute, single-minded, and self-disciplined, they are always able to attain their goals. They are aware of their relative strengths and weaknesses and channel their energies in such a way that their flaws are hidden from view. They have some scope to control things this way because they carry out their own intentions.

Self-reliance is the finest support, tool, and, in many cases, the quickest path to achievement. It has also been discovered that people who develop the practise of relying on others lose their ability to execute even minor tasks.

Self-reliance is the best support, best tool and, more often than not, the shortest way to success. It has also been found that those who develop the habit of depending on others lose their capabilities of doing even the small things. They get so used to asking for help for everything that they lose their confidence and are afraid of trying to do something themselves. They are not liked by anyone because they irritate others by asking for one thing or the other all the time.

There is a direct relationship between self-reliance and success. Studying the way of working of highly successful people shows us that they imbibed the habit of being self reliant at an early age. Lai Bahadur Shastri was born in a poor family. As a student he had to cross a lake to reach his school, but he never took a boat; he swam through it.

It does not mean that one should remain aloof and should not seek help where it is necessary. As a matter of fact mutual help is the basis on which society is built. At times we need to seek others' help and extend a helping hand to others who need it. A student needs guidance from his teachers, an employee needs cooperation from others In other words, for various activities and tasks we need the services or help of others. Self-reliance does not demand that we should not take such help.

It only demands that we should not depend on others for activities and actions that we are supposed to do ourselves. A student needs guidance of his teachers but he is supposed to learn his lessons, do his homework and build the level of intelligence and knowledge to pass the exams with his own efforts and hard-work. An income earner for the family is supposed to enjoy the services available for various functions. Self-reliance for him means that he should earn enough to fulfil the needs of his family including himself. Not to seek others' help when you need it or not to avail of the services which are at our disposal shall be foolishness not self- reliance.self-reliance also brings self-respect.

Self-reliance is not easy to acquire. It needs some degree of sacrifice to forgo ease and comfort to gear oneself up to get on with various types of activities. It needs a great sense of discipline to follow the given or set schedule to perform those activities.

**- Anjali Shinde**

B.A.S.Y

# English Language Skills Makes Self-reliant Person

The importance of communication in today's corporate world is undeniable. Being the most commonly used language in the business world, English has unmatched worth. A person equipped with a set of English language proficiency can smoothly excel in the business world since he is able to convey the technical skills he retains in an effective manner. These language skills can help him in securing better job opportunities and self reliant person in life.

Being a citizen of India where English is not a native language, having a good grasp of English language can create countless opportunities for an individual. In India, English occupies the role of the official language which increases its importance significantly. Even before you step into the professional world, you need fairly good communication skills in the English language to ace your interviews. Leaving a good first impression is significant in the job interviews. So, being able to chat in the English language will give you an edge in your job interviews. Almost every field in the market, ranging from management to sales and marketing scenario requires decent English language skills. Few of them are listed below.

English language expertise is a basic requirement for the jobs in Sales and Marketing. With the increasing popularity of English language among the current generation of Pakistan, it is necessary for advertising companies to conduct their campaigns in English. Most of the digital marketing is also done in English so improving your language skills will ensure good opportunities in this field.

Any job related to the representation requires a reasonable grip on the English language skills. If you are looking for a job in this very field, your spoken English, specifically,

has to be befitting since there is a lot of communication involved in it.

The jobs belonging to the arena of management require basic to higher level English skills depending on the nature of the job. It is necessary for someone in the team leadership to have English as a strong suit while for someone in the basic office management should be able to communicate with an elementary grasp of English language.

All the Writing Jobs starting from editing to the jobs in the field of literary Journalism demands advanced writing skills. In order to be a part of newspaper/magazine industry, you need to focus on your reading and writing skills in particular along with basic level speaking skills.

Teaching jobs require effective communication at all levels. A teacher has to be equipped with powerful English speaking skills in order to convey his message to the students. The need for advanced level spoken English skills coupled with reading and writing skills

Call centre jobs are focused on speaking. If you seek the job in the call centre industry, start improving your English speaking skills along with basic level writing skills. Writing skills will be needed to the level of understanding and responding to emails.

**- Shaikh Misba**

B.A.T.Y.

****

# विभागनिहाय अहवाल


मराठी
विभाग

# मराठी विभाग वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२०-२१चीसुरुवातकोव्हीड-१च्या महाभयानक महामारीच्या काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाली. सर्व जगाचे व्यवहार ठप्प झालेले असतानाही शैक्षणिक उपक्रम आभासी पद्धतीने का होईना पण सुरू होती. कारण शिक्षण ही मानवाची अन्न, वस्त्र, निवारा एवढीच महत्त्वाची मुलभूत गरज आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शना खाली शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची सुरुवात ऑनलाइन पद्धतीने करण्यात आली. सन्मानीय प्राचार्य मराठीचे विभाग प्रमुख असून त्यांच्या अध्यक्षते खाली मराठी विभागाची बैठक सत्रारंभी घेण्यात आली. या बैठकीत कोरोनाची परिस्थिती लक्षात घेऊन ऑनलाईन पद्धतीने शैक्षणिक उपक्रम राबवावेत असे ठरले. त्या प्रमाणे वर्षभर खालील उपक्रम राबविण्यात आले.

१. व्हाट्सअप समूह बी. ए. प्रथम. द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वतंत्रपणे *'महात्मा फुले मराठी* 'या नावाने व्हॉट्सप' चा समूह तयार करण्यात आला.

२. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त दिनांक१६ जानेवारी २०१९ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मराठी अभ्यास मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. विठ्ठल जम्बाले यांचे 'मराठी भाषा: वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर झूम मीटिंगच्या माध्यमातून ऑनलाईन व्याख्यान घेण्यात आले. या व्याख्यानाचा लाभ सर्व विद्यार्थी, प्राध्यापक यांना घेता आला.

३. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त खुले कवी संमेलन घेण्यात येऊन त्यामध्ये विद्यार्थी व अनेक मान्यवर कवींनी सहभाग नोंदवला. ऑनलाईन कवि संमेलनात सौ. ललिता आलसटवार, किशन उगवले, डॉ. संगीता अवचार, मुरारी कराड आदी सुप्रसिद्ध कवींनी सहभाग घेऊन उत्स्फूर्तपणे आपल्या कविता सादर केल्या.

४. मराठी भाषा संवर्धन पंधरवडाच्या निमित्ताने विविध वाङ्.मयीन स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. शेवटी या पंधरवड्याचा समारोप परळी येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मराठी अभ्यास मंडळाचे सन्माननीय सदस्य प्रोफेसर डॉ. राजकुमार यल्लावाड यांच्या ऑनलाईन व्याख्यानाने झाला.

५. कोरोना महामारीच्या संकटामुळे महाविद्यालय प्रत्यक्षात बंद होती, परंतु महाविद्यालयातील डॉ.

अनिल मुंढे व डॉ. मारोती कसाब यांनी स्वतंत्रपणे युट्युब चॅनेल काढून वर्षभर सर्व वर्गांच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमा नुसार आॅनलाईन तासिका घेऊन मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी विद्यापीठीय स्तरावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे गोपनीय कामकाज ही ऑनलाईन पद्धतीने पार पाडले.

६. मराठी विभागाचे प्रमुख तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांचे "राजकीय तिरंदाजी" हे पुस्तक अशा काळात ही प्रकाशित करता आले. डॉ. मारोती कसाब यांचे "रातं दिन असे" हा काव्य संग्रह व "महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळी" हा संपादित ग्रंथ तर डॉ.अनिल मुंढे यांचा "महात्मा फुले: व्यक्ती आणि कार्य" हा संपादित ग्रंथ प्रकाशित करता आला, याचा मराठी विभागाला निश्चितच आनंद आहे.

७. याशिवाय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, डॉ. अनिल मुंढे, डॉ. मारोती कसाब यांनी वेगवेगळया नियतकालिकांतून आपले अभ्यास पूर्ण शोध निबंध प्रकाशित केले.

८. मराठी विभागासाठी आनंदाची बाब म्हणजे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांना अंबाजोगाई येथील जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचा मानाचा पुरस्कार व डॉ. मारोती कसाब यांना पुरोगामी विचारमंच नाशिक यांच्या वतीने दिला जाणारा 'सत्य शोधक' पुरस्कार प्राप्त झाला आहे.

अशा प्रकारे कोरोना सारख्या महामारीत ही मराठी विभागाने प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या कुशल नेतृत्वा खाली यावर्षी ही दमदार कामगिरी करून गुणवत्तेच्या व संशोधनाच्या क्षेत्रात आपला नाव लौकिक कायम ठेवला आहे.

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ विद्यार्थी संख्या:

१.बी.ए. प्रथम (ऐच्छिक) मुले १९ मुली ३० एकूण ४९

२.बी.ए. प्रथम (द्वितीय भाषा) मुले १३ मुली ३१ एकूण ४४

३.द्वितीय वर्ष (ऐच्छिक) मुले०८ मुली १३ एकूण २१

४.बी. ए. द्वितीय वर्ष (द्वितीय भाषा) मुले ०३ मुली २० एकूण २३

५.बी. ए. तृतीय वर्ष – मुले १० – मुली १२ एकूण २२

## शैक्षणिक वर्ष २०१९-२० विभागाचा निकाल

### हिवाळी-२०१९ परीक्षा

१. **बी. ए. प्रथमवर्ष (द्वितीय भाषा)**

परीक्षा दिलेले- ३७ उत्तीर्ण २३ अनुत्तीर्ण १४ टक्केवारी - ६२.१६

२. **बी. ए. प्रथमवर्ष (ऐच्छिक)**

पेपर१ परीक्षा दिलेले ३१ उत्तीर्ण २१ अनुत्तीर्ण १० टक्केवारी - ६७.७४%

पेपर 2 परीक्षा दिलेली ३१ उत्तीर्ण १३ अनुत्तीर्ण१८ टक्केवारी - ४१.९३%

१. **बी.ए.द्वितीय (द्वितीय भाषा)**

परीक्षा दिलेले २१ उत्तीर्ण २१ अनुत्तीर्ण ०० टक्केवारी - १००%

२. **बी.ए. द्वितीय(ऐच्छिक)**

पेपर - ५ परीक्षा दिलेले २५ उत्तीर्ण २२अनुत्तीर्ण ०३ टक्केवारी - ८८.००%

पेपर - ६ परीक्षा दिलेले - २५ उत्तीर्ण- २२ अनुत्तीर्ण - ०३ टक्केवारी - ८८.००%

३. **बी. ए. तृतीय वर्ष**

पेपर - ९ परीक्षा दिलेले २० उत्तीर्ण १६ अनुत्तीर्ण ०४ टक्केवारी - ८५.००%

पेपर - १० परीक्षा दिलेले २० उत्तीर्ण १९ अनुत्तीर्ण ०१ टक्केवारी - ९५.००%

## उन्हाळी - २०२० परीक्षा

१. **बी. ए. प्रथम (द्वितीय भाषा)**

परीक्षेला बसलेले २६ उत्तीर्ण २५ अनुत्तीर्ण ०० टक्केवारी - १००.००%

२. **बी. ए.प्रथम( ऐच्छिक)***

पेपर - ३ परीक्षेला बसलेले २५ उत्तीर्ण २५ अनुत्तीर्ण ०० टक्केवारी १००.००%

पेपर - ४ परीक्षेला बसलेले २५ उत्तीर्ण २५ अनुत्तीर्ण ०० टक्केवारी - १००.००%

३. **बी. ए. व्दितीय (द्वितीयभाषा)**

परीक्षा दिलेली २१ उत्तीर्ण २१ अनुत्तीर्ण ०० टक्केवारी १००.००%

४. **बी. ए. व्दितीय (ऐच्छिक)**

पेपर- ७* परीक्षादिलेले२३उत्तीर्ण२३अनुत्तीर्ण००टक्केवारी-१००.००

पेपर-८* परीक्षादिलेले२३उत्तीर्ण२३अनुत्तीर्ण००टक्केवारी१००.००%

५. **बी. ए. तृतीय वर्ष**

पेपर-११* परीक्षादिलेले२०उत्तीर्ण२०अनुत्तीर्ण००टक्केवारी१००.००%

पेपर-१२* परीक्षादिलेले२०उत्तीर्ण२०अनुत्तीर्ण००टक्केवारी१००.००%


प्रा. डॉ. अनिल मुंढे

**प्रा. डॉ. मारोती कसाब**

मराठी विभाग

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर


हिंदी
विभाग

# हिंदी विभाग अहवाल
## 2020-2021

सन् 2000 मेंमहाविद्यालय की स्थापना के साथ हिंदी विभाग भी स्थापित हुआ है. तबसे हिंदी विभाग इस महाविद्यालय में कार्यरत है. इस महाविद्यालय में हिंदी विभाग निरंतर प्रगति के पथ पर अग्रसर है. इस महाविद्यालय में हिंदी विषय बी. ए.में
द्वितीय भाषा एवं ऐच्छिक के रूप में पढ़ाया जाता है. स्नातक स्तर पर हिंदी लेने के लिएछात्र-छात्राओं का 12वीं कक्षा में हिंदी विषय ही हो यह आवश्यक नहीं है. किसी भी विषय या संकाय का विद्यार्थी हिंदी विषय ले सकता है.

हिंदी को पढ़ाने के लिए महाविद्यालय के हिंदी विभाग में दोसहायक प्राध्यापक हैं. डॉ. नागराज मुळे 03 फरवरी 2004 से हिंदी विभागाध्यक्ष एवं असोसिएट प्रोफेसर के रूप में कार्यरत है तो डॉ.पांडुरंग चिलगर30 नवंबर 2009 से सहायक प्राध्यापक के रूप में कार्यरत है. दोनों पूर्णकालीन हैं.

हर साल महाविद्यालय की शुरुआत जून में होती है.परंतु इस साल  कोरोना महामारी के कारण ऑनलाइन तासिकाएँ ली गईं.प्रत्यक्ष रूप से महाविद्यालय की शुरुआत 15 फरवरी2021को हुई.हमारे महाविद्यालय में स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड़ा विश्वविद्यालय, नांदेड का सत्र निहाय पाठ्यक्रम पढ़ाया जाता है.

विद्यार्थियों के शैक्षिक हित को ध्यान में रखकर दिनांक 22 जनवरी 2021को हिंदी विभाग की ओर से 'हिंदी में रोजगार के अवसर' इस विषय पर ऑनलाइन व्याख्यान का आयोजन किया गया था. इस समारोह के लिए प्रमुख अतिथि के रूप में सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय, पुणे के हिंदी विभागाध्यक्ष डॉ. सदानंद भोसले जी ने मार्गदर्शन किया. महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपुर के प्रधानाचार्य डॉ. वसंत बिरादार ने इस कार्यक्रम की अध्यक्षता की.

विद्यार्थियों के सर्वांगीण विकास के लिए हिंदी विभाग सदैव तत्पर रहता है.विभिन्न गतिविधियों में भाग लेने के लिए हिंदी विभाग की ओर से छात्र-छात्राओं को सदैव प्रेरित एवं प्रोत्साहित किया जाता है.इस तरह सालभर सभीयों ने सहयोग देकर सफलता प्राप्त की.

धन्यवाद !

डॉ. नागराज मुळे
(हिंदी विभागाध्यक्ष एवं असोसिएट प्रोफेसर)

# RESULT OF HINDI DEPARTMENT (2019-20)

## WINTER-2019

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | Percentage |
|---|---|---|---|---|---|---|---|
| B.A.F.Y. | Hindi (S.L.) I | **64** | **45** | **19** | **34** | **11** | **75.55%** |
| | Hindi (Opt.) I | **35** | **26** | **09** | **08** | **18** | **30.76%** |
| | Hindi (Opt.) II | **35** | **26** | **09** | **16** | **09** | **61.53%** |
| B.A.S.Y. | Hindi (S.L.) III | **30** | **29** | **01** | **28** | **01** | **97.00%** |
| | Hindi (Opt.) V | **07** | **07** | **07** | **03** | **04** | **43.00%** |
| | Hindi (Opt.)VI | **07** | **07** | **07** | **06** | **01** | **86.00%** |
| B.A.T.Y. | Hindi (Opt.) IX | **21** | **20** | **01** | **19** | **02** | **90.47%** |
| | Hindi (Opt.)X | **21** | **20** | **01** | **20** | **01** | **95.23%** |

## SUMMER-2020

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | Percentage |
|---|---|---|---|---|---|---|---|
| B.A.F.Y. | Hindi (S.L.) II | **39** | **39** | **01** | **38** | **00** | **97.43%** |
| | Hindi (Opt.) III | **15** | **15** | **00** | **15** | **00** | **100.00%** |
| | Hindi (Opt.) IV | **15** | **15** | **00** | **15** | **00** | **100.00%** |
**८ मार्च २०२१ रोजी जागतिक मिहिला दिनानिमित्त महाविद्यालयात घेण्यात आलेल्या एक दिवसीय आंतर विद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्रात (महीला सबलीकरण वास्तव आणि अपेक्षा) प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. डॉ. ललिता गादगे मॅडम व प्रा. डॉ. माधवी कवी मॅडम दिसत आहेत.**

## कविसंमेलन

**महात्मा फुले महाविद्यालयात मा. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील साहेबांच्या अध्यक्षतेखाली समाजशास्त्र विभागाच्या वतीने कविसंमेलन घेण्यात आले.**






**कविसंमेलनात कवितेचे वाचन करताना प्रा. डॉ. प्रशांत बिरादार तसेच प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर व कवी प्रा.डॉ. मारोती कसाब यांचा सत्कार करताना.**

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

**कवि सम्मेलनात आपली बहारदार कविता सादर करणारी महाविद्यालयाची विद्यार्थीनी**





**समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कविसंमेलन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील, प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर यांचा सत्कार करताना सोबत उपप्राचार्य डॉ. डी. डी. चौधरी, प्रा.डॉ. बालाजी कारामुंगीकर, प्रा. डॉ. सतीश ससाणे दिसत आहेत.**

## मराठी राजभाषा गौरव दिन





**मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. अनिल मुंढे मंचावर आणि महामानवांच्या प्रतिमेची पूजा करताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील**

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे









**मराठी भाषा गौरव दिन प्रसंगी प्रमुख पाहूणे डॉ. पांडूरंग चिलगर यांचा सत्कार करत असताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार व मराठी भाषा गौरव दिन प्रसंगी भित्तीपत्रक प्रकाशन समारंभ**

**उत्तम स्वास्थ्यासाठी आयुर्वेद**



**उत्तम स्वास्थ्यासाठी आयुर्वेद कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. बी. के. मोरे मार्गदर्शन करताना**



**उत्तम स्वास्थासाठी आयुर्वेद कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार मार्गदशन करताना**

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१






उत्तम स्वास्थ्यासाठी आयुर्वेद कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. प्रशांत विरादार





राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियानाअंतर्गत सहभागी मा. प्राचार्य, सहकारी व विद्यार्थी




आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटन प्रसंगी माजी कुलगुरू डॉ. मोहंमद इकबाल अली मार्गदर्शन करीत असतांना

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर


STEVE JOBS
GLOBAL ECONOMY
STOCK MARKETS
NEWS
Sports
Education
Investigation
ECONOMISTS DIVIDED ON WHETHER
North Korea
economy
Germany
GOOGLE
Asia
Arts
hard to call anyone a wi
short story
BUSINESS
MARKETS

# वृत्तपत्र संकलन



शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

**लोकमत**

## म.फुले महाविद्यालय येथे अभिवादन

अहमदपूर : थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांना स्मृतिदिनानिमित्त येथील महात्मा फुले महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी.डी. चौधरी, डॉ. मारोती कसाब, डॉ. नागराज मुळे, डॉ. अनिल मुंडे, डॉ. पी.पी. चौकटे, ग्रंथपाल प्रा. पी.एम. इंगळे, डॉ. ए. एस. मोरे, डॉ. डी.एन. माने, प्रा. अतिश आकडे, डॉ.सचिन गर्जे, प्रशांत डोंगळीकर, अजय मुरमुरे, चंद्रकांत धुमाळे, वामन मलकापुरे, शिवाजी चोपडे, चंद्रकांत शिंपी आदी उपस्थित होते.

Hello Latur
Page No. 4 Nov 29, 2020
Powered by: erelego.com

## महात्मा फुले महाविद्यालयात साने गुरुजी यांची जयंती सा

देशोन्नती वृत्तसंकलन...



अहमदपूर ▪ येथील महात्मा फुले महाविद्यालयात साने गुरुजी यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिराजदार यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संघाचे अध्यक्ष बासिदखान पठाण यांची उपस्थिती होती.

अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात साने गुरुजी यांची जयंती २४ डिसेंबर रोजी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शिवसैनिक लक्ष्मण अलगुले, विराज गार्डनचे महेश चौधरी, भाजप शहराध्यक्ष श्याम यादव, प्रा.गणेश मदने यांची विशेष उपस्थिती होती तर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. डी. चौधरी, डॉ. अनिल मुंढे, डॉ. सतीश नागराज मुळे, डॉ. अभिजीत मोरे, कसाब, प्रशांत डोंगळीकर, शिवाजी च मलकापुरे आदींची उपस्थिती होती.

ePaper देशोन्नती Fri, 25 December 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/57276247

**वतनवाला**

## महात्मा फुले महाविद्यालयाच्या शिवजयंत देखाव्याने अहमदपुरांची मने जिंकली



अहमदपूर (प्रतिनिधी) हिंदवी स्वराज्याचे संस्थापक कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अहमदपूर शहरातून काढलेल्या भव्य मिरवणुकीत अग्रभागी असलेल्या महात्मा फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देखाव्याने अहमदपूरकरांची मने जिंकली. येथील महात्मा फुले महाविद्यालयात शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर फुले परिवारातर्फे आयोजित मिरवणुकीत महाविद्यालयाचे सांस्कृतिक पथकाने देखावे सादर केले. अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आ. बाबासाहेब पाटील, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा डी. आर. झोड , माजी आमदार विनायकरा पाटील, दिलीपराव देशमुख नगराध्यक्ष अश्विनी कासना , सांब महाजन , शिवानं हेंगणे यांनी मिरवणुकीती सहभागी विद्यार्थ्यांचे कौतु केले.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१



महादेव खळुरे यांना इनरव्हील क्लबतर्फे उपक्रमशील कलाध्यापक पुरस्कार

उदगीर एकमत

महात्मा फुले महाविद्यालयात 'गंदगी व प्लास्टीक मुक्त' स्वच्छता अभियान संपन्न



लोकमत

# भारताला ज्ञान-विज्ञानाची समृद्ध परंपरा

## आंतरराष्ट्रीय वेबिनार : प्रा. डॉ. कपिल मेहता यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

अहमदपूर : जगाचा ओढा भारतीय आध्यात्माकडे वाढला असून, भारताला ज्ञान-विज्ञान, ध्यानाची समृद्ध प्राचीन परंपरा लाभली आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील टेक्सास विद्यापीठातील प्रा.डॉ. कपिल मेहता यांनी केले.

महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि राष्ट्रीय संस्कृत मंच महाराष्ट्राच्या वतीने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय संस्कृत विषयाच्या वेबिनारमध्ये प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. मेहता बोलत होते. ऑनलाईनच्या माध्यमातून आयोजित केलेल्या वेबिनारच्या अध्यक्षस्थानी किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. विजयकुमार पाटील शिरोळकर होते. उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते झाले यावेळी प्र-कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, डॉ. भगवान जाधव, संस्थासचिव ज्ञानदेव झोडगे, प्राचार्य डॉ.वसंत बिरादार, डॉ. राजेशकुमार मिश्रा यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. प्रशांत बिरादार यांनी तर सूत्रसंचालन डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केले. आभार उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी यांनी मानले.

Hello Latur
Page No. 4 Aug 24, 2020
Powered by: erelego.com



पुढारी

संक्षिप्त

### पं.दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरी

अहमदपूर : पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती येथील येथील महात्मा फुले महाविद्यालयात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनीही प्रतिमेचे पूजन केले. या वेळी ह.भ.प. प्रा. डॉ.अनिल मुंढे यांनी पं.दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवन व कार्यावर अभ्यासपूर्ण विवेचन करून प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सतीश ससाणे, सूत्रसंचालन प्रा. डॉ. मारुती कसाब यांनी तर आभार प्रा. डॉ. अभिजित मोरे यांनी मानले.

My Latur Edition
Sep 29, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in



आस-पास

शुक्रवार, दि. 14 ऑगस्ट 2020 दैनिक

रत्नापूर समाचार

### बी.ए. प्रथम व द्वितीय वर्ष परीक्षेत महात्मा फुले महाविद्यालयाचे घवघवीत यश

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

वतनवाला 9-1-2021

## आनंद जोपासणारी झाडं जोपासायला हवीत संवर्धन – प्राचार्य डॉ.बिरादार

**अहमदपूर (प्रतिनिधी)**

आपल्याला झाडे ऑक्सिजन देतात.आनंद देतात. आपलं दुःख विसरून इतरांसाठी जगण्याचं बळ देतात. म्हणून झाडांचं संवर्धन करायला हवेत, ती जपायला हवीत, असे मत प्राचार्य डॉ. वसंत बिरादार - पाटील यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथील प्राध्यापकांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ज्या प्राध्यापकांचा वाढदिवस असेल त्यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयास एक वृक्ष भेट देण्याचा व महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे अभीष्टचिंतन करून यथोचित सन्मान करण्याचा अभिनव व आदर्श पायंडा निर्माण झाला आहे. नुकताच महाविद्यालयातील हिंदीचे सहाय्यक प्राध्यापक व एन. एस. एस.विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.पांडुरंग चिलगर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. व 'नव्या वर्षाची सुरुवात वृक्षांच्या सहवासात' या अभिनव कार्यक्रमाची घोषणा एन. एस. एस. विभागाकडून करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार- पाटील हे बोलत होते. नव्या वर्षाची सुरुवात 'वृक्षांच्या सहवासात' ही संकल्पना महात्मा फुले महाविद्यालयात राबविली जात आहे.वृक्षांचे आपल्यावर अनंत कोटी उपकार आहेत. तसेच आई -वडिलांचे प्रतीक म्हणून वृक्ष, पिंपळ या सह इतर वृक्षांची लागवड करणे व त्यांची वाढ करणे,तसेच त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे,असेही ते म्हणाले.

कोणताही समारंभ असेल तर झाड लावायला हवे. वाढदिवस किंवा इतर आनंदाचा क्षण असेल तर झाड



### फुले महाविद्यालयात 'नव्या वर्षाची सुरुवात वृक्षांच्या सहवासात' या अभिनव उपक्रमाची एन.एस. एस.विभागाकडून अंमलबजावणी

लावून तो साजरा करायला हवा. त्या क्षणाची आठवण म्हणून ते झाड कायम आपल्याला ऑक्सिजन देईल असे उपक्रम ठिकठिकाणी व्हायला हवीत,असाही आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रा. डॉ.बब्रुवान मोरे, डॉ.सतीश ससाणे, डॉ.अनिल मुंढे, डॉ.नागराज मुळे, ग्रंथपाल प्रा.पी.एम.इंगळे, डॉ. ए. एस.मोरे, डॉ. पी.पी.चौकटे, डॉ. डी. एन. माने, डॉ. पी.बी. बिरादार , डॉ. एस.एच. गर्जे, डॉ. मारोती कसाब , प्रा. ए. सी. आकडे, प्रशांत डोंगळीकर, अजय मुरमुरे, चंद्रकांत धुमाळे, वामन मलकापुरे,शिवाजी चोपडे आदिंची उपस्थिती होती.

गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

स्थापना १९६२/RNI No.63
REGD.NO. 02/RNP/NND-27/2021

◆ मंगळवार, दि. ९ मार्च २०२१ ◆ पृष्ठे ६ ◆ किंमत २ रुपये

## शासकीय योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहोचणे गरजेचे -डॉ. मोहम्मद इक्बाल अली

**अहमदपूर** – महिलांचा राजकीय आणि आर्थिक दर्जा सुधारणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेणे महत्त्वाचे आहे. विकास जागृती आणि आत्म सन्मानाची वागणूक देणे म्हणजेच महिलांचे सक्षमीकरण. हे सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी शासनाच्या असलेल्या विविध महिला उपयोगी योजना त्यांच्यापर्यंत पोहचविणे आवश्यक असल्याचे निखळ प्रतिपादन वरंगल येथील सातवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद इक्बाल अली (हैदराबाद) यांनी केले.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभागाच्यावतीने आभासी तथा दूरदृश्य प्रणाली (ऑनलाइन) च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'महिला सशक्तीकरण वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर समाजशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. मोहम्मद इक्बाल बोलत होते. या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले महाविद्यालयाच्या माजी आदर्श विद्यार्थी सौ. माधवी चौकटे (औरंगाबाद) ह्या होत्या. तर विषय तज्ज्ञ म्हणून डॉ. अनुपमा अलवाईकर, डॉ. मीनाक्षी नांदापूरकर, (हैदराबाद) सुप्रसिद्ध लेखिका डॉ. ललिता गादगे, डॉ.माधवी कवी (पुणे)आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शोध पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनात पुढे बोलताना डॉ. मोहम्मद इक्बाल अली म्हणाले की, महिलांचा विविध क्षेत्रात दर्जा सुधारणे आवश्यक आहे. यासाठी त्यांना पुरुषाच्या बरोबरीने माणूस समजून वागणूक देणे महत्त्वाचे आहे. आपल्या देशात महिलेला देवता मानले जाते पण तिचा छळ ही होतो हा छळ ही थांबला पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. अनुपमा अलवाईकर, डॉ. मीनाक्षी नांदापूरकर, डॉ. ललिता गादगे, डॉ. माधवी कवी आदींनी वेगवेगळ्या सत्रामध्ये तर या राष्ट्रीय चर्चा सत्राच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना स्त्रियांविषयी गौरवोद्गार काढले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष समारोपाप्रसंगी सौ. माधवी चौकटे म्हणाल्या की, घरात मुलांचा अभ्यास घेणारी सरस्वती, अन्न बनवणारी अन्नपूर्णा देवी, अत्याचार झाला तर कालिकेचे रूप घेणारी कालिका तर कुटुंबावर संकट आले तर दुर्गेचे रूप धारण करणारी ही स्त्रीच आहे . स्त्री घरात चांगले आर्थिक नियोजन लावते. स्त्रीमुळेच घराला घरपण येतं परंतु त्याच स्त्रीला समानतेची संधी देऊन सन्मानाची वागणूक देण्याची गरज आहे, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाने यांनी केले तर सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. नागराज मुळे यांनी केले. आभार इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. अतिश आकडे यांनी मानले. तंत्र सहाय्य डॉ. प्रशांत बिरादार, डॉ. सचीन गर्जे व ग्रंथपाल प्रा. परमेश्वर इंगळे यांनी केले. या राष्ट्रीय चर्चासत्रात देशातील विविध भागातून बहुसंख्य अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

# महात्मा फुले महाविद्यालयात गाडगेबाबांची जयंती साजरी



**अहमदपूर**–येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने स्वच्छतेचे अग्रदूत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की , या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. सतीश ससाणे यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा स्वच्छतेचा मूलमंत्र सांगत असतांना शारीरिक स्वच्छते सोबतच मानसिक स्वच्छताही महत्त्वाची असल्याचे सांगितले तर अध्यक्षीय समारोपा प्रसंगी प्राचार्य डॉ . वसंत बिरादार पाटील यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना म्हटले की, गाडगे महाराजांनी केवळ स्वच्छतेचाच मंत्र नाही दिला तर अंधश्रद्धा निर्मूलनाचे मोलाचे कार्य केले आहे .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बब्रुवान मोरे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी 'कोवीड-१९' च्या नियमांचे पालन करून उपस्थित होते.

---

मंगळवार दि. ०२ मार्च २०२१ दैनिक **वतनवाला**

# भाषा ही जशी ओठांतून येते, तशीच ती पोटातूनही आली पाहिजे – प्राचार्य डॉ.बिरादार

अहमदपूर (प्रतिनिधी)

ग्रामीण भागातील बोलींनीच मराठी भाषा समृद्ध केली असून, जोपर्यंत शेतकरी- कष्टकरी मराठी माणूस जिवंत आहे; तोपर्यंत मराठीला मरण नाही. मात्र जागतिक बहुभाषिक परिस्थितीमध्ये मराठी भाषा टिकवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे. मराठीचे अस्सल रूप जतन करणे गरजेचे आहे. भाषा मग ती कोणतीही असू देत ती जशी ओठातूनतून येते तशीच ती पोटातून आली पाहिजे , असे प्रतिपादन महाराष्ट्रातील ख्यातनाम ललित लेखक, समीक्षक व प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार ते बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी , राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर, डॉ. अनिल मुंढे, डॉ. मारोती कसाब हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील



म्हणाले की , मराठी भाषेमध्ये आज दररोज किमान दोन हजार ग्रंथ प्रकाशित होतात. किमान दरवर्षी अडीचशे कोटी रूपयांचा आर्थिक उलाढाल दरवर्षी मराठी साहित्य क्षेत्रात होते. एकअखिल भारतीय पातळीवर मराठीचे संमेलन होते; तसेच एक वैश्विक पातळीवरही मराठी साहित्य संमेलन भरते.तसेच इतर ग्रामीणसह , दलित, आदिवासी, मुस्लिम या साहित्यासह २००साहित्यसंमेलने दरवर्षी भरतात.५००दिवाळी अंक प्रकाशित होतात. जगातील मानांकनात ती १५ व्या क्रमांकाचीभाषा आहे.तर भारतात ४थ्या क्रमांकाची भाषा आहे.महाराष्ट्रात १०कोटी लोक मराठी भाषा बोलतात. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्राचीनता, प्रगल्भता आणि सलगता या निकषाची आवश्यकता आहे.हे तीनही निकष पूर्ण करणाऱ्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळू नये, हे राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाचे आणि मराठी माणसाच्या भांडखोर स्वभावाचे लक्षण आहे. जागतिक क्षेत्रात मराठीतील अनेक ग्रंथ भाषांतरित होत असून, देशातील अनेक विद्यापीठांमध्ये मराठी शिकविली जाते. या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पाहिजे, असेही ते म्हणाले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'आविष्कार' या भित्तीपत्रकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी, डॉ. पांडुरंग चिलगर आणि डॉ.मारोती कसाब यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल मुंढे यांनी केले तर सूत्रसंचालन कु.संजीवनी येडले हिने केले. आभार कु.पूजा देशमुख हिने मानले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

गोदातीर समाचार
.godateer.com
बुधवार, दि. १० मार्च २०२१ • पृष्ठे ६ • किंमत २ रुपये
REGD.NO. G2/RNP/NND-27/20

# राष्ट्राच्या जडणघडणीत स्त्रियांची महत्त्वाची भूमिका–डॉ. अनुपमा अलवाईकर

अहमदपूर– कौटुंबिक जबाबदारी पार पाडत सामाजिक भान ठेवत आपल्या मुलांवर ती चांगले संस्कार करून सामाजिक कार्यासाठी व देश सेवेसाठी चांगले नागरिक घडविण्याचे काम प्रत्येक माता करीत असते राष्ट्राच्या जडणघडणीत व विकासात स्त्रियांची महत्त्वाची भूमिका तर आहे असे प्रतिपादन हैदराबाद येथील जीडी महाविद्यालयाच्या डॉक्टर अनुपमा अलवाईकर यांनी केले.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभागाच्यावतीने आभासी तथा दूरदृश्य प्रणाली (ऑनलाइन) च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'महिला सशक्तिकरण वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर समाजशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषण प्रसंगी डॉ. अनुपमा अलवाईकर बोलत होत्या . या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले महाविद्यालयाच्या माजी आदर्श विद्यार्थी सौ .माधवी चौकटे (औरंगाबाद) ह्या होत्या. तर उद्घाटक म्हणून वरंगल येथील सात वाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉक्टर मोहम्मद इक्बाल अली हे होते. तर विषय तज्ञ म्हणून डॉ. मीनाक्षी नांदापूरकर, (हैदराबाद )सुप्रसिद्ध लेखिका डॉ. ललिता गादगे, डॉ.माधवी कवी (पुणे)आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शोध पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .

आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनात पुढे बोलताना डॉ. अनुपमा अलवाईकर म्हणाल्या की, महिलांचा विविध क्षेत्रात दर्जा सुधारणे आवश्यक आहे. यासाठी त्यांना पुरुषाच्या बरोबरीने माणूस समजून वागणूक देणे महत्त्वाचे आहे. निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांना सहभागी करून घेणे आवश्यक असल्याचेही त्या म्हणाल्या .

यावेळी डॉ. मीनाक्षी नांदापूरकर, डॉ. ललिता गादगे, डॉ. माधवी कवी आदींनी वेगवेगळ्या सत्रामध्ये तर या राष्ट्रीय चर्चा सत्राच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना स्त्रियांविषयी गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप सौ. माधवी चौकटे यांनी केला .

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाने यांनी केले तर सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. नागराज मुळे यांनी केले.तर आभार इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. अतिश आकडे यांनी मानले. तंत्र सहाय्य डॉ. प्रशांत बिरादार, डॉ. सचीन गर्जे व ग्रंथपाल प्रा.परमेश्वर इंगळे यांनी केले. या राष्ट्रीय चर्चासत्रात देशातील विविध भागातून बहुसंख्य अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वतनवाला
• वर्ष –१ • अंक २९५ • गुरुवार, दि. ११ मार्च २०२१ • MAHMAR49914 • पृष्ठे ४

# महिला सबलीकरणाची सुरुवात प्रत्येक आईपासून व्हायला हवी – डॉ.मीनाक्षी नांदापूरकर

'आंतरराष्ट्रीय महिला दिना'च्या निमित्त महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात विषय तज्ञ डॉ. मीनाक्षी नांदापूरकर यांचे मत.

**अहमदपूर (प्रतिनिधी)**

आपल्या संस्कृतीमध्ये कुटुंब व्यवस्था ही महत्वाची मानली जाते आणि त्या कुटुंबाचा खर्या अर्थाने आधार आई आहे. या स्त्रीचा सन्मान प्रत्येक घरात होणे आवश्यक आहे. प्रत्येक आईने आपल्या मुलीच्या हक्कासाठी लढणे आवश्यक आहे तरच खऱ्या अर्थाने आई पासून महिला सबलीकरणाची सुरुवात होईल असे मत हैदराबाद येथील विवेकवर्धनी महाविद्यालयाच्या डॉ . मीनाक्षी नांदापूरकर यांनी व्यक्त केले .

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभागाच्या वतीने आभासी तथा दूरदृश्य प्रणाली (ऑनलाइन ) च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'महिला सशक्तीकरण वास्तव आणि अपेक्षा ' या विषयावर समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या विषय तज्ञ म्हणून डॉ.मीनाक्षी नांदापूरकर बोलत होत्या . या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले महाविद्यालयाच्या माजी आदर्श विद्यार्थी सौ .माधवी चौकटे (औरंगाबाद) ह्या होत्या. तर उद्घाटक म्हणून वरंगल येथील सात वाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद इक्बाल अली हे होते . तर विषय तज्ञ म्हणून डॉ. अनुपमा अलवाईकर , डॉ. मीनाक्षी नांदापूरकर,( हैदराबाद )सुप्रसिद्ध लेखिका डॉ. ललिता गादगे, डॉ.माधवी कवी (पुणे) आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शोध पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .



आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनात पुढे बोलताना डॉ. मीनाक्षी नांदापूरकर म्हणाल्या की, स्त्रियांचा सर्वांगीण विकास तेव्हाच होईल ज्यावेळी त्यांना आत्मसन्मानाची वागणूक मिळेल तरच खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण होईल असेही ते म्हणाल्या .

यावेळी डॉ. अनुपमा अलवाईकर, डॉ. ललिता गादगे, डॉ. माधवी कवी आदींनी वेगवेगळ्या सत्रामध्ये तर या राष्ट्रीय चर्चा सत्राच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना स्त्री महिमा विशद केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप सौ .माधवी चौकटे यांनी केला.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाणे यांनी केले तर सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. नागराज मुळे यांनी केले.तर आभार इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. अतिश आकडे यांनी मानले. तंत्र सहाय्य डॉ. प्रशांत बिरादार, डॉ. सचीन गर्जे व ग्रंथपाल प्रा. परमेश्वर इंगळे यांनी केले. या राष्ट्रीय चर्चासत्रात देशातील विविध भागातून बहुसंख्य अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

वतनवाला

● वर्ष -१ ● अंक २९७ ● शनिवार, दि. १३ मार्च २०२१ ● MAHMAR49914 ● पृष्ठे ४

## म.फुले महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

**अहमदपूर (प्रतिनिधी)**

येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली.



याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. यशवंतराव चव्हाण जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशीक च्या केंद्राचे संयोजक डॉ.अनिल मुंढे हे उपस्थित होते. यावेळी डॉ. अनिल मुंढे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. तसेच या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी यांनी केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मारोती कसाब यांनी केले तर सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बब्रुवान मोरे यांनी केले व आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी कोवीड-१९ तिच्या नियमांचे पालन करून उपस्थित होते.

गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com
स्थापना १९६२/RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2021-2023

❖ नांदेड ❖ शनिवार, दि. १५ मे २०२१ ❖ पृष्ठे ६ ❖ किंमत २

## म. फुले महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर व छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

**अहमदपूर** – येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्यावतीने थोर समाज सुधारक लिंगायत धर्माचे संस्थापक महात्मा बसवेश्वर धर्मवीर व छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली.



महात्मा बसवेश्वर व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागाचे प्राध्यापक महाराष्ट्रातील प्रसिद्ध प्रवचनकार ह. भ. प. डॉ. अनिल मुंढे हे होते तर समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महात्मा बसवेश्वर व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. सतीश ससाने यांनी महात्मा बसवेश्वर व छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टकला. तर अध्यक्षीय समारोप डॉ. अनिल मुंढे यांनी केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बब्रुवान मोरे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांनी मानले. यावेळी शिवाजी चोपडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी कोवीड-१९च्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून उपस्थित होते.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

पोलीस आणि जनतेचे बुलंद व्यासपीठ..!

**पोलीस न्यूज**

लातूर जिल्हा

## स्त्रीला समानतेची संधी देऊन सन्मानाची वागणूक देण्याची गरज – माधवी चौकटे

March 13, 2021 पोलीस फ्लॅश न्यूज




अहमदपूरच्या महात्मा फुले महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय महिला दिना' निमित्त राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपा प्रसंगी माधवी चौकटे यांचे प्रतिपादन

अहमदपूर (गोविंद कांबळे) : स्त्री घरात चांगले आर्थिक नियोजन लावते . स्त्री मुळेच घराला घरपण येत परंतु त्याच स्त्रीला समानतेची संधी देऊन सन्मानाची वागणूक देण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महात्मा फुले महाविद्यालयाची माजी आदर्श विद्यार्थिनी सौ.माधवी चौकटे यांनी केले.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभागाच्या वतीने आभासी तथा दूरदृश्य प्रणाली (ऑनलाइन ) च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सशक्तीकरण वास्तव आणि अपेक्षा या विषयावर समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षीय समारोपा प्रसंगी सौ. माधवी चौकटे ह्या बोलत होत्या . या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून वरंगल येथील सातवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. मोहम्मद इक्बाल अली हे उपस्थित होते तसेच विषय तज्ञ म्हणून डॉ. अनुपमा अलवाईकर, डॉ. मीनाक्षी नांदापूरकर ( हैदराबाद) सुप्रसिद्ध लेखिका डॉ. ललिता गादगे, डॉ. माधवी कवी (पुणे) आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शोध पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष समारोपप्रसंगी सौ .माधवी चौकटे म्हणाल्या की, घरात मुलांचा अभ्यास घेणारी सरस्वती, अन्न बनवणारी अन्नपूर्णा देवी , अत्याचार झाला तर कालिकेचे रूप घेणारी कालिका तर कुटुंबावर संकट आले तर दुर्गेचे रूप धारण करणारी ही स्त्रीच आहे. स्त्री घरात चांगले आर्थिक नियोजन लावते. स्त्री मुळेच घराला घरपण येत परंतु त्याच स्त्रीला समानतेची संधी देऊन सन्मानाची वागणूक देण्याची गरज आहे. असेही त्या यावेळी म्हणाल्या. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाणे यांनी केले तर सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. [illegible] यांनी केले तर आभार इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. [illegible] यांनी मानले, तंत्र सहाय्य डॉ. प्रशांत बिरादार, डॉ. [illegible] व ग्रंथपाल प्रा. [illegible] यांनी केले. या राष्ट्रीय चर्चासत्रात देशातील विविध भागातून बहुसंख्य अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वतनवाला**

● वर्ष - १ ● अंक २९८ ● सोमवार, दि. १५ मार्च २०२१ ● MAHMAR49914 ● पृष्ठे ४

## स्त्रीला सन्मानाची वागणूक देण्याची गरज – चौकटे

**अहमदपूर (प्रतिनिधी)**

आहे . स्त्री घरात चांगले आर्थिक नियोजन लावते . स्त्री मुळेच घराला घरपण येतं परंतु त्याच स्त्रीला समानतेची संधी देऊन सन्मानाची वागणूक देण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महात्मा फुले महाविद्यालयाची माजी आदर्श विद्यार्थीनी सौ.माधवी चौकटे यांनी केले.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभागाच्या वतीने आभासी तथा दूरदृश्य प्रणाली (ऑनलाइन ) च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'महिला सशक्तीकरण वास्तव आणि अपेक्षा ' या विषयावर समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षीय समारोपा प्रसंगी सौ . माधवी चौकटे ह्या बोलत होत्या . या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून वरंगल येथील सातवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद इक्बाल अली हे उपस्थित होते तसेच विषय तज्ज्ञ म्हणून डॉ. अनुपमा अलवाईकर, डॉ. मीनाक्षी नांदापूरकर,( हैदराबाद )सुप्रसिद्ध लेखिका डॉ. ललिता गादगे, डॉ.माधवी कवी (पुणे)आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शोध पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .

यावेळी माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद इक्बाल अली ,डॉ. अनुपमा अलवाईकर, डॉ. मीनाक्षी नांदापूरकर, डॉ. ललिता गादगे, डॉ. माधवी कवी आदींनी वेगवेगळ्या सत्रामध्ये तर या राष्ट्रीय चर्चा सत्राच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना स्त्रियांविषयी गौरवोद्गार काढले.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे

२०२०-२१

आदर्श गावकरी

# कुलगुरूंनी दिल्या महिला दिनानिमित्त शुभेच्छा

अहमदपूर/प्रतिनिधी

जागतिक महिला दिनानिमित्त येथील महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित करण्यात



आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन व मान्यवरांनी शुभेच्छा संदेश पाठवून महात्मा फुले महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या शुभेच्छा संदेशाचे मराठी विभागातील प्रा. डॉ. अनिल मुंढे यांनी वाचन केले.

महात्मा फुले महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ८ मार्च रोजी आभासी तथा दूरदृश्य प्रणाली (ऑनलाइन )च्या माध्यमातून 'महिला सशक्तिकरण वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्र प्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. वसंत भोसले, डॉ. दीपक बच्चेवार आदी मान्यवरांनी चर्चासत्रास संबंधी आपले शुभ संदेश पाठवून महाविद्यालयाचे कौतुक केले.

आपल्या शुभेच्छा संदेशात माननीय कुलगुरूंनी महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांचे सदरील राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केल्या बद्दल हार्दिक अभिनंदन केले असून, महिलांच्या सामाजिक, सांस्कृतिक विकासासाठी अशा प्रकारचे राष्ट्रीय चर्चासत्र निश्चितच उपयोगाचे आहे, असेही म्हटले आहे. तसेच आपल्या शुभेच्छा संदेशात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी महात्मा फुले महाविद्यालयाने कोरोनाच्या काळात ऑनलाईन पद्धतीने महिलांच्या प्रश्नावर राष्ट्रीय चर्चासत्र घेतले, ही बाब अत्यंत महत्त्वाची असून या चर्चासत्राचा सामाजिक विकासासाठी नक्कीच सकारात्मक उपयोग होईल, असे म्हटले. त्यांनीही महात्मा फुले महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे व सर्व प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

यावेळी प्रा. डॉ. अनिल मुंडे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. वसंत भोसले आणि डॉ. दीपक बच्चेवार यांच्याही शुभेच्छा संदेशांचे वाचन केले.

Auranagabad Edition
17 Mar, 2021 Page No. 5
Powered by : eReleGo.com

दैनिक रिपब्लिकन गार्ड
लोकशाही विचारांचा रक्षक
मुख्य संपादक : विजय सोनवणे
उपसंपादक:सतीश सोनवणे
नांदेड,मंगळवार दि.१६ मार्च २०२१ • वर्ष २९ वे •अंक नं.५७ • पाने ४
RNI No.63833/95 Registration No. G-2/RNP/NND-18/2016-2018 • किंमत १ रुपया

# निर्णय प्रक्रियेतही महिलांना समान संधी ही आता काळाची गरज बनलीय

## प्रा.डॉ.माधवी कवी यांचे प्रतिपादन



अहमदपूर,( प्रतिनिधी)- स्त्री घरात चांगले आर्थिक नियोजन लावते . स्त्री मुळेच घराला घरपण येतं म्हणून स्त्रीला सर्व क्षेत्रातील निर्णय घेतल्याचीही समान संधी देऊन सन्मानाची वागणूक देण्याची गरज आहे. निर्णय पुरूषांनीच घ्यायचा व महिलांनी तो ऐकायचा हे किती दिवस चालणार ? म्हणून जोपर्यंत महिलांना निर्णय प्रक्रियेत समान संधी मिळणे ही काळाची गरज आहे. असे होईल तेव्हाच महिला सक्षमीकरण झालं,असे म्हणता येणार नाही,असे प्रतिपादन पुणे येथील प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ. माधवी कवी यांनी केले.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभागाच्या वतीने आभासी तथा दूरदृष्य प्रणाली (ऑनलाईन )च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'महिला सशक्तिकरण वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षीय समारोपा प्रसंगी सौ. माधवी कवी ह्या बोलत होत्या.या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून वरंगल येथील सातवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद इक्बाल अली हे उपस्थित होते.तसेच विषय तज्ञ म्हणून डॉ.अनुपमा अलवाईकर, डॉ. मीनाक्षी नांदापूरकर, (हैदराबाद) सुप्रसिद्ध लेखिका डॉ.ललिता गादगे,सौ.माधवी चौकटे (औरंगाबाद )आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी शोध पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद इक्बाल अली, डॉ. अनुपमा अलवाईकर, डॉ.मीनाक्षी नांदापूरकर, डॉ.ललिता गादगे, सौ. माधवी चौकटे आदींनी वेगवेगळ्या सत्रामध्ये तर या राष्ट्रीय चर्चा सत्राच्या प्रारंभी प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना स्त्रियांविषयी गौरवोद्गार काढले.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सतीश ससाणे यांनी केले तर सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. नागराज मुळे यांनी व आभार इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.अतिश आकडे यांनी मानले.तंत्र सहाय्य डॉ.प्रशांत बिरादार, डॉ.सचिन गं[illegible] व ग्रंथपाल प्रा.परमेश्वर इंगळे यांनी केले.

या राष्ट्रीय चर्चासत्रा[illegible] देशातील विविध भागातू[illegible] बहुसंख्य अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.माधवी कवी पुढे म्हणाल्या की, स्त्री ही शरीराने दुर्बल आहे पण मनाने खंबीर आहे. ती घरांमध्ये मोकळे पणाने हसत,बोलत नाही.तिला घरामध्ये मोकळे वातावरण निर्माण करून दिले तर स्त्रीचा आत्मविकास होईल.असे ही त्या यावेळी म्हणाल्या.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

औरंगाबाद । जालना । बीड । नांदेड । लातूर । परभणी । हिंगोली । उस्मानाबाद । बिदर । अहमदनगर । नाशिक । मुंबई । दिल्ली = RNI-MAHMAR/2017/73842
ग्रामीण महाराष्ट्राचा बुलंद आवाज !
आदर्श गावकरी
औरंगाबाद, गुरुवार, दि.१८ मार्च २०२१ ■ पाने : ८+४=१२ ■ किंमत : ३ ₹ ■ वर्ष : ४, अंक : २६७ ताज्या बातम्या, घडामोडींसाठी आम्हाला भेट द्या - www.adarshgavkari.c

## मराठी भाषा गौरवदिन : लोक वैभवाच्या मराठीची परंपरा थोरच : डॉ. अनिल मुंढे

**अहमदपूर :** 'मराठी भाषा ही महाराष्ट्राची आद्य प्राकृत भाषा असून, आपल्या साहित्यातून शोषितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारी ही भाषा आज लोक वैभवाच्या शिखरावर विराजमान असून, इतिहास काळातही मराठीची परंपरा थोर आहे' असे प्रतिपादन महात्मा फुले महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक तथा महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार ह. भ. प. डॉ. अनिल मुंढे यांनी केले.

नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल मुंढे हे बोलत होते. दूर दृश्य तथा झूम प्रणालीद्वारे आयोजित



कार्यक्रमात मराठी भाषा : परंपरा व थोरवी या विषयावर डॉ. अनिल मुंढे यांनी व्याख्यान दिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्राचे प्रमुख डॉ. बी. के. मोहन हे होते, तर सहाय्यक कुलसचिव चंद्रकांत पवार, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. अनिल मुंढे म्हणाले की, मध्ययुगीन काळात महानुभावांनी आणि वारकऱ्यांनी मराठी भाषेला धर्म भाषेचा दर्जा दिला. त्यापूर्वी कर्नाटकातील जैन तीर्थंकर भगवान बाहुबलीच्या मूर्तीखाली श्री चाम ण्डराये करवियले, गंगराये सुत्ताले करियले ही मराठी भाषेतील पहिली लिखित ओळ सापडते. हा मराठी भाषेचा गौरवशाली वारसा पुढे बखरकार आणि शाहिरांनी चालवून म राठीला वैभवाच्या शिखरावर विराजमान केले आहे. आज कुणी काही म्हणत असले तरी जो पर्यंत मराठी माणूस आहे, तोपर्यंत मराठीला मरण नाही, असेही त्यांनी सांगितले. या ऑनलाइन आभासी कार्यक्रमात विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि शंभराच्या जवळपास मराठी रसिकांनी सहभाग घेतला.

वतनवाला
● वर्ष -१ ● अंक ३०० ● शुक्रवार, दि. १९ मार्च २०२१ ● MAHMAR49914 ● पृष्ठे ४

## भारतीय संस्कृतीला कर्तबगार महिलांचा वारसा – प्राचार्य डॉ.बिरादार

अहमदपूर (प्रतिनिधी)



प्राचीन काळामध्ये भारत हे एक मातृसत्ताक राष्ट्र होते. गार्गी, मैत्रेयी , लोपामुद्रा सारख्या विदुषी, महान कर्तबगार आणि ज्ञानी स्त्रिया या देशात होत्या. मात्र नंतरच्या काळात बाहेरुन आलेल्या आक्रमकांनी स्त्रीसत्ताक राज्य व्यवस्था नष्ट करून पुरुषसत्ताक व्यवस्था आणली. तेव्हापासून सातत्याने स्त्रियांचा अपमान होत आला आहे, मात्र हे आता थांबवले पाहिजे कारण स्त्री शक्ती जागृत झाली आहे . म्हणून प्रत्येकाने स्त्रियांचा मनातून आदर सन्मान केला पाहिजे ,असे प्रतिपादन ज्येष्ठ ललित लेखक व समीक्षक तथा महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांनी केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ' महिला सक्षमीकरण वास्तव आणि अपेक्षा ' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात प्राचार्य डॉ. बिरादार बोलत होते.

दूर दृश्य तथा' गुगल मीट' च्या द्वारे ऑनलाईन संपन्न झालेल्या या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन आंध्रप्रदेश वरंगल येथील सातवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद अली इकबाल यांनी केले. या चर्चासत्रात विषयतज्ञ म्हणून हैदराबाद येथील डॉ. अनुपमा आळवाईकर , डॉ. मीनाक्षी नांदापूरकर तसेच पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. माधवी कवी , औरंगाबाद येथील ज्येष्ठ स्त्रीवादी कवयित्री तथा ललित लेखिका डॉ. ललिता गादगे यांनी मार्गदर्शन केले तर समारोपीय सत्राचे अध्यक्षपद महात्मा फुले महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी तथा आदर्श शिक्षिका माधवी चौकटे यांनी भूषविले.

यावेळी पुढे बोलताना आचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, स्त्रियांना आता कमजोर समजणे चुकीचे असून स्त्रियांनी सर्व क्षेत्रांमध्ये बाजी मारलेली आहे. त्यांच्या कार्याची योग्य ती दखल समाजव्यवस्थेने घेऊन त्यांना सन्मानाने वागविले जावे , यातच देशाचे हित आहे असेही ते म्हणाले.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे प्रास्ताविक संयोजक व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाणे यांनी केले. सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. नागराज मुळे यांनी केले; तर आभार प्रदर्शन इंग्रजी विभाग प्रमुख प्रा .आतिश आकडे यांनी केले. या चर्चासत्रात देशातील विविध अभ्यासकांनी ऑनलाइन सहभाग नोंदविला. मान्यवरांच्या हस्ते चर्चासत्रातील शोधनिबंधांच्या स्मरणिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

दैनिक रिपब्लिकन गार्ड लोकशाही विचारांचा रक्षक
मुख्य संपादक : विजय सोनवणे उपसंपादक:सतीश सोनवणे
नांदेड,बुधवार दि.२४ मार्च २०२१ ● वर्ष २९ वे ●अंक नं.६४ ● पाने ४
RNI No.63833/95 Registration No. G-2/RNP/NND-18/2016-2018 ● किंमत १ रुपया

## महात्मा फुले महाविद्यालयाला विद्यापीठाचा 'ए' ग्रेड




### अहमदपूरच्या शिक्षण पंढरीत मानाचा शिरपेच

अहमदपूर,(प्रतिनिधी)-अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात व विद्यापीठात अव्वल स्थानावर विराजमान होणारे येथील महात्मा फुले महाविद्यालयास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने 'ए' दर्जा (ग्रेड) विद्यापीठाने प्रदान केला असल्यामुळे अहमदपूरच्या शिक्षणपंढरीत मानाचा शिरपेच खोवला गेला आहे.

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूरचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनानुसार व सहकार्यानुसार आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक, सामाजिक,सांस्कृतिक, क्रिडा आदी क्षेत्रामध्ये उत्तुंग भरारी घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रात स्वतंत्र 'फुले पॅटर्न' निर्माण केला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने मार्च २०२० मध्ये महात्मा फुले महाविद्यालयातील अद्ययावत शैक्षणिक सुविधा,विविध उपक्रम,भौतिक सुविधा, प्राध्यापकांचे संशोधन,आदींसह महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण 'अकॅडमिकड डमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट' केले.यामध्ये महाविद्यालयास ७२.८५ची टक्केवारी मिळाली असून ग्रेड 'ए' दर्जा(ग्रेड) प्राप्त झाला आहे.फुले महाविद्यालयास 'ए' ग्रेड प्राप्त झाल्याबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीरच्या सर्व पदाधिकाऱ्यानी तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.उध्दव भोसले,प्र.कुलगुरू डॉ.जोगेन्द्रसिंह बिसेन, व्यवस्थापन समितीचे सदस्य प्राचार्य डॉ.वसंत भोसले यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांचे व सर्व सहाय्यक प्राध्यापकांचे व कार्यालयीन कर्मचा-यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

प्रजापत्र बुधवार, दि. २४ मार्च २०२१ ३

## महात्मा फुले महाविद्यालयाला विद्यापीठाचा 'ए' ग्रेड अहमदपूरच्या शिक्षणपंढरीत मानाचा शिरपेच...!

अहमदपूर / प्रतिनिधी :
अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात व विद्यापीठात अव्वल स्थानावर विराजमान होणारे येथील महात्मा फुले महाविद्यालयास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने 'ए' दजान (ग्रेड) विद्यापीठाने प्रदान केला असल्यामुळे अहमदपूरच्या शिक्षणपंढरीत मानाचा शिरपेच खोवला गेला आहे.

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीरद्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूरचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनानुसार व सहकार्यानुसार आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आदि क्षेत्रामध्ये उत्तुंग भरारी घेऊन स्वामी



रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रात स्वतंत्र 'फुले पॅटर्न' निर्माण केला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने मार्च २०२० मध्ये महात्मा फुले महाविद्यालयातील अद्ययावत शैक्षणिक सुविधा, विविध उपक्रम, भौतिक सुविधा, प्राध्यापकांचे संशोधन, आदिंसह महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण 'अकॅडमिक अॅण्ड अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट' केले.

यामध्ये महाविद्यालयास ७२.८५ची टक्केवारी मिळाली असून ग्रेड 'ए' दर्जा (ग्रेड) प्राप्त झाला आहे. फुले महाविद्यालयास 'ए' ग्रेड प्राप्त झाल्याबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीरच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उध्दव भोसले, प्र. कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, व्यवस्थापन समितीचे सदस्य प्राचार्य डॉ.वसंत भोसले यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांचे व सर्व सहाय्यक प्राध्यापकांचे व कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

शिक्षणातून स्वावलंबनाकडे २०२०-२१

# वतनवाला

● वर्ष -९ ● अंक २०४ ● शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२० ● MAHMAR49914 ● पृष्ठे ४

## डॉ.बिरादार व डॉ.चौधरी यांच्याकडून महाविद्यालयास ग्रंथ भेट



अहमदपूर (प्रतिनिधी)

जगप्रसिद्ध अंतराळशास्त्रज्ञ, थोर तत्वज्ञ, भारताचे 'मिसाईल मॅन' व माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन येथील महात्मा फुले महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी व कर्मचाऱ्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी महात्मा फुले महाविद्यालयाच्या ग्रंथालयास प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील व उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी यांच्यावतीने पन्नास मौल्यवान ग्रंथांची भेट देण्यात आली. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. परमेश्वर इंगळे यांनी या भेटीचा स्वीकार केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बब्रुवान मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. सतीश ससाणे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. डी. चौधरी, डॉ. नागराज मुळे, डॉ. मारोती कसाब, डॉ. पांडुरंग चिलगर, डॉ. संतोष पाटील, कार्यालयीन अधीक्षक प्रशांत डोंगळीकर, शिवाजी चोपडे आदी उपस्थित होते.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी



अहमदपूर दि.०२ (प्रतिनिधी): येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, येथील महात्मा फुले महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बब्रुवान मोरे हे होते तर राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांची प्रमुख उपस्थिति होती. यावेळी डॉ. चिलगर यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामोद्धाराच्या संदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. बब्रुवान मोरे यांनी केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अजय मुरमुरे यानी केले तर आभार शिवाजी चोपडे यांनी मानले. यावेळी कोविड-१९ च्या नियमाचे काटेकोर पणे पालन करून महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालय कर्मचारी उपस्थित होते.

# यशवंत

"शरीराला श्रमाकडे,
बुध्दीला मनाकडे
आणि
हृदयाला भावनेकडे
वळविणे म्हणजे
शिक्षण"

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर